

# माझ्या खरडवहीतल्या काही

# असत्यकथा

## सतीश बेंडीगिरी

## **या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# **माझ्या खरडवहीतल्या काही असत्यकथा**

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

**आमचं काहीच कमी होत नाही.**

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

**तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?**

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# माझ्या खरडवहीतल्या काही

# असत्यकथा

लेखक : डॉ. सतीश बेंडीगिरी

# माझ्या खरडवहीतल्या काही असत्यकथा


## लेखक : डॉ. सतीश बेंडीगिरी

भ्रमणध्वनी - ९१-९०७५८१०२६०

इमेल - bsatish17@gmail.com

पत्ता - अ१/१०२ कुमार प्रिन्सवील, शिव रोड, मोशी, पिंपरी-चिंचवड -४१२१०५



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www.esahity.com
esahity@gmail.com
**Whatsapp-9869674820**

प्रकाशन : १८ नोव्हेंबर २०२१
(कार्तिक शु. चतुर्दशी)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. सतीश बेंडीगिरी



पिंपरी चिंचवड, पुणे.

MBA, PhD

**व्यवस्थापन महाविद्यालयाचे निवृत्त संचालक**

लहानपणापासूनच विविध प्रकारचे साहित्य वाचनात आले. मग महाविद्यालयात शिकत असताना असे वाटले की आपण ही साहित्य निर्मिती करावी तसे काही लेख लिहिले आणि नियतकालिकात काही लेख छापले गेले. नंतर शिक्षण आणि नोकरीच्या धबडग्यात जमत नव्हते. आता निवृत्त झाल्यावर बरेच विषय हाताळले आणि लेखन केले. हे असे ललित लेख "अक्षरनामा" या मराठी आंतरजालावर प्रसिद्ध होत असतात. त्यातील निवडक लेख एकत्रित करून एक पुस्तक इ-साहित्य इथे द्यायचा विचार करतो आहे.

वाचन – हातात येणारे कुठलेही पुस्तक वाचल्याशिवाय राहत नाही. विविध प्रकारचे वाचन करायला आवडते. साहित्य निर्माण करणारे सगळेच लेखक आवडतात. मराठीत जी ए कुलकर्णी आणि इंग्रजीत पर्ल बक, आयन रँड आणि हेरॉल्ड रॉबिन्स यांचे साहित्य विशेष आवडते

## डॉ. सतीश बेंडीगिरी यांचे प्रकाशित साहित्य

**(१) Non Fiction -**

१) Perspectives in People Management (Issues, Challanges and Interventions) - An Ode to Human Resource Development (Paperback)Current Publications, Agra ॲमेझॉन या पोर्टलवर उपलब्ध.

२)Employee Empowerment & Training & Development :Current Publications, Agra - ॲमेझॉन या पोर्टलवर उपलब्ध.

**(२) Fiction –**

१)The Lust – ॲमेझॉन या पोर्टलवर उपलब्ध.

२) Badge of Honour – ॲमेझॉन या पोर्टलवर उपलब्ध.

**(३) अनुवादित साहित्य –**

Corporate Monk हे श्रीमती अंजु शर्मा यांनी इंग्रजीत लिहिलेल्या पुस्तकाचा मराठी अनुवाद "कॉर्पोरेट साधू" या नावाने केला आहे. प्रकाशक - आर आर शेठ आणि कंपनी, अहमदाबाद. ॲमेझॉन या पोर्टलवर उपलब्ध.

**(४) आंतरजालावरचे साहित्य** –

१) अक्षरनामा.

२) MyIndMakers.com

# मनोगत

या कथा संग्रहातल्या काही कथा प्रथम पुरुषी एकवचनी आहेत आणि काही कथा एक स्त्री स्वतः सांगते आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत वाढल्यामुळे आई, मावश्या, काकवा आणि नंतर मोठ्या भावांच्या बायका म्हणजे माझ्या भावजया, मावश्या आणि काकवाना आलेल्या सुना, माझ्या मोठ्या भावांच्या सुना, माझी स्वतःची सून, यांच्याशी माझा लग्न, नामकरण, मुंज, असे कौटुंबिक प्रसंग आणि दसरा, दिवाळी, होळी, संक्रांत असे सणवार अशा अनेक प्रसंगी नित्य संबंध येत गेला. नंतर सुरतेत एका मोठ्या कॉर्पोरेट कंपनीत मनुष्यबळ विभागात काम करत असताना अनेक स्त्री कामगार आणि नंतर व्यवस्थापन महाविद्यालयात शिकवत असताना सहकर्मचारी स्त्रिया तसेच व्यवस्थापन महाविद्यालयात संचालक म्हणून काम करत असताना अनेक विषय शिकविणाऱ्या सहकारी स्त्रिया यांच्याशी येणारा नित्य संबंध यामुळे स्त्रियांच्या भाव विश्वात डोकवायला मिळाले. (नित्य आणि दिवसरात्र जिच्याशी संबंध आला त्यात माझी अर्धांगिनी आहे!) या अनुभवातूनच खरडवहितल्या काही कथांचा जन्म झाला. यातल्या बऱ्याचशा कथा काल्पनिक आहेत आणि काही कथेत सत्याचा थोडासा अंश आहे. पदार्थाला चव येण्यापुरते चिमूटभर मीठ असते तसे! सत्याचा थोडासा अंश आणि बाकी सगळा कल्पनाविलास आहे. म्हणूनच पुस्तकाच्या शीर्षकात काही असत्यकथा असे शब्द वापरले आहेत.

पुरुषांचे विश्व हा वेगळा प्रकार आहे. एखाद्या समारंभात दोन पुरुष एकाच रंगाचा आणि ब्रँडचा शर्ट घालणारे एकमेकांना भेटले तर त्यांच्यात लगेच मैत्री होते. बायकांचे सहसा तसे होत नाही.

साहित्यात लघुकथा हा प्रकार बराच रुळलेला आहे. बऱ्याच साहित्य प्रेमींना एक अख्खी कादंबरी वाचण्यापेक्षा छोट्या छोट्या लघुकथा वाचायला आवडतात. बऱ्याच साहित्य प्रदर्शनाला भेटी दिल्या आणि त्यात प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे एका मोठ्या कादंबरीपेक्षा कथासंग्रह पसंत करणारी वाचक मंडळी. मिळालेल्या अनुभवातून कथेची मांडणी करावी आणि काही कथा लिहाव्या असे वाटले आणि मग लेखणी हातात घेतली. आताच्या भाषेत म्हणायचं तर कळफलक (की बोर्ड) दाबायला सुरुवात केली.

प्रवासाला आता कोठे सुरुवात केली आहे. इच्छित स्थळी पोहोचण्यासाठीचे तिकीट "इ-साहित्य" या व्यासपीठांने उपलब्ध करून दिले आहे. त्यांचे आभार मानतो.

खरडवहितल्या असत्य पण रंजक कथा वाचकांना आवडतील अशी आशा बाळगतो.

धन्यवाद

डॉ. सतीश बेंडीगिरी

पिंपरी चिंचवड, पुणे.

# अर्पणपत्रिका

१)माझ्या जीवनात आलेली जिवाभावाची असंख्य माणसं, ज्यांनी माझा अनुभव समृद्ध केला आणि लिहायला विविध विषय दिले त्या सगळ्यांना हा कथा संग्रह मनोभावे अर्पण.

२) ज्यांनी माझे लेख आणि कथा वाचून , " व्वा, अप्रतिम!", "काय मस्त लिहितोस रे!", "मी असल्याच हलक्या फुलक्या कथांच्या शोधात होते रे! ", " लिहीत राहा," असे उद्गार काढून मला प्रोत्साहन दिले आणि हुरूप वाढवला त्यांना हा कथा संग्रह मनोभावे अर्पण.

३) ज्यांनी माझे लेख आणि कथा वाचून नाके मुरडली, "हं... आला फार मोठा शहाणा लिहिणारा...” असे म्हणून हिणवलें, कथा आणि लेख वाचले परंतु प्रतिक्रिया देण्याचे "मुद्दाम" टाळले, त्यांनाही हा कथा संग्रह मनोभावे अर्पण.

आणि शेवटी

४) "केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलांसाठी, त्या हृदयाला तळहातावर जपलीस माझ्यासाठी" अशी माझी प्रिय अर्धांगिनी सौ. अपर्णा हिला हा कथासंग्रह मनोभावे अर्पण.

डॉ. सतीश बेंडीगिरी

पिंपरी चिंचवड, पुणे.

सफेद पेहराववाला माणूस खरंच सभ्य असतो? कॉफी शॉपमध्ये जन्माच्या गाठी जमतात? १२०च्या वेगाने गाडी चालवाल? रस्त्यावर भूत भेटलं तर? हत्तींना साखळदंडानी का बांधतात? कष्टाने खरंच माणूस वरती येतो? शिकलेला रिक्षावाला बघितलाय? प्रेम परीपक्व होतं म्हणजे काय? नवरा बायकोच्या नात्यात नोक झोक? चालतंय की!...

कुणीतरी म्हटलंय "औरतोंको समज़ना मुश्किल ही नहीं नामुमकिन है!" अनुभवाचे बोल असावे कदाचित. मीही माझ्या परीने या प्रश्नांची उत्तरे शोधली आणि खरडली खरडवहीत! मला उत्तरं लिहायला जमलीत? की हे प्रश्न अनुत्तरीतच राहतात? या... तुम्हीही उत्तरं शोधा माझ्याबरोबर!

# माझ्या खरडवहीतल्या काही असत्यकथा


माझ्या खरडवहीतल्या काही
असत्यकथा
सतीश बेंडीगिरी

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १ झंटालमन | 15 |
| २ षण्णवतिः शब्द कथा | 20 |
| ३ सदानंद | 22 |
| ४ कॉफी ॲट सिसिडी. | 27 |
| ५ ओव्हरटाईम | 31 |
| ६ इंदूर फ्लाईट | 35 |
| ७ सुरकुत्या | 44 |
| ८ वज्रासन | 53 |
| ९ होस्कोटे रोड | 58 |
| १० पिझ्झा बॉक्स | 68 |
| ११ माझी छत्री | 80 |
| १२ संकष्टी | 94 |
| १३ नामुमकिन डॉन | 100 |
| १४ भजन – भोजन | 112 |
| १५ गजांतलक्ष्मी | 126 |
| १६ ट्रेनी घोस्ट | 137 |
| १७ काईट इन द स्काय | 143 |
| १८ रेन इन स्पेन | 163 |
| १९ कच्चे केले के कोफ्ते | 168 |
| २० इरा | 183 |
| २१ आय लव यू | 190 |
| २२ स्टाफ इंट्रोडक्शन | 193 |

# झंटालमन

यष्टी धुरळा उडवत इश्ट्यांड मदी घुसली अन् वाईला जानारी मानसं दानकन् हुटली. पासिंजरचा योकच गलका सुरू जाला. मी बी गर्दीत घुसलो अन् रेटारेटीत मागं फुडं व्हाय लागलो. माज्या डोल्यावर काळा चष्मा व्हता. टेरीकाटचा बगळ्यावाणी सफेद सदरा आन् सास्किनच्या काळया इजारित माजी पर्शनालीटी लई झकास वाटत व्हती.

"सगळे बाकावर बसा.." कंडाक्टर वराडला, "कुनी बी टिकाट घेतल्या बिगर गाडीत चढायचं नाई.." आन् तंबाकूची येक लांब पिंक टाकीत तो कंटरोलर कॅबिनकडं वळला.

पून्यांदा येकदा गलका झाला अन् गुळाला मुंग्या चिकटाव्या तशी दाराला चिकाटलेली मानसं बाकड्यावर लंबर लावाय पळली. लई मोठा घोळका झाला अन् समोरल्या माणसाच्या खांद्यावरून माजा हात तेच्या म्होरं असलेल्या हिरव्या शर्टाच्या खाकंत घुसला. त्याच टायमाला कुणाचं तरी ल्हान कारटं माज्या पायात कडमाडलं आन् मी खाली वाकलो. त्या लहानग्याला मी

बाजूला सारलं आन् तोल सावरत व्हतो तवा परत धक्कामुक्की जाली आन् मी पडलो. ' जाउंदे त्येच्या मायला... मागल्या यष्टीनं जायाचं ' असा इचार केला आन् मी बाजूला सराकलो.

मी बगाय लागलो तर माझी इजार अन् सदरा धूळ भरला झाला व्हता. त्वांड बी मातकट वाटत हुतं. हात बी लई घान दिसत व्हते. जरा पान्यानं धुतले तर बरं वाटल म्हून मी पर्साधिन घराकडं चाललो. आत शिरलो अन् हातातली बेग खाली ठिवली अन् बॅसीनचा नळ फिरविला. त्वांडाला पानी लागलं तवा जिवाला लई सुक वाटलं. समोरल्या आरशात बगून मी त्वांड पुसला तवा माज्या नजरंला आरशाच्या वरल्या बाजूला येक हात वर, बारकं भगदाड दिसलं. मी पाय वर करून भगदाडात हात घातला. हाताला माती चिटाकली. मी परत हात धुतले आन् मग भाईर आलो.

***

कंडाक्टर अजून बी आला न्हवता. माणसं जरा गप व्हती पर त्यो हिरवा सदरा वरडत व्हता. " च्वार व्हता रं बाबा... माज पाकीट मारलं की रं... पटकी लागली रं त्येला.. हज्जार रूपे व्हते पाकिटात...कसं व्हायचं अत्ता.. कसा मी जानार घरला.. त्याचं बी वाकडं व्हनार बगा म्या सांगतू...."

बाजूला मानूस व्हता त्येला मी इचारलं काय झालं, तर त्यो म्हनला, " पाकीट मारलं गर्दीत त्येचं. बिचारं…लई च्वार हायीत हिकडं.. हजार रूपे गेले.."

मी हिरव्या सदऱ्याकडं बगीतलं. त्येच्या डोल्यात पानी तरारून आलं हुतं. मी त्येच्याकड गेलो आन् कसं जालं इचारलं. " म्हाईत न्हाई कसं.. कुनी आन् कसं काढून घितला काय बी सुदारला न्हाई. लेंघाच्या खिशात चोरी व्हते ना तर मी वरल्या खिश्यात पाकीट ठिवला व्हता. काळं पाकिट हाय. पाकिटात साईबाबाचा फोटू बी हाय. म्हटलं साईबाबा आपल्याला वाचिवतात." तो हुंदत हुंदत बोलत व्हता. " ज्येनं घेतलं त्ये लई बेनं हाय. पचनार न्हाई त्येला. त्याचं धा हजार जातील म्या सांगतू. लै नुस्कान व्हनार त्येचं..." त्यो हमसत व्हता.

" खुट जानार हाय तुमी " मी इचारलं. " वाईस जातूया." त्यो बोलला. " आता कसं जानार मी. पैसा बी न्हाई." माज्या मागं, म्होरं आन् आजूबाजूला धा बारा मानसं घोळका करून हुबी व्हती. माजा

सफेत सदरा आन् भारी इजार बगून मला ती मानसं झंटालमन समजत व्हती.

" आपून असं करू, " मी म्हटलो, " मी पन्नास रूपे देतो तुमास्नी आन् वाईला जायचं टिकिट बी काडून देतो. रडता कशा पायी.." मी खिशात हात घातला आन् पन्नासची आणि ईसची नोट काढून त्याच्या म्होरं धरली. त्येन माज्याकडं नजर केली. त्येच्या नजरंत उपकार दिसलं. " लै उपकार जाले साहेब, तुमच्या रुपात साईबाबाच भेटले जनू.. न्हाईतर काय बी खरं नव्हतं आज.." त्यानं माजे हात धरले. मला लाजल्यावाणी झालं. लगंच आजूबाजूला असणाऱ्या लोकास्नी बी दया आली आन् कुनी धा तर कुनी पाच रूपे त्याला दिले आन् जरा येळ त्येबी साईबाबा बनले.

येवढ्यात कंडाक्टर आला. सर्वे लोकांनी तिकिटं घेतली आन् पटापटा येश्टीत चडली. कंडाक्टरनं दोन बेल मारल्या आन् बस आली तशीच धुरळा उडवत गेली बी इश्ट्यांडच्या भाईर.

सगळीकड कशी सामसूम जाली. माजा सदरा बी धूळ लागून मळला व्हता. मी केसातनं हात फिरविला तर त्यात बी धूळ. वाईच केसातून फणी फिरवूया असा इचार केला आन् परत पर्साधन

घराकडं निघलो. मघाच्याच आरशा म्होरं हुबा ऱ्हायलो. खिशात हात घातला, फणी काढली आन् मास्त भांग पाडला. मग पाय वर करुन भगदाडात हात घातला आन् आल्लाद पाकीट खाली घेतलं. पाकिटाचा रंग काळाच व्हता. उघाडलं आन् बघितलं तर साईबाबांचा फोटू. पन्नासच्या नोटा मोजील्या तर बराबर ईस व्हत्या. मी भाईर आलो. वाईला जानाऱ्या बाकड्यावर परत मानसं गोळा झाली व्हती. मी बी परत बाकड्याकडं चालाय लागलो.

## षण्णवतिः शब्द कथा - मिशनरी पोझिशन

“तुला अजून दहा वेळा करावे लागेल.”

“मी करू शकत नाही.”

“मला काही ऐकायचं नाही.”

“प्लीज समजून घे ना... मी खरंच थकलोय “

“डार्लींग, आय नो, तू करू शकतोस.”

“नॉट पॉसिबल.”

“कर म्हणतेय ना..”

“अगं, पण मी थकलोय.”

“ थकलोय बिकलोय काही नाही. कर म्हणजे कर.”

“ अगं ऐकतर खरं?”

“ नो ऑर्ग्युमेंट. आतापर्यंत तू फक्त पालथं पडून केलंयस. उभं राहून करायचंय त्याचं काय? “

“बापरे, शक्य नाही. आय एम टोटली बर्नट् आउट.”

“टोटली नाही. तुझा चेहरा लाल झालाय म्हणजे बर्न आउट नाही. चल, डू इट.”

"बर बाई, करतो. नाही केलं तर तू ऐकणार थोडीच आहेस…?”

……..

*टीप- वरील संभाषण नेमकं काय आहे ते जाणून घ्यायचे असेल तर ते जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात पहिल्याच दिवशी झालेलं आहे. चार आठवडे आहेत आणि आठवड्याच्या सुरुवातीला तारखा आहेत ७/१४/२१/२८. बाय द वे, we should not judge a book by its cover, a person by his/her face and a story by its title.*

## सदानंद.

यावेळी मी खरगपूर स्टेशनवर उतरल्यानंतर आयआयटी कॅम्पसला ऑटोने नव्हे तर सायकल रिक्षातून जायचे ठरवले. पहिल्यांदा एडमिशनसाठी आले होते तेंव्हा सभोवतालचे दृश्य पाहून फार छान वाटले होते. पण बरोबर आई आणि माझ्या चार मोठ्या बॅगा, म्हणून टॅक्सी केली होती. त्याच वेळी ठरवले की पुढच्या वेळी एकटी असेन तेंव्हा स्टेशन ते कॅम्पस सायकल रिक्षाची मजा लुटू. मी स्टेशनबाहेर पडले तेव्हा समोर पार्कच्या बाहेर बऱ्याच रिक्षा उभ्या होत्या. मी एका रिक्षेकडे वळले आणि पाठमोऱ्या असलेल्या त्याला विचारले," तुमि की आमाके आयआयटी निये आबे..?" रिक्षावाल्याने माझ्याकडे वळून पाहिले, आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. सदानंद! आमच्याकडे कामाला येणाऱ्या यमुनाचा मोठा मुलगा!

" अरे सदू, तू इथे.. एवढया लांब बंगालमध्ये? तू तर मुंबईला होतास ना कंपनीत? मार्केटिंग करत होतास ना..?"

राजू ओशाळला " हो ताई.." तो म्हणाला, " सांगतो तुम्हाला, पण एवीता ताई तुम्ही एवढया लांब इथे कशा?"

“अरे, मी शिकतेय ना इथे.. म्हणून आलेय. येतोस का कॅम्पसला?"

"येतो ना दीदी," तो म्हणाला, “द्या ती बॅग इकडे". असं म्हणत त्याने माझी बॅग बाकावर ठेवली आणि मला बसायला सांगितलं.

त्याने रिक्षा चालवत बोलायला सुरुवात केली. “दीदी, नाना तर दारू पिऊन पिऊन शेवटी गेले ते तुम्हाला माहितीच आहे. आई तर फार गोंधळून गेली होती. मला काहीच कळेना काय करायचं ते. बीकॉम.चा निकाल लागला आणि मला वाटलं की छान नोकरी मिळेल पण नाही मिळाली दीदी नोकरी. गावाकडून काका धान्य पाठवायचे पण नंतर हळू हळू कमी केलं त्यांनी. तुमच्या सोसायटी मधल्या कामांची मदत व्हायची पण ती किती? ते केसकर साहेब अमेरिकेला गेले आणि जाधव साहेबांनी घर विकलं म्हणून ती दोन्हीं काम बंद झाली. ज्योतीला आई कामावर घेऊन जात नव्हती. ज्योती म्हणाली मी दुसऱ्या सोसायटीत काम करायला जाते तर आई नाही म्हणाली. दहावीचं वर्ष होतं तिचं. मग मी काकांना एकदा भेटायला गेलो होतो पण ते माझ्याशी भांडले. मी तिथून निघालो. एस टी स्टँड वर मला कॉलेजमधला मित्र भेटला. सुदीप्तो. तो इथलाच, खरगपूरचा. त्यानं पण बरेच प्रयत्न केले होते पण कोणीच जॉब देत नव्हतं. तो म्हणाला चल चार दिवस खरगपूरला.

मी इथे आलो. नंतर आम्ही दोघांनी हा रिक्षाचा उद्योग सुरु केला ताई."

“तू घरी येतोस तेंव्हा ओळखू पण येत नाहीस असा जमानिमा करून येतोस की" मी म्हणाले, “ज्योतीला छान छान कपडे, यमुनाला साड्या आणि दागिने पण करवले रे तू.....?"

“हो ना दीदी, " तो पुढे बोलू लागला, “त्याचं असं झालं दीदी कि इथे येऊन सहा महिने झाले तसे एकदा एक अशीच सवारी बसली होती वडील आणि मुलगी, तिचं नाव मोम. ती रडत होती कारण तिचा अकाउंटिंगचा पेपर अवघड गेला होता. तिला ओनर्स इक्विटी काय ते लक्षात येत नव्हतं. मी तिला समजावलं आणि त्यांना धक्काच बसला.”सदू बोलला. मी पण चकित झाले. " अरे व्वा.. काय समजावलं तू तिला...?" " मी म्हणालो की दीदी, ओनर्स इक्विटी इज इक्वल टु असेट्स मायनस लायबीलीटीज आणि ते धंद्याच्या सुरुवातीला गुंतवलेल्या पैशाइतके साधारण यायला हवेत. तो माणूस मला घरी घेऊन गेला. दिपांकरदा त्यांचं नाव. मी तिचा अख्खा पेपर सोडवून दिला आणि दिपांकर दानी मला मोमदीदीला शिकवायला ठेवले. तेंव्हापासून बऱ्याच शिकवण्या घेतोय दीदी.."

मला खरंच या मुलाचा अभिमान वाटला. प्रतिकूल परिस्थितीत कसे टिकावे आणि आलेल्या संधीचे सोने कसे करावे हे त्याला कळले होते. शिवाय शिक्षण कुठेही वाया जात नाही हे ही खरे आहे ते ही त्याला उमजले होते..

" मी पैसे उधळत नाही दीदी. साठवून ठेवलंय ज्योतिसाठी. तिला इथेच आयआयटीमध्ये शिकवायचा विचार करतोय.." तो म्हणाला.

"चांगलाच विचार आहे तुझा" त्याच्या जिद्दीला दाद देत मी म्हणाले.

आयआयटी चा कॅम्पस आला. "दीदी, कुठलं हॉस्टेल तुमचं?" त्यानं विचारलं.

" मदर टेरेसा हॉल "

" हां, म्हणजे टिक्का सर्कल जवळ.." तो म्हणाला.

आम्ही हॉस्टेलच्या दाराजवळ पोहोचलो. मी उतरले, बॅग खाली घेतली आणि पर्स उघडली.

" दीदी, काय करताय तुम्ही? मी पैसे घेणार नाही. तुम्ही माझ्या ताईसारख्या आणि मी तुमच्याकडून पैसे घेऊ?"

“बरं बाबा, घेऊ नकोस, देत नाही तुला.. ठीकाय..? पण सांभाळून रहा रे..खूप पैसे कमव आणि ज्योतीला इथे एडमिशन घे. बेस्ट ऑफ लक."

“दीदी, एक विनंती आहे," तो म्हणाला, “मी इथे रिक्षा चालवतो ते ज्योती आणि आईला सांगू नका. ज्योतीचे लग्न ठरवताना तिचा भाऊ रिक्षा चालवतो ते कळलं तर तिचं लग्न होणार नाही. मी अजूनही मुंबईला मार्केटींग मॅनेजर आहे असंच त्यांना वाटतं.

मला वाईट वाटले - “सदू, मी हे कोणालाही कधी सांगणार नाही कारण जर ज्योती तुझी बहीण असेल तर ती माझी पण बहीण आहे."

सदू रिक्षा घेऊन परत फिरला.

## Coffee @ CCD

"मी नाव विसरले त्या पुस्तकाचं.. खरेदी कशी टाळावी.. किंवा खरेदी कशी वाईट सवय आहे असंच काहीसं होतं त्याचं नाव.."मी क्रॉसवर्डच्या सेल्समनला सांगत होते.

“मी तुझ्या बाजूलाच हातातलं मासिक चाळत तू त्या सेल्समनला काय विचारत होतीस ते ऐकत होतो. मला ठाऊक होतं त्या पुस्तकाचं नाव पण मी बोललो असतो तर तू "आलाय मोठा शहाणा", किंवा, "ही तरुण मुलं मुलींवर इम्प्रेशन मारायची संधी सोडतच नाहीत", किंवा "आगाऊ कुठला", वगैरे वगैरे वाक्यं मनात म्हणत कपाळावर आठ्या चढवशील असं वाटलं म्हणून मी गप्प बसलो. शिवाय तुम्हा दोघांच्या चालत्या बसमध्ये चढताना पडलो असतो किंवा कंडक्टरनं उतरवलं असतं तर?"

“मला कंडक्टर म्हणतोस?"

“बरं... ड्रायव्हर... खूष..?"

मी हसले. “बरं, मग तू काय केलंस?

“द सिक्रेट ड्रीमवर्ल्ड ऑफ शॉपोहोलिक, बाय सोफी किन्सेला.. मी बोललो. तुझ्या चेहऱ्यावरून असं वाटलं की ते पुस्तक तुला घ्यायचच आहे आणि ते नाही मिळालं तर तुझा विरस होईल म्हणून मी आगाऊपणा केलाच. पण तू लगेच 'ओह येस्' असं म्हणत

हसलीस आणि 'thank you सो मच' असं म्हणत माझ्या अगाउपणाचं स्वागतच केलंस.

‘‘होय,पण तुझा आगाऊपणा अजून संपला नव्हताच." मी हसतच म्हणाले.

‘‘हो? एकदा माहिती द्यायची तर पूर्ण द्यावी. जे जे आपणासी ठावे ते ते सर्वांसी सांगावे, शहाणे करून सोडावे, सकळ जन या मताचा मी आहे."

"हो की..! म्हणून तू लगेच ह्या पुस्तकावरून एक मूव्ही पण बनला आहे हे ही सांगितलस त्या डीवीडी सेक्शन कडे हात दाखवत. ‘‘कन्फेशन ऑफ अ शॉपोहोलिक."

"पण तेवढ्यावरच तू थांबलीस का? 'अगोदर मूव्ही पाहिला की पुस्तक वाचलं' असं तू मला विचारलं की!"

‘‘हा हा हा," मी हसून म्हणाले,’’पहलीही मुलाकात मे आप हमारा दिल जीतने कि कोशिश कर रहे थे। म्हणून मी पण हवा देत राहिले. पण तू उत्तर छान दिलंस...ऋ. लेखक आणि डायरेक्टरचा हेतू एकच आहे की लोकांनी इंपल्स बाईंग बंद करायला हवे. वाव..!"

‘‘पर आप ने हवा देते देते पंखे का स्पीड बढ़ा दिया। इतकी हवा दिली कि "पुस्तक वाचल्यावर आणि मूव्ही बघितल्यावर काही फरक पडला का?" असं तू विचारलं लगेच आणि संवाद वाढवायला सुरुवात केलीस...."

“हो आणि मूव्ही बघितल्यावरच मी हे शॉपिंग करतोय असं तू उत्तर दिलंस."

आम्ही दोघं हसलो. "मग काय झालं रे?" मी प्रश्न केला.

"मग काय होणार? आपण दोघं काउंटरवर बिल द्यायला गेलो, मी पाचशे ची नोट काढली तोवर तू पर्स उघडून तुझं आणि माझं दोघांचं बिल भरून टाकलं."

"मग?"

"मी सुटे पैसे घेऊन येतो असं मी तुला सांगितलं तर तू म्हणालीस की कशाला, फक्त पन्नास रुपये तर झालेत."

"मग?"

"प्लीज, जस्ट अ मोमेंट, मी म्हणालो आणि शेजारच्या स्टेशनरीच्या दुकानात गेलो, पेन विकत घेतले, पैसे सुटे केले आणि तुला दिले पन्नास रुपये." तू म्हणालास.

"मग?"

"मघापासून सारखं मग, मग, करती आहेस एविता तू, मगभर चहा हवाय का तुला?" तू बोललास.

"अरे, अरे, अरे, अरे, रुक जाओ ना जी, ऐसी क्या जल्दी असं मी मधुबाला सारखं गाणार होते रे पण तुला जायची घाई दिसली म्हणून मी काही बोलले नाही." मी उत्तर दिलं.

"घरी जाताना मी विचार केला की चालत्या बसमध्ये मी चढलो तरीही कंडक्टरने मला खाली का उतरवले नाही?."

“देन?" मी विचारलं.

"देन म्हणजे?" तू डोळे मिचकावत विचारलं.

“देन म्हणजे तू मघाशी ज्याच्यातून चहा देणार होतास ते." मी पण डोळे मिचकावले.

मला आणि तुला हसू आवरेना...

“देन आय वेंट होम, इंटो माय रूम अँड ओपण्ड द मॅगझिन.

Coffee @ CCD Malleshvaram? 6 p.m.Today. तू लिहिलेलं मी वाचलं."

“हाहाहा.. तुझ्या मनात काय विचार आला त्या वेळी?" मी परत हसत तुला विचारलं.

“मी विचार केला की चालत्या बसमध्ये मी चढलो, कंडक्टरने उतरवलं तर नाहीच, उलट बसायला जागाही दिली आणि तिकीट पण दिलं, फुकट. वा व्वा व्वाव्वा.."

मग आम्ही दोघं एकदमच जोरात हसलो आणि म्हणालो, "और शुरू हो गई अपनी लव स्टोरी."

# ओव्हरटाईम

वन फॉर द रोड असे म्हणून मी तो ओल्ड मंकचा पेग रिचवला आणि ३१ डिसेंबरच्या पार्टीला जमलेल्या सगळ्यांचा निरोप घेऊन पार्किंगमध्ये आलो. पाय जड झाले होते आणि मी गाडी कुठे पार्क केलीय तेही कळत नव्हतं. इथे तिथे शोधल्यावर शेवटी सापडली कार एकदाची. मी दार उघडून आतमध्ये धाडकन् बसलो. स्वतःला सावरायचा प्रयत्न केला. जरा वेळ डोळे मिटले पण चक्कर जास्त झाली. रुमाल भिजवून कपाळाला लावला तेंव्हा जरा बरं वाटलं.

कार सुरू करून हायवेला लागल्यावर काच खाली घेतली आणि थंड वाऱ्याची झुळूक आली तसं एकदम बरं वाटलं. शेजारच्या सीटवर दोन बिअरचे कॅन पडले होते. एक कॅन फोडून बिअर घेऊ असा विचार माझ्या मनात आला तेंव्हा समोर तो हात दाखवत उभा असलेला दिसला. मी लेफ्ट इंडिकेटर दाखवत गाडीचा १२० वेग कमी केला आणि त्याच्या जवळच गाडी उभी केली.

तो दार उघडून बसला देखील. "थॅन्क्स बडी." तो म्हणाला.

मी हसलो. "अरे, एवढ्या अंधारात, इतक्या लांब हायवेवर? गाड्यांच्या हेडलाईटचा त्रास होत नाही..?

"मला उजेड आणि अंधार सारखेच. मला सर्व मनुष्य पारखेच. गेली पन्नास वर्षे इथे मी उभा. न्याहाळत इथल्या माणसांच्या सभा.." तो हसत म्हणाला.

" व्वा! क्या बात है, शीघ्रकवीजी," मी गाडी सुरू करुन रस्त्याला लागत, " इसी बात पे हो जाए दो दो घूंट," म्हणून दोन्ही बिअरचे कॅन उघडून एक त्याच्या समोर धरला.

त्याने बिअरचा कॅन हिसकावला आणि "ओ डिअर, नो बिअर, नो चीअर अँड आय डोन्ट केअर" असं म्हणत कॅन खिडकीतून बाहेर फेकून दिला.

मी आ वासून त्याच्याकडे पाहिले. मला आश्चर्याचा धक्काच बसला. "व्हॉट द फ..." मी बोललो.

"प्रत्येक पाच मधला एक अपघात, ड्रिंक अँड ड्राईव्हनेच होतो घात." तो म्हणाला, "त्यात ड्रिंक करून जेवढे मरतात, त्यापेक्षा जास्त त्यांच्या गाडीखाली येऊन मरतात. ते निर्दोष असतात."

"अरे, तू माणूस आहेस की कोण आहेस," मी संतापाने थरथरत त्याला म्हणालो," एकतर तुला मदत केली तर तू माझे बिअर कॅन फेकून दिलेस आणि वरती भाषण देतो आहेस? मी कोणाला गाडीखाली चिरडलं नाहीये आणि मी मरणार पण नाहीये.

बघ ही बिअर कॅन अजून एक." असं म्हणून मी कॅन उघडला आणि तोंडाला लावला.

तो माझ्याकडे बघू लागला. " तुझं काही खरं नाही," स्पीड लिमिट आहे ऐंशी आणि तू एकशेविस वर चालवून करतोयस ऐसी की तैसी."

"मग, काय झालं त्यात?"

"मेलास तर?"

"हाहाहा.. मी मेलो तर तू राहशील काय जिवंत?"

" हाहाहा," माझ्यासारखा तो ही हसला आणि म्हणाला," मी कधी म्हणालो की मी आहे जिवंत?"

मी त्याच्याकडे पाहिले. माझ्या अंगावर सर्रकन काटा आला. " तू इथे उतर, मला तू अजिबात नकोयस माझ्या गाडीत," असे म्हणून मी स्टीअरिंग डावीकडे वळवले आणि त्याने ते घट्ट धरून ठेवले. गाडी रस्ता सोडून खाली गडगडत गेली आणि मोठा आवाज करत झाडाला जाऊन धडकली.

मी डोळे उघडले. मी आणि तो हायवे वर उभे होतो. पोलिस होते. माझ्या अंगावर रक्त वगैरे काहीच नव्हते. मला मात्र मी स्टीअरिंग वर पडलेला दिसत होतो. गाडीची काच फुटली होती

आणि समोरचे बोनेट झाडात घुसले होते. क्रेन धडधडत होती. एमबुलन्स उभी होती.

"आजपासून तू माझा असिस्टंट," तो म्हणाला, " एकशे वीस वेगात येणाऱ्या गाडीला हात करायचा आणि गाडीत बसायचं. पुढे त्याने काही चौकशी केली की म्हणायचं "मला उजेड आणि अंधार सारखेच. मला सर्व मनुष्य पारखेच. गेली पन्नास वर्षे इथे मी उभा. न्याहाळत इथल्या माणसांच्या सभा.... आणि हो," तो पुढे म्हणाला," ३१ डिसेंबरला ओव्हरटाईम करावा लागतो बरं का..."

# इंदूर फ्लाईट

मी आता आई होणार हे कळलं तेंव्हा काही काळानंतर मी नोकरी सोडण्याचा विचार केला आणि मग घरी राहू लागले. ऋषिन मात्र ऑफिसमधून दर दीड दोन तासांनी फोन करायचा आणि मी कशी आहे याची विचारपूस करायचा. मी आणि ऋषीन एकाच ठिकाणी एकाच प्रोजेक्ट वरती काम करायचो. कधी तरी त्याला काही अडलं तर मला विचारायचा. तो भावनिक होता आणि समजूतदार ही होता. एकदा असंच त्यानं मला काहीतरी विचारलं आणि मी चिडले आणि फोन आपटला. माझ्या आताच्या स्थितीत मी जरा जास्तच चिडचिड करत होते.

"का चिडलीस?" असं त्यानं घरी आल्यावर विचारलं तेंव्हा माझ्या आताच्या स्थितीला तुझे उद्योगच जबाबदार आहेस असं मी त्याला म्हंटले तर "इस बिज़नेस में आप मेरी बराबर कि पार्टनर है, पार्टनर..." असं म्हणत हसत सुटला. माझा चिडका स्वभाव त्याला माहिती होता पण तो शांत आणि समंजस होता. शब्दाने शब्द वाढत जातात आणि आवाज चढत जातो हे आम्हा दोघांनाही माहित म्हणून संवाद आता विसंवाद होतोय हे त्याच्या लक्षात पटकन यायचं आणि तो लगेच त्याला कलाटणी द्यायचा. मला ते जमायचं

नाही. मी तर माझ्या आई आणि बहिणीशी पण वाद घालायचे. अर्थात् नंतर सॉरी म्हणून सावरून घ्यायचे पण एकदा काच तडकली की तडकली.

एकदा असंच ऋषिन आणि मी विसंवादाच्या सीमेवर पोचलो आणि तो म्हणाला, " आता कळलं एवीता, लग्नात मी तुझ्या बाबांच्या पाया पडलो तेंव्हा ते मला'ऑल द बेस्ट' असं का म्हणाले."

माझ्या लक्षात पटकन काही आलं नाही. नंतर लक्षात आलं आणि " क्काय....?" असं म्हणत मी त्याला पकडायला गेले तेंव्हा मी पुढं काही म्हणायच्या आत माझ्या ओठावर ओठ ठेऊन त्यानं माझं तोंड बंद केलं.

लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी मी त्याला म्हणाले" ऋ... तू माझं नाव का बदललं नाहीस रे..? एवढं तुला आवडतं माझं नाव?.. सांग ना.."

" अगं माझ्या मनात होता बदलायचा विचार, मी तांदळावर लिहिणारच होतो, पण नाव बरच मोठं होतं म्हणून विचार बदलला." त्याने मला जवळ ओढत उत्तर दिलं.

मला उत्सुकता लागली. " हो? मोठ्ठं नाव..? सांग बरं काय लिहिणार होतास ते...? सांग लवकर.. "

" राहू दे एवी, एवीतेवी तुझं आहे तसं ठेवलंय तर राहू दे. मला तुझच नाव जास्त आवडतं. काय बेस्ट नाव ठेवलंय ग तुझं तुझ्या बाबांनी..! ऑसम..! " माझ्या केसात नाक खुपसून तो म्हणाला " अल्फाबेट ए वरून एकदम व्ही वर...! झेड पर्यंत का नाही गेले काही कळलं नाही."

" पुरे आता चेष्टा," मी बोलले, "सांग लवकर काय ते तुझं मोठ्ठं नाव..."

" सांगतो," तो म्हणाला, " मी लिहिणार होतो,.... तडकेश्वरी....."

मी त्याच्या छातीवर गुद्दे मारले. त्यानं मला करकचून धरलं. " मी पण तुझं नाव बदलणार होते, " मी म्हणाले, " मर्कटेश्वर ठेवणार होते..."

" त्यांनी काही फरक पडला नसता. आपण माकडाचे पूर्वजच आहोत..." तो उत्तरला.

माझे दिवस जसजसे जवळ येऊ लागले तसं माईला बोलावून घेऊ या आता असं तो म्हणाला. माई म्हणजे माझ्या सासूबाई. माझा चिडका स्वभाव त्यांना माहित होता आणि असंच एकदा त्यांच्या बरोबर वाद झाला होता तेंव्हा ऋषिन अगदी शांत बसला होता. " तुझ्या डोक्यावर ही मिरे वाटणार रे बाबा" असं म्हणत

दुसऱ्या दिवशी त्या इंदूरला, इशानकडे, ऋषिनच्या मोठ्या भावाकडे निघून गेल्या. इशान त्यांचा जास्त लाडका. इकडे येत असत तेंव्हा इशान, माझ्या मोठ्या जाऊबाई इरा आणि नातू इप्सित यांच्या बद्दलच जास्त बोलत असत. इरा माझ्याशी अगदी छान वागायची. मोठी जाऊ म्हणून "जाऊ बाई जोरात" असा काही प्रकार नव्हता. इशानचे लग्न ठरवून झाले होते आणि माझा प्रेम विवाह म्हणून त्या अशा वागायच्या असा माझा कयास. माझ्या लग्नात त्यांना दिलेली पैठणी आम्ही अगदी येवल्याहून आणली होती. पण त्यांना रंग आवडला नाही. नंतर त्या डोहाळ जेवणात नेसल्या होत्या एकदा. ऋषीन वर त्यांचा जीव नव्हता असं नव्हे. शेवटी तो शेंडेफळच.. माई आल्या की अगदी त्यांच्या अवती भोवती करायचा. " मम्माज बॉय "! सगळे हजबंडज् असेच असतात बहुतेक.... आपल्याला कुठे मम्म्माज गर्ल बनता येतं...? आईशी सूत जुळत येतं तो पर्यंत बोहोल्यावर चढायची वेळ येते. सासूला नुसतंच म्हणायचं आई, आणि ते ही बहुवचनात... अहो आई.. ए आई म्हणण्यात जो गोडवा आहे तो अहो आई म्हणण्यात कसा येणार? सो फॉर्मल... कशा जुळतील मग नाती...?

संध्याकाळी ऋषिनने इंदूरला फोन केला. " माई, तू येतेस ना? एविता वाट बघतेय तुझी..." अं...? हां.. हां... हो.. हो का..? बर... ठीक आहे. तसच करू. चल.." त्याने फोन बंद केला.

" काय रे, काय म्हणाल्या माई?" मी विचारलं.

" ती तुलाच यायला सांगतेय, ती येणार नाही म्हणाली. एविता आली तर बरं वाटेल, शिवाय इरा पण मदतीला आहे असं म्हणत होती.." तो उत्तरंला.

" माझ्याशी बोलल्या पण नाहीत," मी मुसमुसले. " जाऊ दे... मी माझ्या आईलाच बोलावून घेते. तेच बरं..."

रात्री ऋषीन जेवण झाल्यावर गझल ऐकत बसला होता. निदा फ़ाज़लीनी लिहिलेली ती गझल....

बेसन की सोंधी रोटी पर खट्टी चटनी जैसी माँ,
याद आता है चौका-बासन, चिमटा फुँकनी जैसी माँ।

बाँस की खुर्री खाट के ऊपर हर आहट पर कान धरे,
आधी सोई आधी जागी थकी दुपहरी जैसी माँ।

चिड़ियों के चहकार में गूँजे राधा-मोहन अली-अली,
मुर्गे की आवाज़ से खुलती, घर की कुंडी जैसी माँ।

बीवी, बेटी, बहन, पड़ोसन थोड़ी-थोड़ी सी सब में,
दिन भर इक रस्सी के ऊपर चलती नटनी जैसी माँ।

बाँट के अपना चेहरा, माथा, आँखें जाने कहाँ गई,
फटे पुराने इक अलबम में चंचल लड़की जैसी माँ।

ज्युनिअर ऋषीनने माझ्या पोटात आतून एक धडक दिली. बाप रे... ही बालकं आता लाथा मारतात आणि नंतर आईच्या अवती भोवती घोटाळतात. या लाथांचं प्रायश्चित्त घेतात बहुतेक....दिन भर इक रस्सी के ऊपर चलती नटनी जैसी माँ।... किती कष्ट घेते आई एका बाळाला वाढवताना... जन्म देताना तर अगदी मरणाच्या दारातूनच परत येते ती... बाळाचा श्वास आणि आईचा श्वास एकसाथ चालत असतो. बाँट के अपना चेहरा, माथा, आँखें जाने कहाँ गई.... खरंच... आपल्या हाडामांसाचा गोळा... माईना ऋषीनला मोठं करताना किती त्रास झाला असेल... सो व्हॉट इज रॉंग इफ ही इज मामाज बॉय....? मला पण माझा मुलगा आईभक्त असलेला आवडेलच की....

माझं वागणं चुकतंय बहुतेक. ऋषीनचं आडनाव मी लावतेय आता... माई माझ्या आईसारख्याच... कितीही माझ्याशी वाईट वागल्या तरी मलाच समंजसपणा दाखवावा लागेल. या नात्याची उकल करावी लागेल. ही नातीगोती म्हणजे रेशमाच्या धाग्यांची गुंतागुंत... ती सोडवताना वेळ लागणार च.. लागू दे वेळ... जगजीत

सिंग म्हणतो ना.." गांठ अगर लग जाए तो फ़िर रिश्ते हो या डोरी...लाख करे कोशिश खुलने में वक्त तो लगता है.... माईना ह्या ओळी माहिती नसतील कदाचित पण मला तरी ठाऊक आहेत ना....

मी उठले. आईला फोन करायचा नाही असं ठरवलं. परवा सकाळचं इंदूरचं फ्लाईट बुक केलं.

मला मोबाइल हाताळताना बघून ऋषीन जवळ आला.

" आई ना फोन करतेस का?" त्याने विचारलं.

" फ्लाईट बुक करतेय.." मी सांगितलं.

"व्वाव.. आपण जाऊ त्यांना एअरपोर्टवर घ्यायला.. केंपेगोवडाला जायला वेळ लागतो..कधीची फ्लाईट आहे?"

"डे आफ्टर टूमॉरो"

" अरे व्वा! मेरी सास आ रही हैं मेरी सांस को देखने के लिए, ऐ ट्रैफिक हट जाओ दे दो राह जाने के लिए...."

" हे दोन वेळा सास सास काय ते कळलं नाही. दुसरी पण सासू आहे का तुला...?"

" मेरी मां," मला हात जोडत तो म्हणाला, "पहिलं सास म्हणजे तुझी आई आणि दुसरं सांस आहे.. सा नाकातून.. सां.. म्हणजे श्वास.. तू माझा श्वास आहेस ना.."

" चलो... उठो.." मी हसत म्हणाले, " बटरिंग बहुत हो गया.. मुझे नींद आ रही है..."

" तेरी निंदिया रे.." तो गाऊ लागला,. " आय हाय तेरी निंदिया रे.."

" बिंदिया आहे ते.." मी म्हणाले.

" बरं बाई.. काय फरक आहे सांग. तुझी निंदिया आणि बिंदिया दोन्हींचा मी आशिक..." त्याने माझे हात पकडले.

तिसऱ्या दिवशी सकाळी मी लवकर उठले. सगळं आवरलं आणि एअरपोर्ट वर जाण्यासाठी आम्ही निघालो. माझी ट्रॉली बॅग बाहेर आणली आणि कुलूप लावलं. हा गाडी बाहेर काढत होता. त्याने माझी बॅग बघितली आणि त्याचे डोळे विस्फारले.

" अगं ही बॅग कशाला..? आपण आईना आणायला चाललोय... सोडायला नाही.."

" ऋ... मी इंदूरला चालली आहे. माईकडे" मी त्याला सांगितलं," मला बोलावलंय ना त्यांनी... मी आले तर बरं वाटेल असं म्हणाल्या ना...? म्हणून जातेय. हे बघ माझं तिकीट". मी पर्स उघडली आणि तिकीट दाखवलं.

त्यानं तिकीट हातात घेतलं आणि त्याच्या डोळयात टचकन पाणी तरळलं. तो वळला, डिकी उघडली आणि माझी बॅग आत

टाकली. दार उघडून तो व्हीलच्या मागे बसला. मी बसले, आणि त्यानं मला घट्ट धरलं.

" एवि.. तुम औरतोंको समझना मुश्किल ही नहीं नामुमकिन है... " तो म्हणाला आणि कार सुरू केली.

## सुरकुत्या

- अहो, बघा ना.... माझ्या चेहेऱ्यावर सुरकुत्या वाढायला लागलेत... म्हातारी झाले मी आता....

मी - अगं असू दे. छान दिसतेस.... अनुभवाची निशाणी म्हणजे सुरकुत्या.! मला तर मस्त वाटतायत. आठवतंय तुला? मी बऱ्याचदा निराश व्हायचो, हताश व्हायचो, तेंव्हां तू खळखळून हसायचीस आणि मनावरचे मळभ क्षणात दूर करायचीस. काही वेळा तर तू मला बरं वाटावं म्हणून माझ्या शिळया आणि त्याच त्याच विनोदांवर मनापासून हसायचीस. म्हणून त्या सुरकुत्या पडल्यायत. मला अशीच आवडतेस तू.

ती - हो, पण हे बघा की.... माझे डोळे कसे सुजलेले वाटतायत..... अरे… माझ्या डोळयाभोवती पण सुरकुत्या … डोळया खाली काळी वर्तुळ... काय म्हणतात याला... क्रोज फीट....?

मी - छान दिसतायत मला तरी अगदी. मी शिफ्टमध्ये काम करताना उशिरा घरी यायचो तेव्हा तू जागी असायचीच आठवतय ना? माझ्यासाठी जेवायची पण थांबायचीस तू. आणि मुलं मोठी होईपर्यंत तू किती रात्री जागवल्यास? मला वाटतं वर्षात त्याचा

हिशेब केला तर सहज पाच सहा वर्ष होतील. जास्तच. मग डोळयाभोवती काळी वर्तुळ होणारच कि. मला वर्षांतून एकदा हमखास ताप यायचा आणि तू माझ्या उशाजवळ बसून माझ्या कपाळावर ओला रुमाल ठेवायचीस, दर चार तासाला माझा ताप मोजून औषध द्यायचीस. तुला पाहायला मी आलो होतो तेंव्हाच तुझ्या निरागस डोळयांनी मला वेड लावलं होतं. तेंव्हापासून तुझ्या डोळया भोवती काय आहे मी बघतच नाही. फक्त डोळयात बघतो, आणि त्यात हरवून जातो अगदी.

ती - हो का? चष्म्याच्या काचेच्या आरपार?.... हा बघा ना पांढऱ्या केसांचा पुंजका.... भराभर वाढतायत पांढरे केस… डाय आणा उद्या... डार्क ब्राऊन....

मी - सुंदर प्रौढा वाटतेस.... मस्त रेशमी केस आहेत तुझे...त्या रेशमी केसांचा वास किती धुंद आहे म्हणून सांगू....? आणि तू डायच्या केमिकलचा वास घ्यायला सांगू नको गं... तुला जवळ खेचून, तुझ्या केसांचा सुगंध नाकात भरुन घेतल्यावर तुला गोल फिरवून तुझ्या मानेवर ओठ ठेवल्यावर अशी गोड शिरशिरी जाते ना अंगातून....! आणि मग तुझ्या कानाची पाळी हळूच चावायची.....! ये ना जवळ....

ती- चला... काहीतरीच तुमचं! खरंच मी आता म्हातारी झाले..... हे बघा माझे स्तन कसे लोंबतायत.... छे.. ही बोंडं पण आताशी टरारत नाहीत.....

मी - मुलांना पट्कन तोंडात देता यावं म्हणून तू ब्रेसीयर पण घालत नव्हतीस. आणि त्यांना पावडरीचं दूध द्यायचं नाही यावर तू ठाम होतीस. म्हणून आता ते लोंबतायत.... आणि शिवाय मी पण रात्री तोंडात.....

ती - बस. बस झाला चावटपणा.....! माझं पोट अलीकडे पाहिलंय का? चौथा पाचवा आहे असं वाटतंय. मला ते एक टमीटक् आणून द्या बरं.. स्किन कलर...

मी - अरे हो पण माझ्या बिअर बेलीचं काय? आधी बिअर आणि मग तुझ्या मस्त नवनवीन डिशेस...... आता माझं पोट तुला मॅचींग होतंय तर काळजी कशाला प्रिये? तू हल्ली ती स्त्रियांच्या अंतर्वस्त्राची चित्रं असलेली तकतकीत मॅग्स बघतीस ना ती कॉस्मोपॉलिटन, मॅक्सिम, वोग, एल...? म्हणून तुला तसं वाटतंय. त्यातले मॉडेल्स सगळे बनावट असतात.... कॉम्प्युटरवर फोटो शॉप केलेले फोटो आहेत ते. तू इथे अशी वास्तवात आहेस माझ्यासमोर.... तू मेरे सामने है, तेरी जुल्फें है खुली, तेरा आंचल है ढला... मैं भला होंश में कैसे...

ती - होश में आओ. सुहागरात नाहीय आपली. शिवाय आय अँम् ड्राय डाऊन देअर....

मी - होय. मी नोट केलंय. पूर्वी कसं तू रात्री मला ओढायचीस.. ओलीचिंब असायचीस.... आणि कसला आवेग असायचा तुझा... बाप रे...! वूमन ऑन टॉप तुझी आवडती पोजिशन....

ती - मी आसुसलेले होते अगदी मनासारखा मुलगा केंव्हा मिळतो म्हणून.... लग्नाअगोदर अंग असं पेटायचं ना... रात्री अंथरुणात पडले की माझा हात आपसूक ओटीपोटावरून खाली सरकायचाच. बोटांचा उपयोग कसा करायचा याचा नवीनच शोध लागला होता. आणि बाथरूममध्ये तो स्प्रे पाईप घ्यायचा आणि स्प्रेचा बरोबर नेम धरायचा... फ्लॉरेन्स मावशी येऊन गेली की मी बाथरूममध्ये जास्त वेळ बसायची तो स्प्रे घेऊन...लग्नाच्या पहिल्या रात्री मीच पुढाकार घेणार होते पण तुम्ही म्हणालात की विश्रांती घे, दमली असशील..... अरे हो, पण तुम्ही काय करत होतात लग्नापूर्वी? अजून एवढे चावट आहात तर लग्नापूर्वी कसं करत होतात?

मी - आमच्या पुरुषांचे हाल फार वाईट असतात बघ. तुम्हाला एक स्पेशल प्लेजर बटन असतं तसं आम्हाला नसतं. मग आम्हाला बाथरूम मधल्या स्प्रेचा उपयोग काय? तरी पण डोक्यात तेच

विचार असतात पुरुषांच्या. बसमध्ये गर्दीत एखादया स्त्रीच्या मागे चिकटून उभे राहायची पाळी आली की बायोलॉजी मधला धडा आठवायचा. शांपेन फसफसणार आता असं वाटलं की तिला 'माफ किजीये' असं म्हणत पुढें सरकायचं आणि उर्मी दाबून टाकायची.

ती - अरे रे..... काय करायचे तुम्ही मग?

मी - मग काय करायचे?... एकदा रात्री शेवटच्या बसने येत होतो. बस मधे फक्त दोन माणसं. मी केवल महिलायें असं बाजूला लिहिलेल्या सीट जवळ बसलो, आणि त्या शब्दातले व आणि म खरवडून टाकले. ही दोन अक्षरं काढल्यावर काय राहतं? ते करायचो.

ती -... हाहाहा.....अच्छा...लग्न झाल्यावर ते करायची गरजच राहिली नाही. होय ना?

मी - असं काही नाही. तू पहिल्यांदा डिलिव्हरीसाठी गेलीस माहेरी तेंव्हा करतच होतो की. पण तू आल्यावर जरूर भासली नाही..... ये ना आता जवळ..तुझं पोट आवडतं मला... तुझ्या नाभिप्रदेशावरून जिव्हेने प्रवास करावा असं म्हणतो.

ती - उईईई.... ऐकूनच अंगावर शहारे येतायत, आणि नाभिवरून तुमचा प्रवास सुरू होऊन दक्षिणेकडच्या डोंगर दऱ्यातल्या गुहेत संपतो ते मला ठाऊक आहे.

मी - अगं प्रवास करून थकल्यावर विश्रांतीसाठी गुहेत जायलाच हवं ना. पण गुहा काय.... पर्ली गेट म्हण. आणि त्याच्या दारावर कमळाच्या पाकळया. मग थकवा घालवायला त्याच्या आत असलेला मधु प्राशन करायलाच पाहिजे ना. मधुसेवनानंद स्वच्छंद हा धुंद.... घेई छंद...

ती - अहो अहो... मकरंद राव....हे पहा ना... पायावर व्हेरिकोज व्हेन्स... कोळयांच्या जाळयासारखं दिसतंय. गुडघे पण दुखतात.... स्टॉकिंगज् घेऊया उद्या....

मी - नक्कीच. आणि गुडघे तर बोलणारच गं.. मला साधी सायकल परवडत नव्हती तेंव्हा आपण मैलोनमैल चालायचो. आपलं स्वतःचं घर असावं म्हणून तू बचत करायचीस. कधी तक्रार केली नाहीस आणि कायम हसतमुख असायचीस. ज्याला हसतमुख बायको मिळते ना, तो खरा भाग्यवान बघ. मी बघतो ना माझे काहीं मित्र आणि त्यांच्या कजाग बायका..... आणि दूर चालत जाताना म्हणायचीस की मी बरोबर असलो तर हवेत तरंगल्या सारखं वाटतंय. विहिरीतून पाणी काढायचं आणि मग

वाहून आणायचं. खांदे दुखून जायचे तुझे आणि तरीही चपळपणा असायचा तुझ्याकडे. आळशी कधीच नव्हतीस. खरंच... तू किती गोष्टी सोडून दिल्यास, हौस मौज केली नाहीस कधीच.... आताचा आपला महाल बांधण्यासाठी.

ती - मनासारखा जोडीदार मिळाला की स्त्रीला बाकी सगळ्या गोष्टी मामुली वाटतात हो... आणि तुम्ही काय माझ्यावर कमी प्रेम केलंत? माझ्या टाचेत खिळा घुसला होता तेंव्हा दवाखान्यात तुम्हीच रडत होतात. मग रोज ड्रेसिंग काय, गोळ्या काय.. किती काळजी ती... बाहेरची कामं सगळी तुम्हीच करत होतात की...

मी - पण तू नेहमी, मी उठायच्या अगोदरच उठलेली असायचीस. दिवसातले पंधरा सोळा तास नुसती कामं....

ती - असू द्या. मला काही जड गेलं नाही कधी. पण आता बघा की.. माझी गोलाई कुठे हरवली. बेढब झालीय मी... फ्लॉरेन्स मावशी यायच्या बंद होतायत आता. एस्ट्रोजेन संपायला लागलंय.

मी - अगं होणारच असं... मी पण बेढब झालोय. टक्कल पडलं की आता. केस पांढरे झालेत. मी डाय लावत नाही ना? तू पण लावू नकोस. स्वतःची तुलना त्या बनावट मॉडेल्सशी करू नकोस.

इतिहासात डोकावशील तर तुला कळेल की सुन्दर नसणाऱ्या बायकांनी जगाला सुन्दर बनवलंय. इंटरनेट आधीचा काळ आठव. स्त्रिया एवढ्या वेड्या नव्हत्या मेकअप च्या मागे. फक्त फिल्मी तारकाच मेकअप करायच्या. दर शंभर मीटर वरती ब्युटी पार्लर नसायचे. माझी आई साबण लावून तोंड धुवायची की झाला तिचा मेकअप. डझनभर हेअर स्टाइल वगैरे काही नाही. तुला माहिती आहे की. अगं खरं सौंदर्य अपूर्णतेत आहे. काहीतरी कमी असलं की एक हुरहूर लागते पण ती हुरहूर सुखावते. चंद्रावर डाग असतो तसा. चाफेकळी नाकापेक्षा नाक जरा अपरं असलं की मस्त दिसतं. गालावर तीळ असला की काय खुलून दिसतं सौंदर्य! दौलते हुस्न पे दरबान बिठा रक्खा है असं वाटतं....! मेरलिन मन्रो म्हणाली होती, Imperfection is beauty, madness is genius and it's better to be absolutely ridiculous than absolutely boring.

ती - खरंय, थोडासा वेडेपणा करायला पाहिजे. थांबा, आलेच...................... हं...हे घ्या दूध.... पण कुतुबमिनारला पोचायला मात्र व्हाया आग्रा रूट घ्यावा लागेल.

मी - अरे.... पण तू म्हणालीस आय ॲम् ड्राय डाऊन देअर....?

ती - तुम्ही नाभिप्रदेशावरून जिव्हेने प्रवास करायला सुरूवात तर करा. पुढचा दिल्लीपर्यंतचा प्रवास आपण दोघं करू.

मी - वॉव....! लव्ह यू स्विटी.....!

ती - लव्ह यू टू..!

# वज्रासन

" वेलकम" द योगा गुरु सेज आफ्टर वुई सिट ऑन द मॅट. ही देन स्ट्राईक्स अ मॅच अँड बर्नस् द इन्सेंस, पुट ऑन दी रविशंकर सितार ऑन द आय पॅड अँड टेल्स अस टू टेक द लोटस पोजिशन, दॅट इज पद्मासन, अँड बिगिन अवर मेडीटेशन बाय बिकमिंग काम.

द मोमेंट आय ट्राय टू बिकम काम, द डेल्यूज ऑफ थॉट्स स्टार्ट एंटरींग अँड फिलींग माय ब्रेन, दे रन हेल्टर अँड स्केल्टर अँड हॉवेवर हार्ड आय ट्राय, आय कान्ट पुट देम अवे.

दॅट योगा गाय सेज," थॉट्स विल स्टार्ट एण्टरिंग इंटो युअर माईंड बट यू डोन्ट हॅव टू वरी. लेट देम कम. वेलकम देम. डोन्ट ट्राय टू गेट रीड ऑफ देम. स्लोली गेन कंट्रोल ओवर युवर ब्रीदिंग अँड कॉनसंट्रीट".

वंडरफुल. दॅट्स व्हॉट आय एम डुईंग. व्हाईल डुइंग सो, द लाँग ब्राऊन हेअर टाईड इन अ बन ऑफ धिस गर्ल जस्ट अहेड ऑफ मी इज डिस्टरबिंग माय थॉट्स. न्यू एन्ट्रन्ट इन द क्लास. माय आईज ट्रॅव्हल फ्रॉम दॅट हेअर बन टू हर नेप ऑफ नेक अँड स्टे देअर. हर ब्राऊन हेअर हॅव कर्ल्ड इन एनी वीच वे दे वॉन्ट..

"क्लोज युवर आईज, ब्रीद स्लोली." आय एम स्टार्टल्ड...! आय क्लोज माय आईज. व्हाय धिस योगा गाय टेल्स मी टू क्लोज माय आईज आय डोंट नो. द हुक ऑफ हर ब्लॅक ब्रेसियर इज विजिबल थ्रू हर थिन व्हाइट टी शर्ट इज मेकिंग मी रेस्टलेस. आय विजुअलाइज माय सेल्फ पुटींग माय लीप्स ऑन द नेप ऑफ हर नेक... इअरलोब... अँड देन स्लोली मर्मर इन हर इअर दोज थ्री मॅजिक वर्डस.. सो रोमँटिक... आय हॅड रेड समव्हेअर दॅट नेप ऑफ नेक इज अँन इरोजिनस झोन... महर्षी वात्स्यायन परहॅप्स...

"नाउ ड्राइव अवे ऑल द टॉक्सिक थॉट्स फ्रॉम युवर माइंड अँड रिप्लेस देम विथ प्युअर, क्लीन अँड पायस थॉट्स" योगा गुरु सेज.

आय एम स्टार्टल्ड अगेन... वेअर दे टॉक्सिक थॉट्स विच वेअर लींगरिंग इन माय माईंड?

"टॉक्सिक थॉट्स लाइक अँरोगन्स,एन्वी,अनग्रेटफुल नेस, फ्यूटीलीटी, नार्सीसिजम." योगा गुरु सेज. डीड ही से लस्ट, लेचरी, क्रेविंग ऑर बायोलोजीकल फिलींग्ज? नो... नो. नॉट एट ऑल... वाव! ग्रेट! आय एम रीलिवड!

"इन्वोक द फोर्सेस ऑफ लाईट अँड गुडनेस. इ मॅजिन युवरसेल्फ सराऊंडेड बाय ए शिल्ड ऑफ लाईट. डोन्ट थिंक ब्लॅक."

हर ब्लॅक ब्रेसीयर अॅट वन्स जम्पस् बिफोर माय आईज. आय इमॅजिन अनहुकिंग इट.... एम आय नॉर्मल?... ऑफ कोर्स! माय माईंड सेज... रिसर्च सेज सेक्शुअल फँटसी इज जेनेटिक हेरिटेज ऑफ ए मॅन.....

" नाऊ लेट अस चांट अ मंत्र फाईव टाइम्स अँड देन फिनिश. "ॐ पूर्णमद: पूर्णमिदं पूर्णात् , पूर्ण मुदच्च्यते, पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्ण मेवावशिष्यते।

ॐ शांति: शांति: शांतिः...

धिस योगा टीचर्स नेम इज मिस्टर महालींगम्.. व्हॉ....ट? महालींगम्..? आय वॉन्ट टू लाफ लाऊड ली बट कान्ट... लाँग बॅक माय टायपिस्ट हॅड मेड अ ग्रेव मिस्टेक.. ही फर्गोट टू पुट अ स्पेस बीट विन द वर्डस पेन अँड इज, इन अ सेंटेन्स "पेन इज माय टीअर दॅन अ स्वर्ड"...अ थॉट क्रॉसेस् माय माईंड.. धीस गुरुज नेबर्स मस्ट बी एन्वियींग हिम. नेबर्स एन्वि,ओनर्स प्रायीड... ओनिडा टी. वी... हाऊ हिज वाइफ मस्ट बी फिलिंग व्हेन समबडी कॉल्स हर मिसेस

महालींगम्......! बट महालींगम् इज एनी डे बेटर दॅन लघुलींगम्......!

आय एम गोइंग टु टेल माय यंगर सिस्टर टू बी वेरी केअर फुल व्हाईल चुजींग सरनेम ऑफ हर प्रॉस्पेक्टिव ब्राईडग्रूम.

" नाऊ टूडेज सेशन इज ओव्हर. टूमारो वुई विल लर्न वज्रासन अँड इट्स बेनेफिट्स. थैंक यू." योगा गुरु काँक्लूड्स.

शी गेट्स अप. माय आईज रन ओवर हर. प्रेटी वुमन! वाव!

आय वॉक टोवर्डस पार्किंग लॉट ऑल द टाईम सर्चींग फॉर अ ग्लिंप्स ऑफ हर. नो लक. आय ओपन द डोअर ऑफ माय कार अँड स्लाइड बी हाईंड द ड्रायव्हिंग व्हील.

वज्रासन ही सेड. आय फिश आऊट द योगा बुक फ्रॉम द बॅग केप्ट ऑन द पॅसेंजर सीट अँड लुक फॉर वज्रासन. आय रीड द डीसक्रीपशन.....! वाव!!!!! वंडरफुल..! ऑसम!

टूमारो आय मस्ट कम! कान्ट मिस..! कान्ट अफर्ड टू....! आय स्टार्ट द कार अँड स्टिरीओ. आय हीअर जॉन ट्रावोल्टा क्रूनिंग.. "आय गॉट चिssssल्स... दे..र मल्टीप्प्लायींग... अँड आयम लूजींग...ssss कंट्रोsssल...."

दॅट नाइट आय टॉस अँड टर्न इन द बेड वाईड अवेक थिंकिंग अबाऊट टूमारोज सेशन. " टिंग..!" सेलफोन नोटिफिकेशन. आय गेट अप. इट इज फ्रॉम योगा क्लास.

"ड्यु टू नेशन वाइड लॉकडाऊन ऑन अकाउंट ऑफ कोविड-१९,द योगा क्लासेस विल रीमेन क्लोजडं फ्रॉम टू मारो टिल फर्दर नोटीस. इन्कनविनीयन्स इज रिग्रेटेड".

आय फॉल बॅक ऑन द बेड, माय हँड्स पॅरालाल टू माय बॉडी, अँड इट टेक्स डेड बॉडी पोजिशन, दॅट इज शवासन.

# होस्कोटे रोड

(१) ऋषींनची कार पोर्चमध्ये आल्याचा आवाज आला तसं मी दार उघडून ठेवलं आणि सोफ्यावर बसले. पोर्चमध्ये आला की तो दोनदा हॉर्न वाजवतो.

" ऋषि आला का गं?" माईनी त्यांच्या बेडरूम मधूनच आवाज दिला.

" हो माई," मी त्यांच्या बेडरूम कडे जात उत्तर दिलं, "आताच आलाय, तुम्ही झोपा माई आता शांतपणें." मी त्यांच्या बेडरुमचं दार लावून घेतलं.

" माई झोपली?" ऋषीन् ने आत येत विचारलं.

" होय. हळू बोल."

" आज बॉस म्हणवून घेणाऱ्या वेणुगोपाल नामक राक्षसाने घरी निघतानाच काम सांगितलं. दहापर्यंत काम संपेल असं मला वाटलं पण मी तुला मुद्दाम अकरा सांगितलं." ऋषिन् म्हणाला. "तू ओरडणार मला ठाऊक होतं. अगं शेवटी बारा वाजलेच. तिप्पण्णा म्हणालाच 'होगरी साहेबरं इन्न मनिगे'. पार्किंगमध्ये आलो आणि तुला फोन करावा म्हणून मी फोन बघितला तर बॅटरी अगदी लो...

आणि तुझं टेंपर इकडे हाय असणार याची खात्री होती. बॅटरीचं चार्जिंग आणि तुझं टेंपर नेहमी व्यस्त प्रमाणात असतं ते मला माहित..." ऋषिन् दार लावत हसत म्हणाला.

"तू खाल्लंयस का काही?" मी विचारलं.

" येस, दहा वाजता तिप्पण्णा टिफीन घेऊन आला होता."

" बरं, पुढे..?"

" मी गाडी सुरू करून चार्जर लावला आणि पार्किंग मधून बाहेर पडून, घरी लवकर यावं म्हणून होस्कोटे रोड पकडला." ऋषिन् बुटाची लेस काढत सांगत होता.

"काय? होस्कोटे रोड?" मी प्रश्न केला.

"होय. गाडी इतकी थंड झाली होती, मी हीटर चालू केला आणि गरम हवेची झुळूक आल्यावर मस्त वाटलं बघ.." तो सॉक्स काढत बोलला.

"रस्ता सुनसान आणि गर्दी पण कमी होती. बरं झालं म्हटलं होस्कोटे रोड कडे गाडी वळवली. रस्त्याचे लाईट बंद होते. फक्त माझ्याच गाडीचे हेड लाईट काळयाकुट्ट रस्त्यावर. समोरून एक गाडी येत असेल तर शपथ. दोन तीन किलोमीटर आलो आणि मग बॅटरी जराशी चार्ज झाली असेल तर तुला फोन करावा म्हणून गाडी बाजूला घेतली आणि बघितलं तर चार्जरची वायर सॉकेटमध्ये

बसलीच नव्हती. मग वायर सॉकेटमध्ये बसवली आणि परत गाडी सुरू करून समोर पाहिलं तर एक आकृती उभी असलेली दिसली. मी स्टिअरिंग व्हील वर हात ठेवला तशी ती व्यक्ती हळू हळू चालत गाडीजवळ आली आणि समोर उभी राहिली." ऋषिंन् माझ्याजवळ येऊन शेजारी बसला.

" पुढे?"

" ती एक म्हातारी होती. पांढऱ्या मळकट साडीमध्ये आणि काळया जुन्या फाटलेल्या चादरीने तिने तिचे अंग लपेटून घेतले होते. मुरडलेला, सुरकुतलेला चेहरा, खोलगट डोळे पाठीत वाकलेली, सैलसर राखाडी केस, आणि थंडीने थरथर कापणारी ती म्हातारी काचे जवळ आली आणि तिने टकटक केले. मी काच खाली केली. " होस्कोटे सनेक मनी अदा अण्णा, बिडतिया..?" असं घोगऱ्या आवाजात म्हणाली. होस्कोटे जवळ तिचं घर आहे तर आपण तिला सोडूया म्हणून मी तिला "बारम्मा, कुतगोळव्वा" असं म्हणत दरवाजा उघडला. दरवाजा उघडताच थंड वाऱ्याची झुळूक आत शिरली आणि जरासा कुबट वास पण आल्यासारखं वाटलं. मी शहारलो.

"तू मला टरकवायचा विचार करत असशील तर सॉरी" मी म्हणाले.

"मी.. आणि तुला टरकवणार? मीच टरकतो तुला..." ऋषीन् बोलला.

मी हसले. "बरं बरं.. पुढे सांग काय झालं ते" मी म्हणाले.

"मुला, तुझे नाव काय आहे?" तिने सीटवर बसत विचारले.

"ऋषिन् अद अव्वा" मी गाडी सुरू करत उत्तर दिले.

"दुर्वास ऋषी?" तिने प्रश्न केला.

"इल्ल अव्वा," मी हसलो, "नुसताच साधा ऋषी. लेडी दुर्वास आमच्या घरी आहे."

मी त्याच्याकडे बघितलं. "हो का? आणि कधी कधी तुझ्या अंगात जमदग्नी संचारतात त्याचं काय? ते नाही सांगितलस त्या म्हातारीला?"

" अगं ते कधी कधी, वर्षातून एकदा... किंवा फारफार तर दोनदा...तू तुझे केस वरती बांधतेस बघ रविवारी केस धुतल्यावर, त्यावेळी मी तुला लांब दाढी आणि मिशा उगवल्या आहेत आणि तू एखाद्या ऋषिसारखी दिसतेस असं मी इमॅजिन करतो आणि न्हाल्यावर चार दोन केस गळालेले असतात तुझे म्हणून तू चिडचिड करत असतेस तेंव्हा तर दुर्वास...."

मी कपाळावर आठया आणत त्याच्याकडे बघितलं.

" सॉरी सॉरी, अगं मला म्हणायचं होतं की तेंव्हा तर तुझ्या धुतलेल्या केसांचा सुवास...."

" थांब, तुला बघते आता.." मी म्हणाले, आणि त्याच्या अंगावर बाजूला असलेली उशी फेकली. तो लांब सरकला आणि म्हणाला, "तू चिडल्यावर इतकी छान दिसतेस ना एवी.... की दिल चाहता है के..."

"इनफ... माई उठतील. पुढे सांग काय झालं ते." मी म्हणाले.

चार पाच किलोमीटर गेल्यावर मी म्हातारीला,“ तुला कुठे सोडू?” असं विचारलं. तिने उत्तर न देता माझ्याकडे पाहिले. तिच्या डोळ्याच्या ठिकाणी खोबणीच दिसली. अजून दोन तीन किलोमीटर पुढे आल्यावर मी परत म्हणालो, 'तू मला कुठे जायचेस ते मला दाखव म्हणजे मी तुला तिथेच जवळ सोडतो घराजवळ.”

" इथेच उतरव. मला त्या गल्लीत जायचयं" ती म्हणाली.

"इथे?" मी विचारलं. दोन चार कुत्र्यांचा रडका आवाज येत होता. एक दोन वटवाघळे घिरक्या घालत होती. नेमका त्याच वेळी चंद्र ढगामागे लपला आणि अंधारलं.

" होय, इथेच." म्हातारी म्हणाली.

"अगं त्या गल्लीत तर स्मशान घाट आहे," मी तिला सांगितलं."

"म्हातारीने तिची मान वळवली आणि....."

" बस्.." मी ऋषीनला सांगितलं. "नको सांगू पुढचं..."

" ऐक तर खरं, मला उशीर का झाला ते.." तो बोलला.

तुला सांगायचं असेल तर इथे माझ्याजवळ येऊन बस आणि सांग." मी म्हणाले.

ऋषिन् माझ्या जवळ येऊन बसला. मी त्याला चिकटून बसले.

"मग म्हातारीने तिची मान..." तो घोगऱ्या आवाजात म्हणाला.

"मला काही ऐकायचं नाही." मी उठत म्हणाले, तू आलायास ना आता.. चल आता झोपायला जाऊया. अगोदरच उशीर झालाय."

"ऋ," दुसऱ्या दिवशी ऋषिन् ऑफिसला निघते वेळी सॉक्स चढवत होता तेंव्हा मी त्याला म्हणाले," हे बघ, यायला उशीर होत असेल तर हॉस्कोटे रोड वरून येऊ नकोस. नेहमीचा रस्ताच घे. उशीर झाला तरी चालेल."

"ओके डिअर,"आपका हुकुम सर आंखों पर," तो हसत म्हणाला, " पण एवी, का येऊ नकोस त्या रोडने? इज एनिथिंग रोंग विथ दॅट रोड?"

"दॅट रोड इज हाँटेड." मी सांगितलं.

ऋषि ने डोळे विस्फारले.. " ओ गॉड.. ओ गॉड." तो उद्गारला.. "ओहक्के.. अच्छा, म्हणून तू काल टरकली होतीस तर..! मला चिकटून झोपलीस ते... टरकेश्वरी...!"

" ही कुठली रे नवीन देवी?...टरकेश्वरी..? आणि कुठे आहे रे हे मंदिर, टरकेश्वरीचं?" माई बाहेर येत बोलल्या.

" अगं तारकेश्वरी.. मंदिर बांधतायत इकडे मागे.. देवी अगदी जवळच आहे.." ऋषिन् ने माझ्याकडे बघत डोळे मिचकावले आणि माईना 'येतो आई' असे म्हणत दाराबाहेर पडला. मीही त्याच्या मागे पोर्चमध्ये जाऊन उभी राहिले. त्याने गॅरेज मधून गाडी बाहेर काढली आणि माझ्या जवळ थांबवली.

" तू कालच्या रोडने येवू नकोस," मी म्हणाले, " काल आलास तेवढं बास्स. कळलं का?"

" मी काल त्या रोडने आलोच नव्हतो," तो मिस्किल हसत म्हणाला.

मी स्तिमित झाले. "काय म्हणालास? तू होस्कोटे रोडवरून नाही आलास?"

"नाही.. " तो अजूनही हसतच होता. "मला माहिती आहे तो रोड हॉंटेड आहे ते.."

"मग ते काल रात्री सगळं सांगत होतास ते त्या म्हातारीबद्दल ते?"

"ते मी तुला थापा मारल्या.. हा हा हा.."

"का थापा मारल्यास...?"

"तू मला चिकटून झोपावीस म्हणून... हाहाहा...! बाय..."

त्याने गाडी सुरू केली. "यू लायर.." मी ओरडले पण तोपर्यंत तो गेटच्या बाहेर पडला देखील. मला हसूच आलं. मेन लाय मोअर दॅन विमेन हे मात्र खरं.

.........

(२) मी गेट बंद केलं आणि बघितलं तर पोर्चमध्ये माई उभ्या होत्या. "काय ओरडलीस गं एविता..? कुठले लॉयर?" त्यांनी विचारलं.

"काही नाही माई," मी उत्तर दिलं, "ये लवकर" म्हणून सांगितलं.

माई फुलं तोडायला बागेत थांबल्या आणि मी घरात परत शिरले. सकाळचा चहा गरम करायला गॅस पेटवला. चहाचा दुसरा राऊंड घेतो आम्ही दोघी ऋषी बाहेर पडला की. चहात दूध ओतून

मी पातेले चिमटीत पकडले आणि चहा दोन्ही कपात ओतला आणि कप डायनिंग टेबलवर ठेऊन माईना हाक मारली.

"एविता," माई टेबलावर बसल्या आणि हसत म्हणाल्या, "का ग आज आईची आठवण येते वाटतं तुला..?"

"नाही हो माई.." मी म्हणाले, "का हो माई, असं का वाटलं तुम्हाला..?" मी पुढे प्रश्न केला.

"मी बागेत असताना तू मला आई अशी हाक मारलीय असं वाटलं गं.." त्या म्हणाल्या.

मी गप्प बसले. "हो माई, बहुतेक म्हणाले असेन तसं.." मी बोलले.

"एविता, अगं ते आपले कानाचे डॉक्टर आहेत बघ.. व्हाईटफील्ड वाले, काय ग त्यांचं नाव..? माईनीं विचारलं, " त्यांची अपॉईंटमेंट घे बाई..."

"डॉ उप्पल. का हो माई? काय झालंय कानाला?" मी विचारलं.

"काहीतरी वेगळंच ऐकू येतंय बघ.." त्या म्हणाल्या, "सकाळी ऋषीन् तारकेश्वरी म्हणाला तर मला टरकेश्वरी ऐकू आलं, नंतर तू, ये लवकर म्हणालीस त्याला, तर मला यू लायर ऐकू आलं. मला

आई म्हणालीस की माई म्हणून हाक मारलीस ते ही नीट कळलं नाही." माई कप घेऊन बेसिनकडे जाता जाता म्हणाल्या.

"माई तुम्ही ठेवा तो कप, मी विसळते." मी म्हणाले आणि माझा कप घेऊन बेसिनकडे वळले.

"मग.. घेतीस ना अपॉइंटमेंट.?"

"हो माई, दहा वाजता क्लिनिक उघडतं तेंव्हा फोन करते."मी म्हणाले.

माई त्यांच्या खोलीत गेल्या. मी कप विसळू लागले. डॉक्टर काय म्हणतील ते मला आताच माहित होतं. ऑडिओमेट्री करा म्हणतील आणि त्याची भरमसाठ फी घेतल्यावर म्हणतील, " मिसेस रंगाचारी, तुमचे कान उत्तम आहेत. वयाच्या मानाने तुम्हाला जरा जास्तच चांगलं ऐकू येतंय!"

पण नंतर मला फार मोठा गहन प्रश्न पडला. जास्त खोटं कोण बोलतं? मेन ऑर विमेन?

# पिझ्झा बॉक्स

नेहमीच्या पिझ्झा आउटलेटला थांबव." आम्ही मंड्या या गावात प्रवेश केला तसं मी त्याला सांगितलं. म्हैसूर आता फक्त एकच तास.

"तुझी ही जंक फूड खाण्याची सवय बंद कर." तो गाडी लाल सिग्नलला थांबवत म्हणाला, "दर वीकएंडला इथे येताना तुझा पिझ्झा ठरलेलाच. एक वर्ष झालं आता लग्न होऊन. महिन्यात चार पिझ्झा. अठ्ठेचाळीस टू मच..." तो कपाळावर आठ्या चढवत बोलला.

"हे... हे... पावसाळ्यात आपण आलो नव्हतो आठ वेळा. आणि हे चाळीस पिझ्झा आपण दोघांनी मिळून खाल्लंय. आणि यू एस मध्ये तर दर सेकंदाला पाचशे स्लाइस खातात. दीडशे एकर दिवसाला."

"आपण यू एस मध्ये नाही."

"सिलिकॉन व्हॅलीमध्ये आहोत आपण. बेंगलोर इंडियाचं सिलिकॉन व्हॅली आहे ना...?"

"पिझ्झा इज अँन् अमेरिकन ओबसेशन. तू नको खाऊ. मी तुला पहिल्यांदा क्रॉसवर्डमध्ये भेटलो त्यावेळी कशी चवळीची शेंग

होतीस, साडी नेसल्यावर फक्त साडीच दिसायची, आणि आता....?" तो कपाळावर आठ्या आणत म्हणाला.

"आता ॲपल म्हणायचं आहे का तुला डिअर...? अँन ॲपल अ डे कीप्स डॉक्टर अवे... हाहाहा... आणि तू आयफोन कुठला वापरतोस? सांग की....!"

"मला तुला ॲपल म्हणायचं नव्हतं." सिग्नल हिरवा झाला तसं त्याने गियर बदलला आणि गाडीला वेग देत म्हणाला. " क अक्षरावरून आहे.. ओळख.."

"थांब. लेट मी गेस्.....काकडी?कोवळी की जून? काकडीची कोशिंबीर... ब्याडगी मिरची घालून फोडणी..! कांदा चिरून घालायचा..आणि दही.. अश्शी मस्त लागते, जरा दाण्याचा कूट... ओह... आताच पाणी सुटलं तोंडाला.....!"

"तू काकडी? छे.. नाही."

"कॉली फ्लॉवर? थॅन्क्स हनी.. शेवटी फ्लॉवर तरी म्हणालास रे... शोना मेरा..."

तो चौथा गियर टाकत म्हणाला," कॉली फ्लॉवर नाही. ओळख."

"कैरी? अरे तू.. अंग शहारून येतेय रे... तिखट,मीठ, एमटीआर मसाला लावलेल्या कैरीच्या फोडी... गुजबम्पस्...."

"कैरी नाही.."

"कॅप्सीकम्? अहाहा.. का रे माझा अंत बघतोस..? पिझ्झा...! आणि तो लार्ज वेगी पिझ्झा वुईथ चीझ... पाइनॲपल.. व्वा.. आज माझ्या तोंडाला पाणी सुटत राहावं असा बेत आहे तुझा की काही काँक्रिट जमवणार आहेस?"

"हेच ते.. पिझ्झा..! कॅप्सीकम् इज रॉंग."

"केळ? फेडरर आणि नदालची मॅच चालू असते तेंव्हा एक गेम संपला की राफा एक बनाना खातोच. खूप एनर्जेटिक असतो बनाना..."

" नो, नॉट बनाना."

"ओह्.. कांदा?...!अनियन.. वाव...!" मी जरा घुश्यातच उत्तरले, "आजपासून रात्री खाली फरशीवर गादी टाकून झोप. माझ्या शेजारी झोपू नकोस."

"का?"

"अँन अनियन अ डे किप्स एवरीवन अवे.. इंक्लुडिंग हजबंड."

"मी कांदा म्हंटलं पण नाही...."

मी काहीच बोलले नाही.

"का गं," तो बोलला, "क वरून फळं, भाज्या संपल्या की काय?"

"आहे की. कोबी म्हणणार आहेस तू मला. हो ना? कोबीचा गड्डा. हो ना..?"

"नाही."

"मग?.. कारलं? हो तेच. आहेच मी कडू. तू धारवाडचा मिश्रा पेढा आहेस ना गोड? असू दे मी आपली कडवट. नंतर मस्का लावत येऊ नकोस, आणि काय रे, तुला असं नाही वाटत की अगदी छोट्या गोष्टीला तू फार महत्त्व देतोयस?"

"ह्याच छोट्या गोष्टी आपल्यात अंतर निर्माण करतायत. गोष्ट फक्त पिझ्झाची नाही. तुला सकाळी वॉक घ्यायला सांगतो तर झोपून राहतेस. दोन दोन चमचे साखर घालून चहा पितेस. जिमला रेगुलर नाहीस. रोज दोरीच्या उड्या मारायला सांगतो तर दोन उडीतलं अंतर अर्धा तास असतं. यू हॅव बीकम लेझी."

" हो का? मी लेझी? आणि तू...? सकाळी तोंड न धुता चहा घेतोस. पांघरूणाच्या घड्या घालत नाहीस. पेपर घेऊन अर्धा तास आत बसतोस आणि ओला करून आणतोस. दाढी करतोस तेंव्हा बेसिनचा नळ चालू ठेवतोस. दाढी झाल्यावर ओ द कोलोन लावत नाहीस. बाथरूममध्ये तुझे कपडे अस्ताव्यस्त पसरलेले असतात.

अंघोळ केल्यावर टॉवेल बेडवर टाकतोस. इस्त्री करतोस आणि तसच ठेऊन जातोस. प्लग मधून वायर न काढता. ब्रेकफास्टचे प्लेट्स, चहाचा कप टेबलावर टाकून जातोस. डायनिंग टेबलपासून बेसिन किती लांब आहे? तेवढं उचलून तू ठेवत नाहीस. शर्टाची बटणं, बेल्टची बक्कल, पँटची फ्लाय एका रेषेत असायला हवीत. तुझी नसतात. पँट काळी असेल तर पायमोजे फेंट ब्ल्यू असतात. आणि वायसे वर्सा. पँट आणि सॉक्सचा रंग एकच हवा. ऐकतोस कधी? संध्याकाळी आल्यावर शूज रॅकमध्ये ठेवत नाहीस. सॉक्स लोळत राहतात. टाय, शर्ट, बेल्ट बेडवर फेकतोस. पँट हँगरला लावत नाहीस. त्यातले रुमाल दोंनदोन दिवस तसेच पडून राहतात. बर्म्युडा घालून सोसायटीत फिरतोस. जीन्स घालून फिरत जा असं मी तुला कितींदा सांगितलं." मी क्षणभर थांबले." ह्या नाहीत का छोट्या छोट्या गोष्टी?"

त्यानं गाडी पिझ्झा आउटलेटच्या बाहेर थांबवली आणि इंजिन बंद केलं. गाडीत शांतता पसरली.

" तुम्हा पुरुषांना काय रे... एक्स किंवा वाय क्रोमोसोम स्त्रीच्या गर्भाशयात टाकलं की तुमचा रोल संपला. पुढची सगळी उस्तवार आम्हालाच करायची. हे म्हणजे ९९ वर्षांच्या लिजवर गर्भाशय दिल्यासारखच." मी मुसमुसू लागले.

त्याने माझा हात हातात घेतला. डावा हात पाठीवर ठेवून थोपटू लागला. " सॉरी... स्वीटहार्ट.. सॉरी.. मी उगीच बोललो. सॉरी. चल पिझ्झा खाऊया."

"मला नको पिझ्झा."

"पुळीओगरे?"

"नको."

"बोंडा? भज्जे?"

"नो."

"बिसी ब्याळी?"

नाही

अन्ना सारू?

.....

मसरू अवलक्की?

....

"चित्रान्ना?"

....

"होळगी?"

.....

उप्पिन काई?

अरे, तू पदार्थांची नावं सांगतोयस की मेन्यू कार्ड वाचतोयस? मला काहीच नको."

"सॉरी. चल. काहीतरी खा."

"नाही उतरणार मी गाडीतून."

"बर. इकडे गाडीत आणू का?"

"नको. चल आपण जाऊ आता घरी. तासाभरात पोचतोय आपण. मीच बनवते बिशी ब्याळी गेल्यावर. चल."

त्याने गाडी स्टार्ट केली आणि थोड्याच वेळात गाडीने वेग घेतला.

" तुला ना, वजायना मोनोलॉग्ज कम्पल्सरी वाचायला लावणार आहे मी." मी त्याला तंबी दिली. "त्या शिवाय तुला वुमेन्स साईक कळणारच नाही. बहीण नाही ना तुला. तुम्ही दोघच भाऊ. एकतरी बहीण हवीच भावाला.राखी पौर्णिमा,भाऊबीज सगळंच मिस् करतोयस तू.. प्लस वुमन सायकॉलॉजी."

श्रीरंगपट्टण आल्याचा बोर्ड वाचला. हा बोर्ड वाचला की म्हैसूरचे वेध लागतात. म्हैसूरच्या हेब्बाळ भागात मागच्या वर्षी एक फ्लॅट घेतला होता. सेकंड होम. इन्फोसिसच्या जवळच.

पेट्रोल पंपावर त्याने गाडी थांबवली. "टँक फुल्ल करून घेतो." तो म्हणाला. मी उतरले आणि जरा लांब जाऊन उभी राहिले. पेट्रोल भरल्यावर माझ्याजवळ गाडी उभी केली आणि तो उतरला. मी प्रश्नार्थक चेहरा केला."टँक रिकामा करून येतो." असं म्हणत मला गाडीत बसून रहा असं सांगून तो टॉयलेटच्या दिशेने गेला. मला हसू फुटले.

" तुला जायचय का?" त्यानं गाडीचं दार उघडत विचारलं.

" नको. आलंच की घर आता जवळ."

"का हसतेस?" व्हीलच्या मागे बसत त्याने विचारले.

" ती समोर डॅशबोर्डवरची छोटी लाकडी बाहुली बघ ना कशी ठुमकतेय! नर्गिस नाचते ना चोरी चोरीमध्ये, राज कपूर सोबत. तशी. 'जहां मै जाती हूं वहीं चले आते हो...' हिला बाहुला आणायला हवा एखादा.."

" नक्कीच," तो गाडीला वेग देत म्हणाला, " तिला बघून तो, " सौ साल पहले, मुझे तुम से प्यार था, आज भी है..." असं म्हणणारच.

"माझ्या ९९ वर्षाच्या लिजला सौ साल तुझं उत्तर ना?"

"नो नो नो..! बाहुला बाहुलीचं डेस्टिनेशन एकच ना...! इक मंज़िल राही दो फ़िर प्यार ना कैसे हो....!"

त्यानं माझ्याकडं पाहिलं आणि हसला. मी पण से चीझ म्हंटल्यावर करतात तस केलं. गाडी सोसायटीच्या आवारात शिरून आमच्या टॉवर खाली थांबली. रिव्हर्स घेऊन त्याने पार्क केली आणि मी उतरले, बॅग घेतली आणि आम्ही लिफ्टच्या दिशेने चालू लागलो. अकराव्या मजल्यावर फ्लॅट आहे. लिफ्टच्या बाहेर पडल्यावर डाव्या बाजूचा दुसरा फ्लॅट. दार उघडून आत गेले आणि अगोदर सगळ्या खिडक्या उघडल्या. थंड हवेची झुळूक आत आल्यावर एकदम शांत वाटलं. गाडीत बसून अंग एकदम आंबून गेलं होतं.

"मी अंघोळ करून येतो गं.." तो म्हणाला. " मेन स्विच ऑन करून जा." मी सांगितलं. शनिवारी बेंगळूरुहून इथे येताना ट्रॅफिक टाळण्यासाठी सकाळी साडेसहाला निघायचं म्हणून तो आंघोळ करायचं टाळतो. आता निवांत अर्धा तास करेल.. मी सोफ्यावर आडवी पडले.

"डिंग डोंग," दारावरची बेल वाजली. अरे, अजून घरात आताच पाऊल ठेवतोय तर हे कोण? शेजारची ललिता असावी बहुतेक. मी दार उघडलं. समोर डोमिनोज पिझ्झाचा डिलिवरी बॉय आणि हातात पीझ्झाचा बॉक्स. "One large Cheese Veggie

pizza with pineapple madam." मी तो बॉक्स घेतला, सही केली आणि दरवाजा बंद केला.

तो आतल्या खोलीतून कपडे चढवत बाहेर आला. "कोण आलं होतं गं?"

" जणू काही तुला ठाऊकच नाही."

" नाही, खरंच."

" तू पेट्रोल भरल्यावर जे मागवलस ते घेऊन आला होता तो. देऊन गेला."

"काय मागवलं मी?"

"प वरून आहे. ओळख."

तो हसला. " किती सोपं कोडं घालतेस, पिझ्झा. चल खाऊन घेऊ. आणि हो.. मी टॉवेल बेडवर फेकला नाहीये बरं का, बाहेर गॅलरीत वाळत टाकलाय."

"सुधर गया तू बहुत जल्दी," असं म्हणत मी दोन प्लेट्स घेतले, पिझ्झा बॉक्स उघडला आणि स्लाइस वाढले. आम्ही खायला सुरुवात केली.

"क वरून तू मला काय म्हणणार होतास ते मला माहित आहे." मी म्हणाले.

"काय म्हणणार होतो?"

"कलिंगड. हो ना?"

"नाही."

"मग काय? करवंद? उगीच काहीतरी बनवू नकोस मला. आणि हे बघ डिलिवरी नंतर माझं वजन वाढणारच. मी कायम कलिंगडच असेन. आता मी चवळीची शेंग वगैरे बनू शकणार नाही. आणि मला काय मॉडेल बनायचं नाही रॅम्प वर जाऊन. कळलं?"

तो माझ्याजवळ आला, गळ्यात हात टाकले आणि म्हणाला, "उन्हाळ्यात कलिंगड ही प्यास बुझाती है. आणि मला हे कलिंगड बाराही महिने हवंय. ट्वेंटी फोर बाय सेवन." मग त्याने पीझ्झाचा एक मोठा तुकडा ओठात पकडला आणि माझ्या ओठाला लावला.

"मी पण तुला एक नाव ठेवलंय," मी म्हणाले, "ट वरून आहे ओळख."

"टोनी कर्टिस?"

"शहाणाच आहेस. नाही."

"टॉम हँक्स?"

"डबल शहाणा आहेस. नाही."

"टॉम क्रुझ?"

"बाथरूममध्ये आरसा नव्हता का रे?"

"टायगर वूड्स?"

"गोल्फ कोर्स कधी बघितलंय का तू?"

"टोनी ब्लेअर?"

"कुठल्या अँगलने?"

"हरलो. सांग काय ते."

"टरबूज." मी म्हणाले.

तो जोरात हसला. "खरंच की! कलिंगड आणि टरबूज, मेड फॉर इच अदर," आणि मग आम्हा दोघांनाही हसू आवरेना.

# माझी छत्री

लग्न झाल्यानंतर एक दोन दिवसाच्या अंतराने कोणीतरी जेवायला बोलवायचंच. ह्याचे मित्र, माईंच्या बहिणीकडे किंवा ह्याच्या काकांकडे अथवा ऋषीच्या बाबांच्या मित्राकडे जेवायला जाण्याचे बरेच कार्यक्रम असायचे. एके दिवशी आम्ही दुपारी डायनिंग टेबलावर सगळे जेवत होतो तेंव्हा ऋषीचे बाबा म्हणाले, " ऋषी, तुम्हा दोघांना आज संध्याकाळी रंगे गौडाकडे जेवायला जायचय. सात वाजता निघालात तर आठपर्यंत पोहोचाल. तो मला पावणेसातला फोन करेल."

"ओके अप्पा. आम्ही सात वाजता निघतो."

"राईट, म्हणजे गप्पा टप्पा वगैरे होऊन यू विल बी बॅक बाय टेन, टेन थर्टी." इशान म्हणाला.

"आणि जाताना काहीतरी घेऊन जा रे त्यांच्या नातवासाठी," माई म्हणाल्या, "रिकाम्या हाताने जाऊ नकोस."

"हां माई, नेतो."

" ऋष, इप्सितको वो गिफ्ट मिला है देखो, वो वर्ल्ड मॅप पझल, वो लेकर जाइए आप. मै गिफ्ट पॅक कर देती हूं आपको." इराने सुचवलं, "उसने अभितक वो बक्सा खोलाही नहीं."

"लेकिन इप्सित...?" मी शंका उपस्थित केली.

" अरे भाई अब कहां जाओगी गिफ्ट लाने?" इरा म्हणाली, "तीन तो यहां ही बज गए है. आप जाओगे कब और आओगे कभी? आपको तय्यार भी होना है ना.. मै समझाऊंगी इप्सितको. डोन्ट वरी."

" हो ग इरा, तसच कर," माई म्हणाल्या, "एक काळजी मिटवलीस बघ बाई तू.."

एकेक करून सगळे उठले आणि मी ताटं वाट्या गोळा करायला लागले तसं, " हे यू, एवी, थालियां मत उठाओ. मै सब कर लूंगी, " इरा बोलली, "गो टेक रेस्ट. मै इंदोर जब तक वापस नहीं जाती तबतक तुझे कुछ नहीं करना है. जा तू बेडरूममें, ऋषकी आंखे मायूस लग रही है," माझ्याकडे बघत तिनं डोळे मिचकावले.

"आणि ते यली अडकी इशानने आणून ठेवलेत बघ फ्रिझरमध्ये, तुला आणि ऋषला, ते ही ने.." माईनीं सांगितलं.

खरं म्हणजे जेवणं इतकं जड झालं होतं की नंतरची आवराआवर करायचा कंटाळा आला होता. माईनीं कट्टीन सारु

आणि होळगीचा बेत केला होता. होळगी अगदी मऊशार बनवली होती. त्यात जरासं जायफळ आणि वेलची घातल्यामुळे झोप येणार असं वाटत होतं, पण इराने प्रश्न सोडवला. मी फ्रिझर मधले विडे घेतले आणि बेडरूममध्ये आले.

इशान, ऋषीन् आणि त्यांचे अप्पा बाहेर बोलत बसले होते. इप्सित आजोबांच्या मांडीवर विराजमान होता. मी जेवण करून उठल्याची चाहूल त्यांना लागली असावी म्हणून बाबा आणि इशान दोघांनी ऋषिन् ला, 'जा आता, नव्या बायकोकडे लक्ष दे' असं म्हणून आत जायला सांगितलं.

"ठहरिए, शिनअंकल, मै भी आता हूं." इप्सित म्हणाला तसं इशाननी त्याला दटावलं. " ए.. नई आंटी को आराम करने दे जरा.. डोन्ट ट्रबल देम."

ऋषी आत आला. "या शिनअंकल.." मी त्याला चिडवत म्हणाले. "मला वाटलं की तो तुला शिनच्यान अंकल म्हणेल. तुझं ते आवडतं कार्टून आहे असं माई सांगत होत्या.."मी त्याच्या हातात विडा देत हसत म्हणाले.

"आणि तुझं आवडतं अप्सीडेजि आणि इगल पिगल."

तेवढ्यात इप्सित आत आला.

"शिन अंकल," तो बोलला, "नई आंटी को ब्रेकफास्ट बनाना आता है?" त्याने विचारले. मला हसू आले.

"अरे नई आंटी ढेर सारी नई डिशेस बनाती है.... क्या समझे तुम?" तो तोंडात विडा टाकत म्हणाला.

"हां आंटी?" त्याने अगदी निरागसपणे विचारले.

"येस डार्लिंग." मी त्याला जवळ घेत म्हणाले.

"मॅगी बनाने आती है आपको?"

मला हसू फुटले, "बहुत आसान है रे मॅगी.."

"मुझे अभी बनाके दोगी आप?"

"जी हुजूर,..... आपका हुक्म और हम ना माने? इप्सित के लिये कुछ भी... चलिए आपको मॅगीके कटलेटस् खिलाती हूं जब चाय बनाऊंगी तब. ओके?"

"ये ssss कटलेटस्, कटलेटस्,"असं ओरडत आणि उड्या मारत तो बाहेर गेला.

मी दार पुढे केलं आणि माझ्या तोंडातला विडा ऋषीन् च्या तोंडात ढकलण्यासाठी त्याला जवळ ओढलं इतक्यात दारावर टकटक झाली. "एवी,एक मिनट,अंदर आ सकती हूं क्या?"

मी दार उघडलं."अरे आइए ना भाभी, आइए.."

"ये शैतानने तुझे कामपे लगा ही दिया ना...? नई आंटी, मॅगीके कटलेटस् खिलाने वाली है मुझे अभी, ऐसे बोल रहा है..."

"हां भाभी, चाय बनाऊंगी तब बनाती हूं.."

"नो नो नो.. एवी, तुझे आराम करना है, मुझे रेसिपी बता दो मै बनाती हूं, और चाय भी बनाऊंगी। इंदौर जाऊंगी तो ये दो दो शैतान मेरे पीछे पड़ ही जाएंगे, नई आंटी वाली डिश बनाव...नई आंटी वाली डिश बनाव... भई तू रेसिपी बता दे प्लीज।"

"भाभी आपके लिए बेहद आसान है. मॅगी बनाकर हल्कासा नमक, मिर्च ऊपर से मिलाना है. पानी कम रखना है, वो ज्यादा गीली ना हो. ब्रेड का चूरा बनाकर मॅगी की जितनी मात्रा हो उतना मॅगी में मिक्स कर लेना अच्छे से."

"फिर तलना है, है ना?"

"हां, पर इसमे धनिया, हरी मिर्च, पुदीना, करी पत्ता, भी मिला सकती हो चाहे तो. फिर टिक्कियाँ बनाकर नॉन-स्टिक पैन में कम तेल में तलना है. बस हो गया. सॉस के साथ खा सकते है."

" तू है ना, मुंह में पानी छुड़ाकर ही मानेगी.. और ये लो, ऋषने तो खर्राटें भी भरना शुरू किया.." असं म्हणत दार ओढून घेत ती आत गेली. मी ऋषीन् कडे बघितलं. घोरत पडला होता. मी त्याच्या पावलाला खाजवलं, त्यानं पाय पटकन् वरती ओढून घेतला.

दुसऱ्या पायालाही तसच केलं. "एवी, झोपू दे ना.. रात्री जागायचं आहे.." पाय वरती ओढत तो बोलला.

"मी पण जागते की रे तुझ्याबरोबर.. मी झोपलीय का..? चावटपणा कमी कर आणि उठून सांग मी कुठली साडी नेसू ते...."

" अगं नेस कुठली ही.. मस्त दिसतेस तू कुठल्याही साडीत आणि विदाऊट साडीत.."

" थांब तुला...विदाऊट साडीत काय? फार चाव..."

" काय चुकीचं आहे? विदाऊट साडीत म्हणजे ड्रेसमध्ये. तेरे ही मन मे शैतान है."

" आल्या नंतर सांगते तुला कोण शैतान आहे ते. सांग कुठली साडी नेसू?"

" अगं ती काय ते आहे ते बघ काय म्हणतात त्याला, कांची रे कांची रे ह्या गाण्यावर..."

"कांचीवरम? ती बॉटल ग्रीन? विणलेली बुट्टी वाली?"

"हां तीच तीच.. फार मस्त दिसते तुला."

"ओके. तू म्हणशील तसं. तू पण ग्रीन कुर्ता घाल."

"आंटी, मां चाय पीने बुला रही है." इप्सित निरोप सांगून परत पळाला.

"चला अंकल शिनच्यान. चहा पिऊन तयार होवूया" मी त्याचा हात ओढत बोलले.

डायनिंग टेबलवर चहा आणि मॅगीके कटलेटस् ठेवलेले होते."एवी, बढ़िया रेसिपी है बहुत टेस्टी हुए हैं," इरा म्हणाली,"और आसान भी है बनाना. इंदौर जानेके पहले मुझे रोज एक नई रेसिपी बता दिया कर."

"हां भाभी, दोनों मिलकर बनाएंगे कलसे." सगळ्यांनाच तो पदार्थ आवडला. इप्सित तर जाम खुश झाला होता.

आम्ही मग तयारीला लागलो. बरोबर पावणेसातला अप्पान्चा फोन वाजला.

" अरे ते आता निघतील. काय म्हणालास? हा हा हा. ---- होय ---- हो. बघ मजा येते का. हां बाय. ठेवतो."

आम्ही पोर्चमध्ये आलो. गॅरेज मधून ऋषिन् ने गाडी बाहेर काढली. मी दार उघडून बसल्यावर ऋषिन् रस्त्याला लागला.

"कोणाकडे चाललोय रे आपण?"

"अप्पांचे मित्र आहेत खास. स्ट्रेंज गौडा."

"अप्पा तर रंगे गौडा म्हणाले की रे दुपारी.."

सिदाप्पा थिम्मय्या रंगे गौडा. इंग्लिश स्पेलिंग एस टी आर ए एन जी इ म्हणजे स्ट्रेंज गौडा. अप्पागं गोत्त इल्ला. त्यांना सांगू नकोस त्यांच्या खास मित्राला मी स्ट्रेंज गौडा म्हणतो ते."

"माईना माहित आहे?"

"अप्पाना सोडून सगळ्यांना..."

"लग्नाला आले होते?"

"ऑफ कोर्स. अगं तुला आठवतंय का आपण एकदा चारकोलला बसलो होतो जयनगरमध्ये, मी तुला अर्ध्या जेवणावरून उठवून हात धरून बाहेर आणलं आणि मग आपण धूम ठोकली.....हा हा हा..."

"अरे हां.. तुला त्यांनी माझ्याबरोबर बघायला नको होतं, आपण त्यांची नजर चुकवून बाहेर पडलो, गल्ल्यावर पैसे देताना तुझी कसली तारांबळ उडाली आणि बाकीचे पैसे न घेताच आपण पळालो बाहेर ते हेच का..? हा s s हा s s हा s हा.. पण माझी छत्री तिथेच राहिली रे... माझं नाव पेंट केलेली... मामन नी घरी गेल्यावर विचारलंच, 'पुक्वा त्यू ए मुइये? उ ए तों पारापुइ?' सांगितलं मग तू घेऊन गेलास म्हणून. मग काही बोलली नाही.

"हो ना अगं.. त्यांना सकाळी भेटायला सांगितलं होतं अप्पानीं त्या दिवशी पण तुझ्याबरोबर माझी अपॉइंटमेंट फिक्स होती म्हणून

मी त्यांना थाप मारली फोनवर की माझा पाय मुरगळलाय सो आय कान्ट वॉक... आणि तेच आपल्या शेजारच्या टेबलावर.. बाप रे.."

"आणि साहेब बाईकवर मागे मुलीला बसवून फिरवतायत मुरगाळलेला पाय घेऊन, हा s s हा s s हा... त्या दिवशी तुला गाडीला नीट किक् पण मारता येत नव्हती. कसला थरथरत होतास तू.. इग्निशनमध्ये चावी घुसतच नव्हती..."

"अगं आपला सगळा चोरीचा मामला.. अप्पाना त्यांनी सांगितलं तर... ही भीती...मग दुसऱ्या दिवशी गेलो त्यांच्याकडे स्ट्रेचेबल बँडेज बांधून, खोटं खोटं लंगडलो.. हा हा हा...."

"पण नंतर सरावलास तू.. आपण मग ग्रीन थेअरी, लोकारूची,श्रावणा, ब्रिकलेन,लांटर्न,ग्रास हॉपर, किती हॉटेलं पालथी घातली रे... आणि साऊंड ऑफ म्युझिक लिडो की रेक्स थीएटरला ब्रिगेड रोड वर...

आणि ते यू आर सिक्सटीन गोईंग ऑन सेवंटीन गाणं सुरू झाल्यावर तू मला चिमटा काढलास...

"तुला सगळं आठवतंय..?"

"हो.. अगदी पहिलं किप इट सिंपल सिली पण..

"ते काय असतं?"

"ते असतं फर्स्ट लेटर ऑफ एवरी वर्ड.."

"अच्छा? कळलं नाही....रात्री सांग."

मी त्याच्या पाठीत एक धपाटा घातला.

"चला, आलं घर..." असं म्हणत त्याने गाडीचा वेग कमी केला आणि एका घरासमोर गाडी उभी केली. आम्ही उतरलो.

" बारो वळगं.." अप्पांच्या वयाच्या एका व्यक्तीने आमचे स्वागत केलं, "नोड यारू इद्दारे.." असं म्हणत त्यांनी सोफ्यावर बसायला सांगितलं. आतून एक वयस्कर बाई बाहेर आल्या. " ओ हो.. रंगाचारी आवरू मगा.. बारम्मा," त्या म्हणाल्या आणि माझा हात धरून मला सोफ्यावर बसवलं. मी पटकन उठले आणि त्या दोघांना पायाला हात लावून नमस्कार केला. त्यांनी त्यांचा मुलाची, सुनेची आणि नातवाची मला ओळख करून दिली.

मग जरा गप्पा सुरू झाल्या. ऋषिन् आणि त्यांचा मुलगा बोलत बसले. नातू माझ्या भोवती घोटाळू लागला.

"तुझं नाव काय बेटा?" मी विचारलं.

"राघवेंद्र नागेश गौडा."

"छान नाव आहे रे.. आईचं नाव माहीत आहे?

" चित्रा."

"वाऊ. मस्त नाव आहे. तुझ्यासाठी एक सरप्राइज आणलय मी.."

तो हसायला लागला. मी त्याला त्याचं गिफ्ट दिलं. त्यानं लगेच गिफ्ट रॅप काढायला सुरुवात केली. त्याच्या आईनी आता काढू नको असा इशारा केला पण लहान मूल थोडच ऐकणार होतं? मीच त्याला उघडून दिलं आणि मग त्याच्या चेहऱ्यावर जे हसू फुललं ते बघून त्याची आईही आनंदली.

आम्ही मग जेवायला बसलो. कडबु केले होते जेवायला. गप्पा टप्पा मारत जेवण संपलं आणि मग आम्ही सगळे परत सोफ्यावर बसलो. जरा वेळाने निघुया या अर्थी ऋषिने मला खूण केली तसं थांबा जरा असं म्हणत रंगे गौडा आत गेले आणि एक गिफ्टची पिशवी आणि एक लांब अशी रॅप केलेली काठीसारखी वस्तू आणली आणि आमच्या हातात दिली.

ती लांब वस्तू बघून काय आहे ते कळेना. ऋषि न् चा प्रश्नार्थक चेहरा बघून रंगे गौडा हसले आणि म्हणाले, " अरे तू चारकोलमध्ये बसला होतास बघ तुझ्या बायको बरोबर.. आठवलं का?.. तेंव्हा ही छत्री विसरून गेला होतात तुम्ही. मी बाहेर येई पर्यंत तू गाडीवर हिला मागे बसवून गेलास पण.. कसली तुला घाई झाली होती काही कळलं नाही. आणि पाय मुरगाळलेला होता ना तुझा.. असो. मी तुझ्या अप्पाला दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये सांगितलं आणि छत्रीही दिली पण तो म्हणाला की आता देऊ नकोस. त्यांचं लग्न

झालं की त्यांना तुझ्याकडे जेवायला पाठवतो तेंव्हाच दे. तो माझा बॉस मग मला त्याचं ऐकायलाच पाहिजे ना..!"

ऋषिन् ची काटो तो खून नहीं अशी स्थिति झाली. "त्या नंतर तुला मी लोकारुची आणि श्रावणामध्ये पण बघितलं," ते पुढे बोलू लागले, " तुझ्याबरोबर नेहमी ही असायची रे.. छान आहे तुझी बायको. ज्या मुली वर प्रेम केलंस त्याच मुलीशी लग्न केलस हे फार छान केलंस. त्याबद्दल तुला शंभर टक्के मार्क्स. आता लग्न केलेल्या मुलीवर मनापासून कायम प्रेम कर हाच आशीर्वाद देतो मी तुला." असं म्हणून त्यांनी आम्हाला निरोप दिला.

आम्ही गाडीत बसलो घरी परतण्यासाठी पण आम्ही वेगळ्याच विश्वात होतो. आम्हाला हसू ही येत होतं आणि ज्या प्रकारे ह्या सगळ्या योगायोगाच्या गोष्टी घडल्या होत्या त्यामुळे आश्चर्याचे धक्केही बसत होते.

"माय गॉड," ऋषि बोलला. " म्हणजे अप्पाना हे सगळं माहीत होतं तर!... त्यांनी हे सगळं माईला सांगितलं असणार, आणि माईनी इशानला आणि इशानने इराला... बाप रे... आणि मला असं वाटत राहिलं की इन लोगोंको पता ही नही..."

" अरे खरंच की," मी म्हणाले, "त्यांचा फोन आला तेंव्हा अप्पा म्हणाले बघ, बघ मजा येते का.. या सर्वांनी मिळून आपल्या

दोघांना फूल्स पॅराडायिजमध्ये फ्लॅट घेऊन दिलाय का तिसऱ्या मजल्यावर बघायला पाहिजे.. हा हा हा.."

" चारकोलला आपण जुलैमध्ये गेलो होतो. मी तुला फक्त दोन महिन्यांपासून ओळखतो असं मी अप्पाना सांगितलं होतं डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आणि शेवटच्या आठवड्यात साखरपुडा उरकला सुद्धा. जानेवारीत लग्न.."

" हे म्हणजे आज मुंज, उद्या सोडमुंज आणि परवा लग्न.. हा हा हा.."

"आता गेल्यावर कळेलच सगळं.."

आम्ही घरी पोहोचलो तेंव्हा सगळे जण बाहेर हॉलमध्ये सोफ्यावर बसले होते. "या या या.." सगळे एकदमच म्हणाले.

"कसं होतं जेवण?" माईनी विचारलं.

" छान होतं माई. कडबू, तोक्का, रंजका, चित्रान्ना होतं."

" तुला रंगे गौडा नी काय दिलं रे?" आप्पांनी प्रश्न केला.

" छत्री दिली. पण अप्पा, तुम्हाला सगळं माहित होतं तर तुम्ही मला कधी काहीच कसं विचारलं नाही?"

"आमचा तुझ्यावर पूर्ण विश्वास होता तू हिला फसवणार नाहीस आणि तू स्वतःहून सांगितल्याशिवाय पुढे विचार करायचा नाही असं ही आम्ही सर्वांनी ठरवलं होतं. तू सांगितल्यावरच

एविच्या आईकडे आम्ही गेलो आणि सगळं ठरवलं. एविनी मात्र आईला पहिल्यापासून सगळं सांगितलं होतं अगदी तुम्ही क्रॉसवर्डला पहिल्यांदा भेटला तिथपासून नंतरच्या सगळ्या गाठीभेटी. एविच्या आईनी तिला अगोदरच संमती दिली होती."

" मला एवीची आई आवडली. एविचा फोटो पण आवडला साडी नेसलेला.." माई म्हणाल्या.

" मी साखरपुड्याची बातमी कळली तेंव्हा ऋषिला फोन करून सांगितलं पण.. जो बडा भाई नहीं कर सका वो तूने कर दिखाया, ब्रावो! तुम आगे बढ़ो हम तुम्हारे साथ है!" इशानला चेष्टा सुचली.

" और मैंने जब इसका पूरा बायो पढ़ा फोटो के साथ तो मैंने कहा अब इसका छाता खोलकर इसके सिर के ऊपर पकड़ना ही पड़ेगा...." इरा जोरात हसत बोलली, "एविज अंब्रेला..."

" मां, नई आंटी की नई डिश है ना एविज अंब्रेला?" इप्सित ने विचारलं तसं सगळे सात मजली हास्यात बुडाले.

# संकष्टी

त्या दिवशी, खरं म्हणजे रात्री, मी आणि ऋषिन् आमच्या घराच्या गॅलरीत उभे होतो. संकष्टी असल्याने माईंचा उपवास होता आणि माझाही. चंद्रोदय दहाच्या आसपास होता. आम्ही दोघं चंद्र दिसतोय का ते पाहत होतो.

"केंव्हा उगवणार हा चंद्र देव जाणे," मी बोलले.

"अगं दहाची वेळ आहे ना? अजून नऊ सत्तावन्न होतायत. येईल दोन तीन मिनिटात." तो म्हणाला.

"चंद्र दिसल्यावरच कुकर लावायची माईंची पद्धत, आणि मला तर जाम भूक लागली आहे रे...आणि या ढगाळ वातावरणात चंद्र दिसणार तरी का..?"

"एक काम करूया का?" तो म्हणाला.

"काय?"

"तू आणि माई एकमेकांना बघा आणि मग तू कुकर लाव."

" हा s s हा, " मला हसू दाबता येईना. "हा s s हा s s हा."

"का हसतेस?"

"माईना बाबा, "चांद सा मुखड़ा क्यों शरमाया..." असे म्हणायचे का काय असं वाटलं म्हणून... हा हा.."

"नाही. ते तिला दिलदार म्हणत. चलो दिलदार चलो चांद के पार चलो असे म्हणायचे.." ऋषीन् गंभीर झाल्याचा आव आणत बोलला.

मला हसू आवरत नव्हते. "हा हा हा..मग..? माई काय म्हणायच्या?"

"त्यांच्या पिढीत हो ला हो करायची पद्धत होती म्हणून ती पण हम हैं तैयार चलो म्हणायची. एकदा बाबांनी तिला काहीही सांगितलं की ती ते काम शेवटाला न्यायचीच. जरा जास्तच चांगलं करायची. नुसतं हम है तय्यार चलो नाही तर पुढे अगदी आओ खो जाये सितारों में कहीं छोड़ दे आज ये दुनिया ये ज़मीं असं ही ती म्हणाली. बाबा तिला फक्त दिलदार म्हणाले तर तिला नशाच चढली. हम नशे में हैं संभालो हमें तुम नींद आती है जगा लो हमें तुम असं ही ती पुढे म्हणाली."

मला कळला ऋषिनचा रोख. "मी पण म्हणाले असते हम हैं तय्यार चलो; तू चलो दिलदार चलो म्हंटला असतास तर.." मी जरासा, आवाजात जरब आणून बोलले.

"तू..?" ऋषीन् डोळे मोठे करत म्हणाला, " शक्यच नाही."

"का शक्य नाही?"

"तू आयआयएममध्ये केस स्टडी करताना केसेसचं इतकं चिरफाड केलंयस ना की यू सफर फ्रॉम अँनलायसिस पँरालीसिस."

" हो का? देन एक्सप्लेन."

"तू म्हणाली असतीस, स्पेस सूट शिवाय आपण कसं जाणार? झीरो ग्राविटी झाली आणि मी तरंगायला लागले तर? रॉकेट फ्युअलचं काय? टॉयलेटची व्यवस्था कशी असणार? एलीयन्सनी मला पकडलं तर तुझा प्लॅन बी काय असेल?.. स्पेस सूट घातल्यावर मी कशी दिसेन रे.. शूजला मॅचींग असेल का रे स्पेस सूट.. स्पेस सूटच्या रंगाचं नेल पॉलिश मिळेल का रे ऋ...? हेअर कट कसला करू रे मी? रोमन हॉलिडेमध्ये ऑड्रे हेपबर्न करते तसं करू की स्टेप कट करू? वगैरे वगैरे..."

" हो? सांग बरं आता कुणी केली चिरफाड? सांग.. सांग," असं म्हणत मी त्याच्या पोटाला जोरात चिमटा काढला.

" अय्योअव्वा," तो कळवळला, " एलीयन्सनी तुला पकडलं तर असेच चिमटे काढ. ते सगळे तिथून थेट शुक्रावर पळ काढतील बघ." मी अजून एक चिमटा काढला.

" स्सस्सस्सस्सस्सस्स...." कुकरच्या शिट्टीचा आवाज.....! माईनी कसा काय कुकर लावला चंद्रदर्शन घेतल्या शिवाय? " माई..?" मी गॅलरीतून लगबगीनं आत किचनमध्ये येत बोलले. "

अहो, तुम्ही कुकर लावून टाकला..? चंद्र दिसत नाहीये अजून माई...?"

"अगं दहा वाजले तसं कुकर लावायला मी तुला सांगणारच होते पण बेडरुमच्या खिडकीतून मी गॅलरीत तुला बघितलं, तुम्ही दोघं छान गप्पा मारत होतात, कशाला तुला डिस्टर्ब करायचं म्हणून मीच आत आले आणि कुकर लावला."

" पण चन्द्र...."

" अगं ढगाच्या मागे असेल तो दहा वाजता उगवलेला..." माई मला मध्येच तोडत बोलल्या.

" स्सस्सस्सस्सस्सस्स...." शिटीचा परत आवाज आला. "दुसरी शिटी का गं ही..? माईनी प्रश्न केला.

मी काय उत्तर देणार? मी स्वतः कुकर लावला तरीही माझाच गोंधळ होत असतो शिट्ट्या मोजताना..! आता माईनीं लावलाय तर..? " हो माई, दुसरीच शिटी असावी बहुतेक..." असं उत्तर देत मी हात पाय धुवायला बाथरूमकडे वळले. मी बाहेर आले तर पॅसेजमध्ये ऋषी आरश्यासमोर उभं राहून तोंड पुसत होता. " ये चांदसा रोशन चेहरा, जुल्फोंका..." तो गुणगुणत होता.

" स्वतःलाच काय चांदसा रोशन चेहरा म्हणतोयस ऋ.. दोन दिवसाची दाढी वाढ लीय..." मी नॅपकिन घेत बोलले.

" एवि," तो अगदी गंभीर होत म्हणाला, " तू आयआयटी खरगपूरची ग्रॅड असूनही सम टाईम्स यू ॲक्ट लाईक अ नर्सरी किड."

"का..? काय झालं..?" मी कपाळावर आठ्या चढवून प्रश्न केला.

" माई काय म्हणाली मघाशी कळलं नाही तुला, आठव?" त्यानं विचारलं.

" काय म्हणाल्या? त्यांनीच कुकर लावला असं म्हणाल्या ना..? मी उत्तरले.

" ती म्हणाली, ' दहा वाजले तसं कुकर लावायला मी तुला सांगणारच होते पण बेडरुमच्या खिडकीतून मी गॅलरीत तुला बघितलं,.... तुला बघितलं आणि कुकर लावला... तुला.. एवी तुला...! म्हणजे तू चंद्र झालीस की नाही सांग...!" ऋषी ने स्पष्टीकरण दिले.

मी त्याच्याकडे बघतच राहिले.

" म्हणून मी तुलाच ये चांदसा रोशन चेहरा म्हंटलं... येडे.."

"तू जास्त येडा. मॅड मॅक्स."

"तू नर्ड.."

"तू गीक.."

"तू डॉर्क.."

मी चिमटा काढायला त्याच्या पोटाला हात लावणार तेवढ्यात, "आरती म्हणायला या रे...", माईनीं हाक मारली. आम्ही पटकन् आत गेलो. समईत तेल घालतांना माई काही तरी गुणगुणत होत्या.

"काय गुणगुणतेस माई..? जरा वेगळंच, ओळखीचं म्युझिक वाटतेय गं.. हे आरतीचे स्वर नव्हेत.. " ऋषीन् म्हणाला.

"काही नाही रे.. ते पाकिझामध्ये एक गाणं आहे बघ.. चलो दिलदार चलो... ते म्हणत होते..."

ऋषीनच्या आणि माझ्या हसण्याचा स्फोट झाला आणि त्यात माईही सामील झाल्या.

# नामुमकिन डॉन.

सदाशिवनगर मधलं आमचं घर जुनं असलं तरी प्रशस्त आहे. पूर्व दिशेला असलेल्या गेटपासून व्हरांडाच्या पायऱ्यापर्यंत यायला पंधरा सोळा पावलं टाकावी लागतात. पाच पायऱ्या चढल्या की व्हरांडा आणि मग दोन पावलं टाकली की मुख्य दार.

पाच पायऱ्या चढायच्या अगोदर डावीकडे वळून पंधरा पावलं चालून गेलात की उजवीकडे सरळ वीस पावलं चालायची आणि परत उजवीकडे वळून पंधरा पावलं चाललं की उजवीकडे वळून... बरोबर! वीस पावलं! ते झालं की परत उजवीकडे. मग त्या पाच पायऱ्या लागतात. हा डावा उजवा कदमताल करताना डाव्या बाजूला पेरू, आंबा, नारळ, विलायती चिंचा, कढीपत्ता, लिंबू, चिक्कू, सीताफळ, डाळिंब अशी झाडं चालताना आपल्याकडे बघत असतात आणि सोनचाफा, लाल चाफा, पांढरा चाफा, कृष्ण कमळ, गुलाब, जाईजुई, रातराणी, मोगरा वगैरे फुलझाडं हवेत डोलत असतात. गेटच्या वरती बोगनवेलीची कमान पसरलेली असते.

रविवार असो वा कुठलाही वार, अप्पा सकाळी पाच वाजता उठतात आणि चहा करतात, दहा कप. तो बिन दुधाचा चहा मोठ्या

थर्मासमध्ये भरून ठेवतात जो नंतर आम्ही दूध घालून घेतो. दुसऱ्यांदा चहा करावा लागू नये म्हणून दहा कप. घरातले सगळे पक्के चहाबाज आहेत. मी धरून.

रोज बागेला पाणी घालण्याचा कार्यक्रम अप्पा करतात पण रविवारी सकाळी सातला ते मंडईत भाजी आणायला जातात आणि त्यांच्या मित्रांना भेटून साडे दहा अकरा पर्यंत परत येतात. एकदा भाजी घेताना इन्फोसिसच्या श्रीमती सुधा मूर्ती पण त्यांच्या बाजूला भाजी घ्यायला उभ्या होत्या असं त्यांनी सांगितलं होतं.

रविवारी सकाळी सातच्या सुमाराला तुम्ही गेट उघडून आत आलात की समोरच्या पाच पैकी सर्वात वरच्या पायरीवर मी बसलेली असते आणि खालच्या पायरीवर माई बसलेल्या असतात. साडेसातला गेट मधून आत आलात की आमची जागा बदललेली असते. म्हणजे मी खालच्या पायरीवर बसलेली असते. आम्ही एकमेकींच्या केसांना तेल चोळत असतो.

रविवार म्हणजे खरं तर उशिरा उठायचा दिवस पण माई असल्या की लवकर उठावं लागतं. त्याचं कारण म्हणजे आमच्या दोघींचा न्हाण्याचा कार्यक्रम. सकाळचं चहा पाणी आटपलं की मग आम्ही एकमेकींच्या केसांना तेल चोळतो. म्हणजे अगोदर मी त्यांच्या केसांना तेल चोळते आणि मग त्या माझ्या केसांना.

घड्याळातली बरोबर वीस मिनिटे तेल चोळून झाल्यावर ते तासभर जिरवायचं आणि मग आंघोळ.

मी स्वतः लग्नापूर्वी असं सगळं तेल चोळणं रविवारीच करायचे. अगोदर केस बॉब कट वगैरे केले होते पण लग्न ठरलं तसे केस वाढवले. आता मात्र वेणी घालते आणि ते ही माई असताना. आम्ही दोघेच असतो तेंव्हा केस मोकळे सोडून ठेवते, जीन्स आणि टॉप घालते. पण माई असताना साडी, आणि त्याच्यावर अंबाडा वगैरे घालून मोगऱ्याचा गजरा माळला की माईंच्या गुड बुक मध्ये ताबडतोब एंट्री मिळते. माई पण अंबाडा घालून एखादं फूल खोचून ठेवतात.

त्यांच्या केसांना तेल चोळताना मला प्यासा सिनेमातलं गाणं हमखास ओठावर येतं.

*'चंपी..s s तेल मालीश...*

*सर जो तेरा चकराए, या दिल डूबा जाए,*

*आजा प्यारे पास हमारे काहे घबराए...'*

पण त्या कुठे मला घाबरायला बसलेत..? मीच त्यांना घाबरते. पण सासूचं डोकं हातात असल्याने बरेच विचार डोक्यात (माझ्या) येत असतात. उदाहरणादाखल, त्यांच्या डोक्यावर वरवंटयाने मिरे वाटावेत, त्यांचं डोकं तबला आहे असे समजून यथेच्छ थापा

माराव्यात आणि झाकीर हुसेन असल्याचा आनंद लुटावा, त्यांचे केस करकचून ओढावेत, डोक्यात नखांनी ओरबाडावं, दुकानात जर डोक्यातल्या उवा मिळत असतील तर अर्धा एक डझन आणून हळूच त्यांच्या केसात सोडून द्यावेत किंवा रात्री झोपलेल्या असतील तेंव्हा कात्रीने केस वेडेवाकडे कापून काढावेत वगैरे वगैरे. हे सगळे विचार वाईट आहेत मला कळत असतं आणि मनात असले विचार आल्यावर अपराधीपणाची भावना पण निर्माण होते. पण आपलं मन असं आहे ना..! मन चिंती ते वैरी न चिंती असं म्हणतात ते खरंच. पण हे सगळे विचार मी प्रत्यक्षात कधीच उतरवत नाही आणि ते शक्यही नाही. गम्मत म्हणजे असले विचार मी माझ्या आईचं डोकं चोळत असते तेंव्हा माझ्या मनात फिरकत पण नाहीत. आईचं डोकं हातात धरलं की मीच तिची आई आहे अशी भावना मनात निर्माण होते आणि आपसूक माझे ओठ तिच्या गालावर टेकतात.

माझ्या केसांना माई तेल चोळतात तेंव्हा त्यांच्या डोक्यात काय चाललेलं असतं माहित नाही पण मी जसा वाईट विचार करते तसं त्या करत असतील तर, असं वाटून मी मनातल्या मनात देवाला हात जोडून क्षमा मागते. शान्तम् पापम्।शान्तम् पापम्।

तर हा असा तेलकट कार्यक्रम रविवारी असतो म्हणून आम्ही ऋषीन् ला आमच्या दोघींच्या अगोदर आंघोळ करून घे म्हणून पिटाळतो कारण नंतर बाथरूमच्या फरशा तेलकट होणार असतात.

असच एका रविवारी तो बाथरूम मधून डोळे चोळत बाहेर आला तेंव्हा त्याचे डोळे लाल झालेले दिसले.

" ऋ.. अरे, डोळे बघ किती लाल झालेत? कशानी झालेत रे..? " मी विचारलं.

"अगं तो शाम्पू लावल्यानंतर डोळे चुरचुरायला लागले बघ. लाल झालेत का फार?"

"अरे एकदम ब्लड रेड झालेत. कुठला शाम्पू वापरलास?"

"अगं जो हाताला लागला तो वापरला. तो हिरव्या बाटलीत ठेवला होता तो." तो लुंगी नेसत बोलला.

"तो? अरे त्यात मी शिकाकाईचं पाणी ठेवलं होतं.. ते तू घेतलंस... छान.. धन्य आहेस.."

"अगं मला काय माहित कसलं काय आहे ते? तू पण ना...? बाटलीवर लेबल काय आणि तू सांगतेस काय.. परत मलाच बोलतेस.." केस पुसत तो म्हणाला

"अरे मला विचारायचं तरी हे घेऊ का म्हणून?"

"शहाणे, तू लेबल तरी काढून टाकायचं ना? अजून त्याच्यावर मियामा दि बिल्स लेबल आहे. हे म्हणजे मुंग्यांना फसवण्यासाठी साखरेच्या डब्यावर तिखट लिहिलेलं लेबल चिकटवणे, असा प्रकार आहे."

"तू? आणि मुंगी? मुंगळा आहेस तू.."

"का गं?... ओठाला जखम झाली का रात्री..?"

"हट, चावट माणूस..."

"म्हणजे मी चावतो म्हणायचंय काय तुला?"

"फाजीलपणा बंद कर.. माई ऐकतील."

"माई शिरली बाथरूममधे," तो अंगातलं जानवं कोरडं करत म्हणाला, "आणि काय गं? काय म्हणालीस तू? कसलं पाणी?"

"आवळा, रिठा आणि शिकाकाई."

"शेवटचं काय म्हणालीस?"

"शिकाकाई.".

"जॅपनिज प्रॉडक्ट आहे काय? नावावरून तसं वाटतंय पण काम ओसामा बिन लादेन सारखं करतंय. ब्लड रेड."

त्याने आरशात डोळे बघितले. "बाप रे. सुजलेत पण. कंजक्टिविटीस झाल्यासारखं दिसतंय. गॉगल घालून बसतो

आता." असं म्हणत ड्रावर मधला गॉगल काढून त्यानं डोळ्यावर चढवला.

मी हसायला लागले. "अरे होतील थोड्या वेळानी कमी. चुरचुरत असतील तर पाणी लाव अजून. डॉन दिसतोयस गॉगल घालून."

"ते कैझान सिस्टिम असतं बघ जपानचं त्यात फाइव एस् असतात ना.. सेइरी,सेइतोन,सेईसो,सईकेत्सू आणि शित्सुके, त्या पैकी वाटलं मला ते तुझं... काय म्हणालीस शिक..?"

"शिकाकाई. थांब तुला सगळा इतिहासच सांगते. मुंज झाल्यावर तुला शेंडी ठेवली होती की नाही?"

"होय. ठेवली होती. त्याच्याभोवती बिस्कीट पण होतं."

"त्या शेंडीला म्हणतात शीखअंड. शीख प्लस अंड पासून शिखंड. ज्या शेंडीला चाणक्य गाठ मारणार होता त्याला म्हणायचं शिखंडिका. डोक्यावर म्हणजे शिखावर असलेली केसांची गाठ. संस्कृतमध्ये चूडा, आणि चूडाकरण म्हणजे मुंडण. शिखा, शिखु, शिखरम्, शिखरिणी ही सगळी शिखापासून तयार झालेले शब्द आहेत. कळलं?"

"इशान तर शेंडीला अँटेना म्हणायचा.."

"हो का? आता तो अँटेना असता ना.. तर मी माझ्याकडे वळवला असता. शंकराला डोक्यावर जटा आहे म्हणून तो शेखर आणि तिथून गंगा वाहते म्हणून ती शिखरिणी. तमिळमध्ये सिक्कम्,सिक्कु सिकाईताटू,सिका, सिकुरम, सिकरिन आणि तेलगू भाषेत सिगा, सिगाई. आता, काई म्हणजे कच्चे फळ, जसं नेल्लिकाई, हुणचीकाई, उप्पिनकाई, माविन काई, कुंबळकाई, हिरीकाई, बद्रीकाई तसच शिकाकाई म्हणजे केसांना उपयोगी असे फळ म्हणून शिकाकाई. समजलं?"

"हो मॅडम."

"काय?"

"शिका काही.. तुमच्याकडून."

मी हसत त्याच्या गालावर हलकीशी चापट मारली.

" बरं, नेल्लिकाई म्हणजे मराठीत काय सांग बरं?

"आवळा."

त्याने लगेच मला विळखा घातला. मी माई येतील या भीतीने पटकन् मला सोडवून घेतलं.

"हे काय अचानक? असं काय घट्ट धरलंस?"

"तूच म्हणालीस ना आवळा? म्हणून...."

मी मोठे डोळे करून त्याच्याकडे बघतच राहिले. "तुला दुसरं काही सुचत नाही का रे?"

"अगं तू समोर असलीस ना की माझा विश्वामित्र होतो. माझी तपस्या भंग पावते."

मी हसून म्हणाले, " होय काय? हाँटेड रोड वर ती म्हातारी भेटली तेंव्हा तू साधा ऋषी होतास आणि आता लगेच विश्वामित्र झालास? त्याची तपस्या मोडणारी मेनका होती आणि मी मेनका नाही, ती गोरी होती मी गोरी नाही."

"अगं तू मेनका, रंभा, उर्वशी या सर्वांचं काँकोकशन् आहेस."

"बस्, बस् बस्.. ही मस्का चस्काची वेळ नाही." त्याने माझे हात पकडले आणि जवळ ओढत म्हणाला, "तुझी शिकाकाईची केस स्टडी बाकी जबरदस्त आहे गं.." असं केस या शब्दावर जोर देत बोलला.

तेवढ्यात माईनी हाक मारली. "अगं ते शाम्पूच्या बाटलीत शिकाकाईचंच पाणी होतं ना गं?"

" हो माई, " मी आत जाता जाता म्हणाले. माई आरश्यासमोर उभ्या होत्या. "बाप रे. लाल भडक झालेत डोळे, आणि सुजलेत पण,. कंजक्टिविटीस झाल्यासारखं दिसतंय गं!"

" अहो नाही माई.. कमी होतील आता तासाभरात.."

"नाही व्हायचे. तू रिठा आणि आवळ्याचं पाणी पण त्याच्यात घातलयस ना.. राहू दे.. मी आता गॉगल घालून बसते. तुझा तो काळा गॉगल आणून दे बाई म्हणजे जरा गार वाटेल.."

मी गॉगल आणायला बेडरुमकडे निघाले तेंव्हा हसू फुटत होतं. मी गॉगल घेताना त्यानं बघितलं. " गॉगल? कुठे चाललीस आता बाहेर? स्कूटरमध्ये पेट्रोल कमी आहे शिवाय अजून तुझं न्हाऊन व्हायचंय ना?"

"अरे माईना हवाय गॉगल. त्यांचेही डोळे लाल झालेत शिकाकाई लावून.." मला हसू आवरेना.

" :-D:-D:-D " त्याला ही हसू आवरेना. माई आता नऊवारी नेसून, अंबाडा बांधून, त्यात फुल खोचून वरती गॉगल घालणार!.:-D:-D:-D तिला म्हण, माई तुम्ही एकदम डॉन दिसताय बरं का....!"

"म्हणायला कशाला पाहिजे? आहेतच त्या डॉन. आपण सगळे कसे टरकून असतो त्यांना.."

"जा मग, सांग तिला तसं..."

"बाप रे.. नको रे बाबा..माझी हिम्मत नाही.."

"का नको? म्हणून तर बघ....!!"

"नो, नेवर... त्या माझा नवीन "केस" पेपर बनवतील आणि इंजेक्शन पण त्याच देतील." मी माईना गॉगल दिला. त्या साडी नेसत होत्या. नऊवारी नेसतात रविवारी; पूजा करायची असते म्हणून.

माझी आंघोळ झाली आणि बाथरूमच्या फरश्या साबणाच्या पाण्याने घासून आणि धुवून मी बाहेर आले तेंव्हा अकरा वाजले होते. मी साडी नेसून डोक्याला टॉवेल गुंडाळला आणि तयार झाले तसं गेटबाहेर रिक्षा थांबल्याचा आवाज आला. अप्पा येतात भाज्यांच्या पिशव्या घेऊन रिक्षातून. तेच आले होते. मी त्यांच्या हातातून पिशव्या घ्यायला गेटकडे निघाले तर व्हरांड्यात माई नऊवारी नेसून, अंबाडा बांधून, त्यात फुल खोचून आणि डोळ्यावर काळा गॉगल घालून आरामखुर्चीत बसल्या होत्या. मी आणि अप्पा पिशव्या घेऊन व्हरांड्यात पोचलो तसं ऋषीन् ही आला. अप्पांनी माईना बघितलं आणि हसायला लागले. आता कानडी माणसांचं हसणं स्मितहास्य या प्रकारात मोडत नाही. ऋषिन् ला पण स्माईल प्लीज म्हणावं लागत नाही. गडगडाटी हास्य. हास्य क्लब वगैरेला न जाता. अप्पा एकदा म्हणाले होते की मेधुमेही व्यक्तीने जेवण झाल्यावर कॉमेडी शो बघितला तर ब्लड शुगर नियंत्रणात राहते. दिलखुलास हसायला पाहिजे. तसाच गडगडाट करत, " ओ हो...:-D:-D:-D:-Dडॉन राधाबाई..." अप्पा बोलले, " माफिया बॉस डॉन कार्लीऑन दिसतेस बघ अगदी...!:-D:-D:-Dअजून एक गडगडाट..! " मार्लन ब्रांडो सारखी..हा s हा s हा. ":-D:-D:-D", माईही स्वतःच्या गडगडाटी स्टाईलने हसण्यात सामील झाल्या.

ऋषिन् ला हसू आवरत नव्हते. मी पण कानडी हसणं शिकले होते, पण भाज्यांच्या पिशव्या आत नेता नेता मी हसायला लागले आणि माझ्या खिदळण्याने टोमॅटो भरलेली पिशवी हातातून निसटली आणि सगळे टोमॅटो फरशीवर गडगडले आणि सैरावैरा धावू लागले. माईना पिशवीतून डोकावून बघताना टोमॅटो पण खिदळायला लागले होते बहुतेक.

अप्पा आणि ऋषीन् चा हसण्याचा आवाज हॉलमध्ये घुमत राहिला.

मी टोमॅटो गोळा करायला सुरुवात केली तसं ऋषिन् आणि अप्पाही मदत करायला लागले. मी ते मोठ्या पातेल्यात भरून बेसिनच्या नळाखाली ठेवलं.

"टिंग..." ऋषिन् च्या हातातला मोबाईलचा मेसेज. त्यानं मेसेज वाचला आणि खदखदून हसत माझ्या हातात दिला. इराचा व्हॉट्सअ‍ॅप मेसेज होता. माईंचा वरांड्यात बसलेल्या फोटोखाली तिनं कॉमेंट टाकली होती, "डॉन को पकड़ना मुश्किल ही नहीं, नामुमकिन है..:-D:-D:-D.!

# भजन - भोजन

त्या दिवशी शुक्रवार एक मे आणि सुटीचा दिवस होता. मी आणि माई सकाळी दुसऱ्यांदा डायनिंग टेबलवर चहा पीत बसलो होतो. " अगं तेवढं ते कलिंगड चिरून ठेवशील का गं?," माई म्हणाल्या, " जेवल्यानंतर खावूया जरा गार गार फोडी."

"हो माई, चहा घेतला की लगेच चिरते." मी सांगितलं.

मी बेसिनचा नळ उघडला तेंव्हा ऋषि न् पण त्याचा चहा प्यालेला कप घेऊन आला.

" ठेव, मी विसळते." मी त्याला म्हणाले आणि कप विसळून तिथेच कट्ट्यावर पाणी निथळायला पालथे घातले आणि कलिंगड हातात घेत लं.

"ऋ, तो चाकू दे ना.."

त्यानं रॅक वरचा चाकू घेतला.

"धुवून दे."

त्यानं चाकू नळाखाली धरून झटकला.

" पुसून दे."

त्यानं पुसायला नॅपकिन घेतला. "आणि हा कलिंगड नळाखाली धरून मग जरा पुसून देतोस प्लीज..?"

मी त्याच्या हातात कलिंगड दिलं आणि त्याच वेळी टेबलावर ठेवलेला माझा फोन वाजला.

दितीमोनी. "ओ हॅलो दिती, की खोबोर.." दितीमोनीचा कॉल उचलून मी विचारलं.

" ओ मा इवी, केमोना आछेन? सॉबकीछु ठीकाछे..? की कोरबो?"

"अगं सगळं मस्त आहे. तू कुठे आहेस? दारात उभी आहेस आणि फोन करते आहेस काय..?"

"नाही. तू की कोरबो ते सांग."

"अगं पीएचडी करतीय मी.."

"हो.? बाप रे. कुठला विषय आणि काय आहे टा यटल..?

"आफ्टर इफेक्ट्स ऑफ कटिंग द वॉटरमेलॉन ऑन द डायनिंग टेबल अँड लेट द ज्यूस ड्रिप ऑन द टेबलटॉप अँड फ्लोअर, लिव्हिंग द स्टेन्स बीहायिंड टू बी क्लीनड बाय हबी... :-D:-D" ऋषीन् हसला. ' वाइफ..." असं तो काहीतरी पुटपुटला.

"हा हा हा," ती हसत म्हणाली, " काय आहे हायपो?"

"वाइफ डिमांडस् अँड हजबंड ऑफर्स टू क्लीन द डायनिंग टेबल अँड फ्लोअर..!":-P:-P:-P

"येते मी तरमूजा खायला तुझ्याकडे दुपारी.. हा हा."(•‿•)(•‿•)

" दिति, अगं मी नवीन कंपनी जॉईन केलीय. "जॉब सोडला एचएएल् मधला.."

"अगं काय सांगतेस इवि... एती अबाक कारा.. मग काय करणार आहेस आता..?"

" कन्सल्टन्सी. पे लोड सबसिस्टिम फॉर सॅटेलाईट. आणि ऋषीन् ने पण नवी कंपनी फ्लोट केलीय. त्याने पण जॉब सोडला.

"अरे... सो मेनी न्यू डेवलपमेंटस्... हे बघ, उद्या शनिवारी तुम्ही सगळे, यू ऑल फोर, माझ्याकडे डिनरला यायचंय. मला शक्य नाही हे वाक्य मला ऐकायचं नाही. तेंव्हा सगळी बातमी सांग. बाय." तिने फोन ठेवला.

"कोण ही दिति? इथे असते तुझी मैत्रीण म्हणाली होतीस ती हीच का...?" ऋषिन् ने विचारले.

" होय. अरे आयआयटी क्लासमेट. आली होती की लग्नाला. एरोस्पेसला पाचच सीट्स होत्या आणि माझ्या बरोबरच्या सगळया चारही आल्या होत्या लग्नाला. नंतर VGSOMच्या एमबीए क्लासमेट्स पण आल्या होत्या तीन दिवस अगोदर. दितीमोनी, ऐंद्रीला, मधुमिता, मौली, संध्या, पारोमा, स्नेहा, झंखना, मौशुमी

आणि संचारी. सर्वांनी हजेरी लावली होती. त्या आल्यानंतर आम्ही सर्वांनी जो कल्लोळ केला तेवढा हॉस्टेलमध्ये पण केला नसेल."

" हो? मग कूर्गमध्ये १४४ कलम लावलं असेल ना?"

"लावलं की! आमच्या घरात!... आम्ही सगळयांनी एक आठवडा आमच्याच हॉस्टेल म्हणजे मदर टेरेसा हॉलचं कॅन्टीन चालवायला घेतलं तेंव्हा घातलेला गोंधळ आणि बनवलेल्या बेचव भाज्या आणि कच्चा भात, आकार नसलेल्या चपात्या आणि मग आमची तक्रार करणाऱ्या मुली आणि त्यांची लीडर पारोमिता, तिच्या रूममध्ये दितीमोनीने सोडलेली पाल आणि पारोमिताचे किंचाळणे, आणि तिसऱ्याच दिवशी आमच्याकडून काढून घेतलेले कॅन्टीन हे आठवून आम्ही पोट दुखेपर्यंत हसलो."

"काय करते ग दितीमोनी?

"आयआयएससीत शिकवते."

"वाव..! आणि मिस्टर डे?"

"आयआयएम फॅकल्टी."

" टेरीफिक!:-):-) घरात इंजिनिअरिंग मॅनेजेमेंट आहे म्हण की! :-):-):-):-) बरं मग पारोमिता नी काय केलं?"

" दिवाळीत कॅम्पसमध्ये इल्लुमिनेशन नावाचा कार्यक्रम असायचा. त्यात आम्ही काढलेली रांगोळी पारोमिता आणि तिच्या सख्यानी पुसून टाकली होती आणि मग आम्ही तिला टॉयलेटमध्ये गाठून दहा बारा बुक्के मारून सरळ केलं होतं. ती आमच्या सायकलची हवा काढून टाकायची आणि आम्हाला लेक्चरला पोचायला वेळ व्हायचा. मग आम्ही तिची सायकलच उचलून कॅम्पसमध्ये असलेल्या जेल रोड वर ठेऊन आलो होतो."

"आता कळलं ना की तुला मी तुला का घाबरतो ते..?"

" :-D:-D:-D एकदा दिघा बीचला गेलो होतो आम्ही. एक दीड तासाचा रस्ता आहे खरगपूरहून. बीचवर तिची आणि दितीमोनीची झटापट, मारामारी आणि एकमेकींना ओरबाडणे वगैरे आठवून आम्हाला इतकं हसू आलं की ते दिवस परत यायला हवेत असं वाटलं. शेवटच्या सेमेस्टरमध्ये मात्र आम्ही पारोमिताशी जवळीक वाढवायचा प्रयत्न केला पण तिने प्रतिसाद दिला नाही. कॅम्पस सोडताना मात्र आम्ही सगळे रडवेले झालो आणि एकमेकींची गळाभेट घेताना येणारे हुंदके थांबता थांबत नव्हते. मी माझ्या लग्नाचे आमंत्रण पारोमिताला पाठवलं पण ती लग्नाला आली नाही."

"कूर्ग सारख्या ठिकाणी लग्नाला आली नाही म्हणजे बघ.." तो बोलला.

"बरं ते जाऊ दे," मी म्हणाले, "मघाशी तू हळूच वाइफ आणि काहीतरी पुटपुटलास ते काय होतं?"

" वाइफ म्हणजे डब्लू आय एफ इ, वरीज इन्वाईटेड फॉर एवर."

" अच्छा," मी कपाळावर आठ्या चढवून म्हणाले," वरिज कशाला, वर्कर इंडक्टेड फॉर एव्हर म्हण. नाहीतरी इंटरनॅशनल लेबर डे आहेच की आज. सोळा तास काम करायचं. सकाळी सहा ते रात्री दहा साडेदहा. हाऊस वाइफ. खरं म्हणजे तुलाच घरातली कामं करायला हवीत ॲज ए हजबंड. हजबंड मधला पहिला एचयूएस आहे तो house शी निगडित आहे. व्हिक्टोरियन काळातल्या इंग्लिशमध्ये हजबौंडी. त्यातल्या बौंडीचा अर्थ स्वामी, मालक. हजबंडचा मूळ अर्थ जो घरात राहतो तो. गृहस्थ, गृहस्वामी, गृहपति. घराच्या मालकांनी घर स्वच्छ ठेवायला पाहिजे. म्हणून सांगते की हजबंड या शब्दाशी तुला प्रामाणिक राहायला हवे. गृहिणी म्हणून मी कामं करायची तर गृहस्थ म्हणून तुला मला मदत करायला पाहिजे."

"ओके स्वीट डिश. तू सांग मी करतो."

"तूर्तास तो काचेचा बाउल घे मोठा आणि ह्या फोडी बाउलमध्ये टाक. बाउल समोर काचेच्या शोकेसमध्ये आहे बघ त्या वॉटर फिल्टरच्या बाजूला. धुवून आणि पुसून घे बाउल."

"येस सिकरने."

"ह्या फोडी भर बाउलमध्ये. हे हे हे हातांनी नाही. तो फॉर्क धुवून घे आणि त्यांनी उचल."

"जी अंटीन उंडी."

त्यानं फोडी भरायला सुरुवात केली. " आता बाउल फ्रीजमध्ये ठेव."

" हौदरी म्हैसूर पाक."

मला हसू फुटले. तो पण हसायला लागला.":-P:-P बर ह्या दितीमोनीचं आडनाव काय ग?"

"डे"

"मन्ना डे ची कोण?"

"खापरपणजी. :-D:-D". ऋ.. अरे तिने उद्या डिनर ला यायला सांगितलय आपल्या चौघांना. माई आणि अप्पा येतील ना रे दितीकडे..?"

"येतील की! सुनेच्या मैत्रिणींनी बोलावलंय तर जायचं नाही असं काही नाही बरं का..! आपण जाऊया."

" थॅन्क्स ऋ.." मी म्हणाले.

" ही मुलगी बंगाली आहे ना?"

" होय. का रे?"

" मला भोजनाबद्दल म्हणायचंय. तिच्याकडचं भोजन नॉनव्हेज नाही ना? माई करणार नाही तसलं भोजन. तिला शुद्ध शाकाहारी भोजन लागतं. फिश करी वगैरे भोजनात असेल तर ती भोजन करायची नाही."

"नाही, नॉनव्हेज नाही. तिला माहिती आहे. आणि हे सारखं भोजन भोजन काय लावलयस?. स्वैपाक, जेवण असे शब्द वापर की..!"

" बरं बाई.. नाही म्हणत भोजन. डिनर म्हणतो. ओके.? बर दुपारच्या भोजनाला काय आहे खास?" मी त्याला चापट मारणार तेवढ्यात, "मी जातो आता आंघोळीला." म्हणत तो गेला.

मग दुपारी आम्ही सगळे जेवायला बसलो तेंव्हा मी माई आणि अप्पाना माझ्या मैत्रिणीकडे दुसऱ्या दिवशी रात्री जेवायला बोलावल्याचं सांगितलं.

" जावूया की. सांगून टाक आम्ही येतो म्हणून." अप्पा म्हणाले.

" काय आहे नाव एवि आपण जाणार आहेत त्यांचं?" माईनीं विचारलं.

" दितीमोनी डे. बंगाली आहे. कोरमांगलाला राहते."

"ओहो. बंगाली आहे होय.. मला वाटलं कानडी आहे. होसमनी, हळेमनी, दोड्डामनी असतं तसं वाटलं दितीमनी."

":-):-):-) नाही माई, मनी नव्हे, मोनी. बंगालमधल्या सिलिगुडीची आहे."

" बर बर. जावूया की. तू असल्यावर काही चिंताच नाही गं.!"

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मग आम्ही सगळे दितीमोनीकडे जायच्या तयारीला लागलो. आम्ही निघालोय आणि तासाभरात पोहोचतो असं मी दितीमोनीला कळवलं. साडेसहाला आम्ही घराला कुलूप लावलं आणि गाडीत बसलो. मी आणि ऋषीन् पुढे आणि माई,अप्पा मागच्या सीटवर.

"चलायचं माई भोजन करायला?" ऋषिन् ने गाडी सुरु केली आणि माझ्याकडे आणि मागे बघत भोजन शब्दावर जोर देत विचारलं.

" अरे थांब जरा.. मी टाळ घ्यायला विसरले बघ. एवी, जरा कुलूप उघडून देवघरात ती टाळ ठेवलीय बघ ती घेऊन येतेस?"

" हो माई, आणते." असं म्हणून मी उतरले आणि कुलूप उघडून देवघरातून ती टाळ घेतली. मला काहीच उलगडा होईना त्यांना टाळ कशाला हवीय.. दुरुस्त वगैरे करायची असेल वाटेत म्हणून मी त्याची दोरी तुटलीय का किंवा एखादी वाटी खराब झालीय का तेही बघितलं पण ती अगदीच सुस्थितीत होती. वाजवून बघितली तर झण्ण्ण्ण sss! असा मस्त आवाज ही आला. टाळ त्यांना कशासाठी हवीय ते मी विचारलं असतं तर आगाऊपणा झाला असता म्हणून मी गप्प बसले.

मग माईंच्या हातात ती टाळ सोपवून आम्ही निघालो. गाडीत अशा तशा गप्पा चालल्या होत्या. बंगळूरच्या ट्रॅफिकला कशी शिस्त नाही, अवाढव्य वाढलेलं शहर इत्यादी. मी वाट बघत होते की माई ऋषीन् ला टाळ दुरुस्त करायला कुठल्यातरी दुकानासमोर थांबव म्हणतात की काय पण नाही म्हणाल्या. आम्ही दितीमोनीच्या अपार्टमेंटमध्ये शिरलो आणि विजिटर्स पार्किंगला गाडी लावली.

पाचव्या मजल्यावर असणाऱ्या तिच्या फ्लॅटची बेल दाबली तेंव्हा दितीमोनीने दार उघडले आणि हजार वोल्टचा दिवा लागावा तशी ती प्रसन्न हसली. आगत स्वागत झाल्यावर मग गप्पा सुरू झाल्या. शुभांकर, ऋषीन् आणि अप्पा यांचं राजकारण, अर्थकारण,

आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची स्थिती यावर चर्चा सुरू झाली आणि आम्ही किचनमध्ये दितीमोनी आणि तिचे आई वडील, आमचे शिक्षण, खरगपूर च्या गोल बाझारमध्ये मिळणाऱ्या स्वस्त कलकत्ता साड्या, कूर्गमध्ये फिरलेली ठिकाणं, भाजी किती महागली आहे, दूध, किराणा जवळपास कसे मिळते, कामाला येणाऱ्या बायका कश्या कामचुकारपणा करतात यावर बोलत बसलो. आमच्या गप्पा संपल्या आणि मग तिने ताट वाट्या घेतल्या. जेवणात झाल मुरी, कोबीशाक, लुची, कांचा आमेर चटणी आणि गोड म्हणून चोमचोम आणि पांतूवा केलेले होते.

जेवण झाल्यावर आम्ही सगळे परत बाहेर हॉलमध्ये बसलो. थोड्याशा गप्पा झाल्या आणि मग निघताना माईनीं त्यांना डबल बेडशीटची गिफ्ट बॅग दिली. त्यानंतर आम्ही त्यांचा निरोप घेतला. ती दोघं पार्किंग पर्यंत सोडायला आली.

कार रस्त्याला लागल्यावर ऋषीनने माईना विचारलं," माई, कसं वाटलं भोजन?"

माई मोठ्यांदा हसल्या. "हे खरं भोजन. छान बनवलं होतं या मुलीनी. गोड मुलगी आहे अगदी!"

" बरं आता एविला प्रश्न पडलाय की तू इथे येताना टाळ का घेतला होतास," ऋषीन् पुढे बोलला, "तिला आता सांग कथा."

माई परत हसल्या, " अगं आम्ही मुंबईत कुलाब्याला होतो रंगाचारींची बदली झाली तेंव्हा. रिझर्व्ह बॅंकेच्या ऑफिसर्स क्वार्टरमध्ये जागा मिळाली होती. शेजारी बंगाली कुटुंब होतं. बट्टाचारी त्यांचं नाव."

" माई बट्टाचारी नव्हे, भट्टाचार्य असेल," मी म्हणाले.

" अगं तीच तर गम्मत आहे, " अप्पा म्हणाले, " आम्ही शिफ्ट झाल्यावर तिसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता त्यांच्या घरातून मिसेस भट्टाचार्य आल्या. तिने स्वतःची ओळख करून दिली. श्री भट्टाचार्य बाहेरगावी गेले आहेत आणि तुम्ही आमच्याकडे बारा वाजता भोजन करायला या असं तिनी राधाला सांगितलं. फक्त राधालाच बोलावलं होतं. ती भट्टाचार्य म्हणाली आणि हिला वाटलं बट्टाचारी."

"अगं मी कानडी बोलले तर ती हिंदी बोलायला लागली आणि तेही मोडकं तोडकं!" माई म्हणाल्या, "मला फक्त बारा बजे आणि भोजन एवढंच कळलं."

":-):-):-) मग?" मी विचारलं.

"मी मग स्वैपाक केलाच नाही. रंगाचारी कचेरीला गेल्यावर बारा वाजता मी तिच्याकडे गेले. हॉलमध्ये पंधरा वीस बायका बसल्या होत्या. टीपॉयवर दुर्गादेवीचा हार घातलेला फोटो ठेवला

होता. समई लावली होती. मी गेल्यावर तिने हसून स्वागत केलं, बसायला छोटी चटई दिली आणि माझ्या हातात टाळ दिला. मग त्यांनी दुर्गेचे स्तोत्र असं काहीतरी म्हंटलं आणि मग भक्ती गीते म्हणत टाळ वाजवायला सुरुवात केली. मी फक्त टाळ वाजवत राहिले कारण त्यांची गाणी कळतच नव्हती. शेवटी एक वाजला तेंव्हा टाळ वाजवणं बंद झालं. मग प्रसाद म्हणून चमचाभर शिरा दिला. हळू हळू सगळ्या बायकांनी जायला सुरुवात केली. मला वाटलं की सगळ्या गेल्या की खास माझ्यासाठी जेवायला केलं असेल शेजारधर्म म्हणून. शेवटी मी एकटीच राहिले. तेंव्हा पाच एक मिनिटं वाट पाहून ती "भोजन हो गया" असं म्हणाली. मला आश्चर्यच वाटलं. म्हंटलं कधी झालं भोजन? हे टाळ वाजवणं म्हणजेच भोजन असं म्हणाली. मी चुपचाप घरी आले आणि उप्पीट करून खाल्लं."

"मग कळलं की तिला भजनाला या म्हणायचं होतं पण ती बंगाली असल्याने भजनचा उच्चार भोजन असं केला होता." अप्पानी स्पष्ट केलं.

"आणि म्हणून आज बंगाली मुलीनी भोजनाला बोलावलंय म्हणून मी भजन असेल असे समजून टाळ घ्यायला सांगितलं तुला

पण मी काल म्हंटलंच होतं की तू असलीस की चिंता नाही." माई पहाडी हसत म्हणाल्या, "फ्रॉम बेंगाल विथ लव्ह!"

आम्हीही त्यांच्या पहाडी हास्यात सामील झालो.

....

*VGSOM= विनोद गुप्ता स्कूल ऑफ मॅनेजमेंट, आयआयटी, खरगपूर.*

*बंगाली:*

*की खोबोर = काय विशेष ( बातमी)*

*ओ मा इवी, केमोना आछेन? सॉबकीछु ठीका आछे..? की कोरबो.? = ओ हाय एवी, कशी आहेस? सगळं ठीक आहे? काय करतेस?*

*एती अबाक कारा = This is surprising! या अर्थी.*

*कानडी:*

*सिकरने = शिकरण*

*अंटीन उंडी = डिंकाचे लाडू*

*हौदरी = होय हो (आदरार्थी)*

# गजांतलक्ष्मी

"ऋषि उठला का गं?" माईनी विचारलं

"नाही अजून माई."

अरे तुम्हाला लवकर निघायला हवं गुरुवायुरला पोचायचं असेल तर."

"तो म्हणाला आपण सहा वाजता निघालो तरी संध्याकाळी सहा वाजता पोचतो."

"हा असाच आहे लहानपणापासून. रात्री नुसतं जागायचं. दोन दोन वेळा अंगाई गीत गायचं तरच हे महाशय झोपणार."

" कुठलं लल्ला बाय माई?" मी विचारलं.

" सांगते गं, पण त्याला तुला मांडीवर घेऊन म्हणता येणार नाही त्याचं काय?!"माईनी माझी फिरकी घेतली.

" मला सांगा माई, पुढच्या वर्षी उपयोगी पडेल ना..!" मी ही गुगली टाकली.

माई हसल्या. "अगं ते, आनी बंत आनी, या उर आनी, इल्लिग याक बंदित्तू, हादी तप्पे बंदित्तु... मी शिकवीन तुला तू परत आलीस की."

" ऐकुन ऐकुन हे अंगाई गीत ऋषिन् ला पाठ झालं असेल ना माई?"

" तुला झोप येत नाही असं एकदा सांगून बघ. मग बघ तो हे म्हणतो का..."

मला झोप येत असेल तरीही तो मला जागवतो ते माईना कसं सांगायचं?....तेवढ्यात ऋषिन् किचनमध्ये आलाच. त्याला चहा दिला आणि मी बॅग भरायला घेतलं.

आम्ही हॉलमध्ये माई आणि अप्पांचा निरोप घेत होतो तेंव्हा अप्पा म्हणाले, " कुठला रुट घेतोयस ऋषि?"

" म्हैसूर, बांदीपूर, मुदुमालाई, नीलंबुर,गुरुवायुर. सव्वाचारशे किलोमीटर होईल साधारण.."

" होय. चांगला रूट आहे. बांदीपूर, मुदुमालाई...व्वा... हत्तीच हत्ती दिसतील बघ. नाइस रूट. पण बांदीपूर नंतर खायला मिळत नाही कुठेच. सो ईट बेलिफुल सम व्हेअर... खाऊन घ्या भरपूर."

"ओके अप्पा. येस... बाय अप्पा.. बाय माई.."

दोघांना बाय करून आम्ही कारमध्ये बसलो तेंव्हा सकाळचे सहा वाजले होते.

बांदीपूर अभयारण्यात प्रवेश केला तेंव्हा अकरा वाजले होते आणि तिथल्या सिक्युरिटी गार्डने कारचा हॉर्न वाजवायचा नाही,

मध्ये कुठेच उतरायचे नाही आणि कार वेगात चालवायची नाही अशा सूचना केल्या. रस्त्यात मध्येच एखादा हत्ती, वाघ दिसला तर गाडी हळू चालवा पण थांबू नका असेही त्याने सांगितले.

"माझ्या गाडीत एक वाघीण आहे तिला इथल्या जंगलात सोडता येईल काय?," ऋषीन् कारची काच वरती घेत त्या गार्डला पुटपुटला.

"काय म्हणालात सर?"

"मी म्हणालो की गाडीवर वाघ हल्ला तर करणार नाही ना..?

"इल्ला सर, तो हसत बोलला, "ते अगदी रेअर्ली दिसतील. हां आनी मत्तु काणस्ताव री साहेबरू.." (हां. हत्ती मात्र दिसतात हो साहेब...)

"ओके ओके.." असं म्हणत ऋषिन् ने गाडीला वेग दिला तसं मी त्याच्या दंडाला चिमटा काढला. "मी वाघीण काय? जंगलात सोडणार तू मला?"

"आपण दोघं राहायचं गं...! तू शिकार कर मी स्वैपाक करतो."

"तू.... हा हा हा.. स्वैपाक करणार?"

"बर तू कर, मी शिकार करतो."

"बायकांच्या मागचा स्वैपाक काय सुटत नाही बघ."

"जिनिव्हा करार माहिती आहे?"

"होय, त्याचं काय?"

"त्या करारानुसार प्रत्येक कैद्याला जेवण देणं बंधनकारक आहे."

"तू आणि कैदी..? मलाच गळयात मंगळसूत्र घालून, कैद करून तुझ्या घरात ठेवलंय तू.... कूर्गला आला होतास मला पळवायला...."

" लेकीन मुझे तुमसे प्यार हो गया और आपको मुझसे मुहब्बत।

" मुहब्बत ही ना जो समझे वो जालिम प्यार क्या जाने..."

"गला किस का कटा, क्यों कर कटा, तलवार क्या जाने..."

"काय चाललंय ऋ.... मघाशी वाघीण म्हणालास, आता तलवार..."

"अगं तलवार वगैरे काहीं नाही गं, स्टॉकहोम सिंड्रोम..."

"ओह.. के... व्वा व्वा.. सो स्वीट..."

त्याला अजून एक चिमटा काढला तेवढ्यात " ते बघ, ते बघ" असं म्हणत त्याने कारचा वेग अगदी हळू केला आणि जरा लांबवर दिसणाऱ्या हत्तीच्या कळपाकडे बोट दाखवले. "आनी बंत आनी, या उर आनी, इल्लिग याक बंदित्तू, हादी तप्पे बंदित्तु..." तो म्हणाला. हिरव्या कंच गवतातून उंच हत्ती हळू हळू चालत जात

होते. उजवीकडे नजर गेली तर अगदी जवळ हरणांचा कळप दिसला. ते डोळे रोखून गाडीकडे बघत होते आणि गाडी जवळ आल्यावर टणा टणा उंच उड्या मारत हिरव्या झाडीत दिसेनासे झाले. त्यांच्या बरोबरीने दहा बारा माकडं झाडावरून उड्या मारत गेली.

बांदीपूर संपल्यावर दहा मिनिटात मदुमालाई नॅशनल पार्कमध्ये प्रवेश झाला आणि प्रवेश द्वारावर सेक्युरिटी गार्डने तेच सांगितले जे बांदीपूर इथल्या गार्डने सांगितले होते. अगदी त्याचप्रमाणे हत्ती, माकडे, हरण दिसले. इथे मोर मात्र बरेच होते. नॅशनल पार्कच्या बाहेर पडल्यावर जे पहिलं हॉटेल दिसलं तिथे गाडी थांबवली आणि फ्रेश होऊन खाऊन घेतलं. त्यानंतर ऋषि न् ने गाडीचा वेग वाढवला आणि मध्ये एकदाच पेट्रोल पंप वर थांबून नंतर निघालो ते संध्याकाळचे सहा वाजले गुरुवयुरला पोचलो तेंव्हा. गाडीत बसून अंग एवढं आंबलं होतं की केंव्हा एकदा हॉटेलमध्ये जाऊन फ्रेश होतो असं झालं होतं. स्टर्लींग हॉटेलला कार पार्क केली तेंव्हा संध्याकाळचे साडेसहा वाजले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून नऊ वाजता मंदिरात गेलो. हे मंदिर म्हणजे दक्षिणेची द्वारका. मंदिर परिसर आणि तिथली दुकानं बघण्यासारखी आहेत. ते बघितल्यानंतर मग मंदिराच्या ताब्यात

असणारे हत्ती बघून येऊ असा विचार केला. मंदिराच्या मागच्या बाजूला साधारण तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या अन्नाकोट्टा नावाच्या परिसरात विशाल मैदानावर हे सर्व हत्ती असतात. हे ठिकाण टुरिस्ट स्पॉट म्हणून चांगलेच नावाजलेले आहे.

"एवढ्या सकाळी एवढे सगळे टुरिस्ट?" ऋषिन् म्हणाला.

"व्वाव.. खरंच की, तिकिटाला एवढी लांब लाईन?"

शेवटी आम्ही आत शिरलो. हत्तींना आंघोळ घालण्याचा कार्यक्रम बरेच ठिकाणी चालला होता. एका हत्तीच्या समोर उभे राहून आम्ही बघत होतो. त्याच्या अंगावर पाईपने पाणी मारले जात होते.

"किती हत्ती आहेत इथे?" ऋषिन् ने त्या माहूताला विचारले

"एकसष्ट हत्ती आहेत."

"किती वजन असतं हो ह्यांचं?"

"साडेसहा हजार किलोग्रॅम पर्यंत असतं आणि तेरा ते चौदा फूट उंच असतात बघा ते."

"ओहो.. बरं.. पिल्लू हत्तीचं वजन काय असतं?"

"जन्मलेल्या पिल्लुचं नव्वद शंभर किलो असतं. ताकदवान प्राणी आहे बघा. माणसानं त्याच्या ताकदीचा बराच वापर केला. लाकूड वहा, युद्ध कर, मिरवणूक काढ, हस्तिदंत चोरण्यासाठी

मारून टाक... बिचारे... त्या विरप्पनने दोन अडीच हजार हत्ती मारले बघा.."

"आता एवढे दिवस, एवढी वर्षे हत्तींच्या सानिध्यात घालवल्यावर त्यांची भाषा तुम्हाला कळतच असेल ना..?" मी विचारलं.

"होय, त्यांची भाषा शिकवायला येतात महाराष्ट्रातून एक साहेब. ते हत्तीशी बोलतात.आनंद शिंदे नाव आहे बघा."

"व्हॉट.. रिअली? सरप्रायझिंग....! काय काय बोलता हत्तिशी तुम्ही? ह्याचं नाव काय?"

"एक तर ही हत्तीण आहे. नाव मंगला. यांच्यात मातृसत्ताक पद्धती असते. त्यांच्याशी खूप प्रेमाने बोलावं लागतं. यांना सात आठ किलोमीटर दूर असलेला बारीक आवाज पण ऐकू येतो. आम्ही शक्यतो कमी आवाज करतो. ते सोंडेने पाणी उडवतात ते व्यायाम म्हणून, खेळ म्हणून नाही. त्यांची स्वतःची एक वेगळी भाषा असते ते आपल्याला कळत नाही पण सात आठ किलोमीटर दूर असले तरी पण त्यांना त्यांची भाषा कळते. हे दहा प्रकारचे आवाज काढतात. बार्क, क्राय, ग्रंत, हस्की, रोर, रंबलींग, रेव्ह हे आवाज माणसाला ऐकू येत नाहीत पण ट्रम्पेट, नेझल ट्रम्पेट आणि

स्नोर्ट ऐकू येते. भिंतीच्या अलीकडे आणि पलीकडे दोन हत्ती ठेवले तरी ते त्यांच्या भाषेत बोलतात."

"भीती नाही वाटत तुम्हाला ते सोंडेनी तुम्हाला उचलतील? किंवा पळून जातील?"

तो हसायला लागला. "नाही, काही करत नाहीत ते. साखळी आहे ना त्यांच्या पायात. लहान पिल्लू असतात तेंव्हापासून त्यांच्या पायात आम्ही अगदी हलकी साखळी बांधून ठेवतो. ते सुटण्याचा प्रयत्न करतात पण ती साखळी त्यांना पायाला काचते आणि तिथे जखमा होतात. असं चार पाच वेळेला झालं की ते पळायचा प्रयत्न करायचं सोडून देतात. मग साखळी काढून आम्ही साधा दोर बांधतो. काही दिवसांनी दोर काढून टाकतो. आम्ही त्यांना एका मानसिक सापळयात अडकवल्याने ते कुठे जात नाहीत. हे हत्ती केव्हाही त्यांच्या बंधनातून मुक्त होऊ शकतात परंतु ते तसे करूच शकत नाहीत. त्यांना माहीतच नाही ते बंधन तोडू शकतात."

" अरेरे.. बिचारे, " ऋषि न् म्हणाला... " अजून दिसतायत पायाला ते जखमेचे वळ..."

एकूणच हत्तीबद्दल ही माहिती ऐकून मन थोडे सुन्न झाले.

एक दोन तास त्या पार्कमध्ये फिरल्या नंतर तिथली मंदिरं बघितली आणि मग थ्रिसूरला जायचं ठरवलं. वाटेतच खाणं करून मग थ्रिसूरहून यायला चार वाजले. आल्यानंतर गुरुवयुर फिरून झालं आणि कृष्णाचं दर्शन परत एकदा घेऊन हॉटेल वर परतलो. रात्री बेडवर झोपल्यावर मी ऋषिला म्हणाले, " ऋ..... मला झोप येत नाही, माई तुला लहानपणी अंगाई गीत म्हणायच्या ते म्हण की..." मी हसत बोलले.

"अगं ते...? म्हणतो की." त्याने माझ्या डोक्यावर थोपटायला सुरुवात केली आणि म्हणायला लागला, " आनी बंत आनी, या उर आनी, इल्लिग याक बंदित्तू, हादी तप्पे बंदित्तु...."

मी कुशीवर वळले आणि त्याच्या पायावर पाय टाकला. माझा पाय त्याच्या पायावर पडल्यावर तो म्हणायचा थांबला आणि उठून बसला. मी पण डोळे उघडले.

"एवी," तो बोलला, " आय नेव्हर न्यु की जो हत्ती मला लहानपणी झोपवायचा तो हत्ती लहानपणी किती यातना भोगायचा ना..? पायात साखळ्या घालून त्याला अवखळपणे हुंदडू पण देत नसत. खूप वाईट वाटलं बघ सकाळचं ते हत्तीबद्दल ऐकून."

मी ही उठून बसले. " हो ना.. अरे मला पण वाईट वाटलं रे... पण तुला आता का आठवलं ते?"

"तुझ्या पायातली साखळी टोचली आणि माझ्या मनात तो विचार तरळला.."

मला हसू फुटलं.. " मला हळूच इंडिरेक्टली हत्ती म्हणतोयास ना...?"

"हत्तीच्या पिल्लाच्या वजनानुसार अर्ध वजन आहेच की तुझं..."

मी त्याच्या पाठीत एक गुद्दा घातला.

"एवी, जोक अपार्ट, सिरीयसली सांगतोय स्विटी, तू एक काम करशील काय?"

"काय?"

"परत पायात कधीही साखळी घालू नकोस. प्लीज."

" अरे..." मी हसत बोलले," एकतर मी हत्तीण नाही आणि सेकंडली तू मला कधीच बंधनात ठेवलं नाहीयेस, पूर्ण स्वातंत्र्य दिलंयस... मग व्हाय वरी?"

" मला सारखे हे हत्ती आठवत राहतील तुझ्या पायातली साखळी बघितली की..."

"ओके डिअर, ये लो मैं निकाल देती हूं.." असं म्हणत मी दोन्ही पायातल्या साखळ्या काढून टाकल्या.

दुसऱ्या दिवशी बेंगलोरला पोचलो तेंव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते.

"कशी झाली ट्रीप?" आम्ही हातपाय धुऊन डायनिंग टेबल वर बसल्यावर, माईनी चहाचे कप आमच्यासमोर सरकवले आणि त्यांनी आणि अप्पांनी प्रश्न केला.

"बेस्ट," ऋषि बोलला, " वेरी मेमोरेबल. मस्त. मजा आली.थ्रिसूरला पण जाऊन आलो काल दुपारी."

"एवि, अन्नाकोट्टातले हत्ती बघितले का?"

"हो अप्पा. बघितले आणि बरीच माहिती मिळाली." मी ट्रीपची सगळी हकीकत सांगितली आणि अप्पाना आणि माईना हे ही सांगितलं की मी आता पायात साखळी कधीच घालणार नाही. आय वॉन्ट टू रिस्पेक्ट ऋषिज् फिलींग्ज.

"नको घालू. खरंच आहे ते. गजांतलक्ष्मी म्हणायचं आणि साखळदंडांनी करकचून ठेवायचं त्या हत्तींना," माई म्हणाल्या, " साक्षात् गजानन तो आणि त्याला बांधून ठेवायचं म्हणजे काय?"

"पिटिफुल" अप्पा म्हणाले.

आणि त्या दिवसापासून माझ्या पायात साखळी नाही.

......

*(आनी बंत आनी, या उर आनी, इल्लिग याक बंदित्तू, हादी तप्पे बंदित्तु... हत्ती आला हत्ती, कुठल्या गांवचा हत्ती, इथे का आला होता, वाट चुकून आला होता...)*

# ट्रेनी घोस्ट

ओव्हरटाईमचा रेट काय असतो?"

"डबल. म्हणजे रोजच्या आठ तासाचे हजार रुपये मिळत असतील तर ओव्हरटाईमला आठ तासाचे दोन हजार मिळतात."

"वोव! पण फक्त ३१ डिसेंबरलाच ना?"

"होय पण समजा तुझी बदली दिल्लीला झाली तर दोन हजार प्लस बोनस असतो. म्हणजे प्रत्येक डेड बॉडी मागे पाचशे रुपये."

"अरे, तू मला माझा असिस्टंट बनवलास, माझा इंटरव्ह्यू झाला नाही, इन फॅक्ट मी ह्या जॉबसाठी ॲप्लिकेशनच केलं नाही तरी मला लगेच हा जॉब कसा काय मिळाला?" मी त्याला विचारलं.

"अरे तू ड्रिंक घ्यायला सुरुवात केली तेंव्हाच तू तुझा मार्ग निश्चित केलास. एका विशिष्ट लिमिट बाहेर तू प्यायला लागलास

तेंव्हा आम्ही तुला प्रोस्पेक्टिव एम्प्लॉइ म्हणून तुझ्या नावासमोर टिक् केलं होतं. हे बघ, आम्हाला पण दारू आवडते. नथिंग रॉंग इन दॅट. बर आम्ही स्मशानात असतो हे तू ऐकलंय का?"

"होय."

"आणि कोण असतं स्मशानात सांग बरं?"

"काय ते तुमची हेरार्की असते ते, भूत, खवीस, पिशाच्च, समंध, ब्रह्मसमंध, हडळ वगैरे... हो ना?"

"फार मोठं आहे, ऐक, अवगत, अलवंत, आसरा, कालकायक, गानगूड, गिऱ्हा, बायांगी, चिंद, जखीण, झोटिंग, तलखांब, दाव, देवाचार, ब्रह्मसमंध, ब्रह्मग्रह, मुंजा, राणगा, लावसट, शाखिणी, सैतान, सटवी, हडळ, खविस, पिशाच्च आणि वीर वगैरे."

"इतके सगळे... कुठे असतात हे?"

"अरे, जुनी पडकी घरं, जंगल, चिंचेच्या झाडावर, नागचाफा आणि आवळयाच्या झाडावर, गावाच्या वेशीवर, डोंगरावर, पिंपळावर, विहिरीत, आणि मी उभा आहे तसा हायवेवर. बरेच एम्प्लॉइ झोनल ऑफिसला आहेत. फिमेल भुतं झोनल ऑफिसला असतात."

"अरे व्वा, फिमेल कोण कोण आहे?"

"अवगत, अलवंत, जखीण, लावसाट,शाखिणी,
डाकण, सटवी, हडळ..वगैरे."

"दिसायला छान आहेत काय?"

"इंडक्शनच्या वेळी बघशीलच की. त्यातल्या त्यात हडळ छान आहे. झीरो फिगर मेन्टेन केलंय. मिस् कोकण होती म्हणे. जायचयं आपल्याला झोनल ऑफिसला इंडक्शनसाठी."

"कुठे आहे झोनल ऑफिस?"

"कोकणात. आणि हो, आमच्याकडे पण विशाखा समिती स्थापन करण्यात आली आहे त्यामुळे फीमेल स्टाफशी बोलताना बी कोर्टस् अँड जंटल. खास करून मिस् हडळशी. तिचे बरेच आशिक आहेत. अगदी हाडाचे. सो बी केअरफुल."

"येस बॉस."

"मी विचारलं स्मशानात अजून कोण राहतेय ते तू सांगितलच नाहीस."

"जेवढं माहित आहे तेवढं सांगितलं."

"अरे शंकर पण असतो."

"कोण? शंकर..? देव? म्हणजे महादेव? शिव?"

"होय. आणि त्यांचा लेफ्टनंट कमांडर पण."

"हो? म्हणजे कोण?"

"कालभैरव. त्यांचं हेड ऑफिस उज्जैनला. त्यांना दारूचा नैवेद्य दाखवतात. भक्तांना प्रसाद म्हणून दारू देतात. म्हणून मी म्हणालो की आम्हाला पण दारू आवडते. तुमच्याकडे ओल्ड माँक आहे तसं आमच्याकडे वृद्ध मुनी आहे, रेड लेबल आहे तसं रक्तवर्णी आहे, टीचर्स तसं गुरु आहे, एट पीएम् तसं ट्वेलव ओ क्लॉक आहे, डिप्लोमॅट तसं भूतकारणी आहे. नथिंग रॉंग इन दॅट. पण लिमिट बाहेर नाही."

"पण मला अजुन अपॉईंटमेंट ऑर्डर मिळाली नाही."

"तेच घ्यायला जाणार आहे आपण उद्या."

"कुठे? "

"एच आर डिपार्टमेंट. आपल्या झोनचं कोकणात आहे. तुझं इंडक्शन पण होऊन जाईल. प्रोबेशन संपलं की मग पर्मनंट."

"कोण आहे एच आर हेड?"

"मिस् सटवी भूतानी."

" सिंधी की पारसी?"

"नो आयडिया."

"ओके. माझी सध्याची पोस्ट कुठली आहे?"

"ट्रेनी घोस्ट. सहा महिन्याची प्रोबेशन. बघ बघ... ती एस यू वी.. १२० स्पीडने येतीय.. हात दाखव.... तुझी ट्रेनिंग सुरू…"

# काईट इन द स्काय.

मी आईला फोन करून सांगितलं की आताच कुशालनगरहून निघते आहे. तिला कळलं की एक दीड तासात मी घरी पोहोचेन. तासाभराने मी राजाज् सीटला वळसा घालून जनरल थिमय्या रोडला लागले तेंव्हा सकाळचे साडे दहा वाजले होते. पोरं रस्त्यावर पतंग उडवत होती. रोडच्या शेवटाला आमचे घर. आई गेट उघडण्याच्या तयारीत वरांड्यातच थांबली होती. मी गाडीतून उतरून तिच्याकडे धावत गेले.

"मामो", मी तिला मिठी मारली आणि तिच्या गालावर ओठ टेकवले तसं तिनं मला गच्च आवळून धरलं. तिचे डोळे तरारले आणि आपसूक अश्रू ओघळायला लागले. असं हे न चुकता प्रत्येक भेटीत व्हायचं. आवेग ओसरल्यानंतर पहिला प्रश्न तिचा एकच असायचा, " आ त्यू मांजे आं वोयाज? त्यू देवे अव्वार फाम.."

ह्या भेटीतही काही वेगळं नव्हतं.

"अगं मी खाल्लय मघाशी कुशालनगरमध्ये. तू खाल्लं नसशील नेहमीप्रमाणे. हो ना..?"

ती हसली. " आई झालीस की कळेलच तुला, लेकीची वाट पाहत असताना खाल्लं जातं का ते...!. बर चल आता. तुला शॉवर खाली बसायचं असेल ना..? पण कॉफी घे अगोदर. आता गरम करते एका मिनिटात ओवनमध्ये."

"खायला काय केलंयस?"

"अक्की रोटी आणि कडंबत्तू."

"सो स्वीट मामो!"

वर्षातून तीन चार वेळा मी कुर्गला आले की आईचा चेहरा आनंदाने उजळायचा. मी बेंगळूर सोडायचे सकाळी साडेपाच वाजता. आदल्या दिवशी ऋषिन् माझी अल्टो सर्व्हिसिंग करून आणायचा. पेट्रोल, स्पेअर टायर आणि हवा वगैरे सगळं बघून गाडी तयार ठेवायचा.

" आईला भेटायला चालली आहेस तर गाडी फास्ट चालवू नकोस. जायला साडेसहा तास लागतात. तू पाच तासात पोचलीस असं मला कळलं तर बघ...आणि प्रत्येक तासाला फोन कर." मी लग्न झाल्यावर पहिल्यांदा चालले होते तेंव्हा ऋषिन् च्या सूचना.

" ऋ, मी आईला घेऊन कितीतरी वेळा गेलीय कूर्गला. तुला घेऊन गेले होते ओळख करून द्यायला ते विसरलास ना..? ह्या वेळी चार तासात पोचायचं म्हणते मी." मी त्याला चिडवलं.

"नको. मग तू फ्लाईट घे."

"तू विमान घेऊन दे."

"ओ हाय नीता अंबानी.. हाऊ आर यू..?"

"तू मुकेश नाहीस."

"विमान घेणं काही अवघड नाही. आय कॅन बाय. फक्त दहा लाखाला फ्रॅक्शनल ओनरशिपने सेस्ना १७२ मिळते. आणि तुझ्यासाठी दहा लाख म्हणजे पीनट्स.. यू आर प्राइसलेस...! तू पायलट लायसेन्स मिळव आणि मग मी विमान घेतो."

"बराच डिप्लोमॅटिक आहेस हां तू ऋ...."

"अगं मी तुला बेंगळूर कूर्ग फ्लाईट घे म्हणत होतो."

"बोअर फ्लाईट आहे ती. त्यापेक्षा अल्टो बेस्ट. होम टू होम."

"पण मघाशी सांगितलं तसं प्रत्येक तासाभराने फोन कर. नाहीतर मी करीनच म्हणा."

"बरं बाबा.. करते फोन. किती काळजी करतोस रे...? एम आय अ बेबी नाऊ?'

" बेबी नाहीस, बार्बी आहेस," असं म्हणत त्यानं मला जवळ ओढलं.

मी दोन तीन वेळा असा प्रवास केल्यावर ऋषिन् चा विश्वास बसला पण तरीही प्रत्येक तासाला फोन करायचं फर्मान चुकवता

येत नव्हतं. अती काळजी... मी सांगायचे अरे ड्रायव्हिंग करताना डिस्टर्ब होतं पण नाही. मला हवं तसं करू द्यायचाच नाही.

सुरुवातीला बाथरूममध्ये इलेक्ट्रिक गिझर होता. बिल फार यायचे म्हणून नंतर गॅस सिलिंडर वापरून गिझर चालायचा. लग्न ठरल्यावर ह्याने गॅस पाइप लाइनसाठी अर्ज करून बाथरूम मधल्या गिझरला पण पाइप जोडली. सिलिंडर भडकेल अशी भीती... मी हसून म्हणाले होते की अरे, मला कळतं ना बाबा.. मला स्वतःची काळजी घेता येते की...!

एके दिवशी माझी आंघोळ झाल्यावर तो बाथरूममध्ये शिरला आणि लगेच बाहेर आला.

" एवी, तू बाथरूमच्या खिडकीच्या काचा बंद का केल्या? गॅस कोंडून राहतो, इट्स डेंजरस्."

त्या दिवशी नेमकं बाथरूम मधून बाहेर येताना चुकून काचा वरती करायच्या विसरले होते.

"ते मागचं आंब्याचं झाड दिसतेय? रोज एक मंग्या बसलेलं असतं नेमकं मी आंघोळ करताना.."

" ओ हो..!" तो उद्गारला. " आपण बाथरूमला अशोक वाटिका म्हणुया का?"

" का..?"

" श्री रामाची ओळख म्हणून अंगठी टाकणार असतील हनुमान तर? त्यांना एक संधी दे की.. कशाला काचा बंद करतेस..?"

:-D:-D:-D हा हा हा... फ.. फ.. हाऽहाऽहा... मला हसू आवरेना..!

"असं काय चलती का नाम गाडी मधल्या मधुबाला सारखी हसतेस..?"

मी साडी नेसायला बेडरुममध्ये शिरले. "तो पडदा ओढ...." मी खिडकी कडे बोट दाखवत सांगितलं. त्यानं पडदा ओढला.

"सांग ना..? का हसतेस?"

"तुला दहा तोंड असती तर कसा दिसला असतास याची कल्पना करत होते.... :-D:-D:-D...." मी साडी नेसत म्हणाले.

"का? का..? मी रावण का..?"

"अशोक वाटिका बीलॉंगज् टू......!"

अजून मी निऱ्या खोचतीय तेवढ्यात मला जवळ ओढून डोळ्यात डोळा घालत म्हणाला, " खरं म्हणजे तुला दहा तोंडं असायला हवी होती...."

नंतर तासाभराने नेहमीच्या इलेक्ट्रिशियनला फोन करून त्याने एक्झॉस्ट फॅन मागवले आणि सगळया बाथरूममध्ये बसवले.

" पाहिजे तेवढं बंद कर आता खिडकी..." तो म्हणाला.

दोन दिवसांनंतर बेडरूममध्ये रात्री त्याचं माझ्या डाव्या पोटरीवर उमटलेल्या व्हेरिकोज व्हेन्स वर लक्ष गेलं.

" एवि, अगं काय हे..? तो डोळे विस्फारून म्हणाला, " व्हेरिकोज टरारून आलेत... चांगलं नाही ते..."

"अरे फर्गेट इट... नॉट सिरीयस. काही होत नाही. आज ऑफिस मधे जास्त चालले म्हणून झालं असेल तसं..."

" तुझं लक्ष नाही तुझ्या पायाकडे..."

"माझ्या पोटऱ्या कोण बघतं शांग बलं माज्या शोन्या.." मी लाडात बोलले.

"मीच. आणि उद्या डॉक्टर बघतील. उद्या डॉक्टरकडे जावून दाखवून येऊ बिफोर इट गेट्स कॉम्प्लीकेटेड. आणि ते हाय हील वापरू नकोस आता."

"नो वे... हाय हील, सूट, ब्लेझर घातल्यावर जो कॉन्फिडन्स येतो ना.. तो आवश्यक आहे ऑफिसात काम करताना.... रियल एक्झिक्युटिव्ह वाटतं..."

"असं काही नसतं. हॅविंग कॉन्फिडन्स इज ए स्टेट ऑफ माईंड..."

" मला प्रॉपर् गियरमध्ये असेल तरच

कॉन्फिडन्स येतो. फिट वाटतं. साडी घालून जिममध्ये व्यायाम होईल का? लग्नाला जाताना ट्रॅक सूट आणि स्पोर्ट्स शूज चालेल? कॅजुअल वॉक घेताना कुर्ता पायजमा कोणी घालेल? जीन्स आणि टी शर्टच करेक्ट आहे. एवरी ओकेजन हॅज इट्स ओन गियर. आणि त्याच प्रमाणे ऑफिसचा माझा ड्रेस ठरलेला आहे."

" लिव्ह इट. मला तुझे पाय बघू देत." असं म्हणत त्यानं दोन्ही पाय, पावलं, घोटे आणि मांड्या तपासल्या. मी पण माझे पाय बघू लागले. इतक्या निवांतपणे मी पण माझे पाय पहिल्यांदाच बघत होते. घोट्यावर अगोदर तीळ नव्हता तो अचानक दिसायला लागला. पोटरीवर एकदमच चार तीळ..?! कुठून आले कोण जाणे.!

दुसऱ्या दिवशी रेडीओलोजिस्ट कडे गेलो. त्यानं सगळी माहिती दिली आणि हाय हील टाळा असं सांगितल्यावर ऋषि न् माझ्याकडे बघून हसला. व्वा... काय आनंद झाला होता त्याला. मला त्याच्या हसण्याचा इतका राग आला ना... छद्मी हास्य वाटलं मला ते. " शक्य तो सपाट बूट वापरा," डॉक्टर म्हणाले," स्पोर्ट शूज उत्तम. घरात पण चप्पल वापरत असाल तर कुशन असलेले बूटच वापरा." त्यांनी स्टोकिंग्ज वापरण्याचा सल्ला दिला. मग स्टोकिंग्ज, ते चढवायला वेगळे हातमोजे, सॉक्स, पावडर वगैरे खरेदी झाली

आणि स्टोकिंग्ज पायात कसे चढवायचे त्याचे प्रात्यक्षिक झाले. " प्रेग्नन्सीमध्ये व्हेरिकोज व्हेन्स आणखीन फुगतील त्यामुळे बेटर यू स्टार्ट युझिंग स्टोकिंग्ज," डॉक्टर म्हणाले.

"डॉक्टर," मी म्हणाले, " नाहीतरी मी स्टोकिंग्ज घालणारच असेन तर हाय हील घालायला काय हरकत आहे?" मी ही मागे हटणार नव्हते.

" ब्लड पंपिंग पूर्ण होणार नाही. आणि पोटऱ्या फुगल्या तर व्हेन्स चुकून फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. मग रक्तस्त्राव होतो. तो टाळायला पाहिजे."

"अँड दॅट इज अँन एक्झिक्युटिव्ह ऑर्डर ऑफ द डॉक्टर, " ऋषिन मुद्दामच एक्झिक्युटिव्ह या शब्दावर जोर देत म्हणाला.

घरी येईपर्यंत मी त्याच्याशी काहीच बोलले नाही. माझा फुरंगटलेला चेहरा बघून तो ही गप्प बसला होता. रात्री बेडरुममध्ये पण माझ्या कपाळावर आठ्या होत्या.

"पल भर के लिए कोई हमें प्यार कर ले, झूठा ही सही....दो दिन के लिए कोई इकरार कर ले.." त्यानं गुणगुणायला सुरुवात केली. मी कूस बदलली आणि त्याच्याकडे पाठ केली.

देव आनंद आमच्या दोघांचा वीक पॉइंट. सीसीडीला आम्ही दुसऱ्यांदा भेटलो तेंव्हा मी त्याला त्याचे फेवरिट एक्टर्स विचारले होते.

" देवमाणूस." तो म्हणाला. (कानडीत देव मनुष्य)

" म्हणजे देव आनंद ना..?"

" अगं देव आनंद, मधुबाला, नूतन आणि साधना. म्हणजे प्रत्येकाच्या नावातली काही आद्याक्षरे घेऊन देव माणूस. म्हणजे डीइवी देव, एमए मधुबाला, एनयू नूतन, एस्, साधना..! आणि ग्रेगरी पेक आवडतो."

" ओ..हो.. टू किल अ मोकिंगबर्ड! हम दोनों की पसंद बिलकुल एक जैसी है...!" मी म्हणाले.

तो गाणं म्हणायला लागला आणि मग जेंव्हा, " काजल की रेखा बनी लक्ष्मण की रेखा, राम में क्यों तुने रावण को देखा.." या ओळीवर आला त्यावेळी मला हसू फुटले. परवा मी त्याला रावण म्हंटले होते ना.. मी उशी त्याच्या पाठीवर आदळली. "एक काहीतरी ठरव ऋ.., " मी मुद्दामच आवाजात जरब आणून म्हणाले, " तुला प्यार पलभर के लिये पाहिजे की दो दिन के लिये. आणि काय रे.. अजून पलभर चा वादा मी केलाच नाही तरी लगेचच दो दिन के लिए म्हणून मोकळा होतोस..? डोन्ट टेक मी फॉर ग्रांटेड.."

" तू एक पल के लिये माझ्या मिठीत ये.." तो म्हणाला, " मग तू स्वतःच पल भर के प्यार पे निसार सारा जीवन,असं म्हणशील."

मला दुसऱ्या दिवसापर्यंत धुमसत राहायचं होतं पण माझ्या मनासारखं झालं नाही. स्टोकींग्ज घालायला सुरुवात करावीच लागली.

ऑफिसमध्ये त्याच त्याच कामाचा इतका कंटाळा यायचा की अगदी वीट यायचा कधी कधी. ते लवकर तयार व्हायचं, दोन्ही वेळा ट्रॅफिक मधून गाडी हाकायची, सदाशिव नगर मधून एअर बस ऑफिसला जायचं अगदी नकोसं व्हायचं. रोज येऊन जाऊन पन्नास किलोमीटर अंतर कापायला स्ट्रेस आल्यासारखं वाटायचं. "त्या" चार दिवसांत एंग्झायटी यायची आणि माझे निर्णय चुकायचे. एकदा माझ्या टीम मधल्या कावेरीने विंगचे डिझाईन चुकवले आणि मी तरातरा तिच्या केबिनमध्ये जाऊन मोठ्या आवाजात तिची कान उघाडणी केली. खरं म्हणजे तिला बोलावून सांगायला पाहिजे होतं पण माझं चुकलं. दुसऱ्या दिवशी सकाळी मीटिंग रूममध्ये मी सगळयांच्या समोर तिला सॉरी म्हणाले आणि नंतर माझ्या केबिनमध्ये बोलावून कॉफी मागवली. तिला सांगितलं की माझ्या ओटीपोटात चमका येत होत्या आणि मला भानच राहिलं नाही म्हणून मी ओरडले.

" नो इश्युज एवी, " कावेरी म्हणाली, "अगं मला पण पाळी चालू आहे. बर्ड ऑफ सेम फिदर फ्लोक टू गेदर..!"

आम्ही दोघी खळखळून हसलो.

नोकरी सोडावी आणि कन्सल्टन्सी चालू करावी असा विचार मनात यायला लागला. एके दिवशी मी ऋषि न् ला हा विचार बोलून दाखवला.

" वाव..! नाइस आयडिया..! " तो म्हणाला, " अगं पण हे तुझं कॅम्पस् सिलेक्शन ना...?"

"होय ना... अरे सम गर्ल्स वेअर सो जेलस् आफ्टर माय सिलेक्शन यू नो.. जेव्हा तीस लाखाचा आकडा त्यानी ऐकला.."

" पण एवढ्यात कंटाळलीस..? जेमतेम दोन वर्षात..!"

" खरंच बोअर होतंय रे.. आपण काहीतरी उद्योग करू. बिजनेस. इरा आणि इशाननी कसं त्यांचं सुरू केलं बघ.."

" अगं ते आर्किटेक्चर आहेत दोघं. सेम फिल्ड. म्हणून ते करू शकतात. तू एरोस्पेस, मी मेकॅनिकल. काय कॉमन आहे? फक्त एमबीए. शिवाय बिजनेस करायला एक विशिष्ट माईंड सेट लागतो तो आपल्याकडे कुठे आहे?"

" तू मला डीस्करेज करतोयस.."

" नो वें स्विटी.. अजिबात नाही." तो बोलला, " तू प्लॅन तयार कर काय करायचं ते. आपण सगळे प्रॉस् अँड कॉन्स विचारात घेऊ आणि सुरू करू. माझ्या पण डोक्यात आहे. पण एक सांगतो. आपण अगोदर थोडे पैसे साठवू. या महिन्यापासून तुझा सगळा पगार बँकेत टाकायचा. तू फक्त आता वर्षभर काम कर. नेक्स्ट इअर सोडून दे. घाई नको."

" पुढच्या वर्षी..? बाप रे... अजून एक वर्ष काढायचं..? धीस इज नॉट फेअर.."

" इट इज फेअर. पण आय प्रॉमिस यू, एकच वर्ष काढ. चाळीस लाख जमा होतील. मी पण घालतो पैसे. वुई विल डू इट. ओके..? मीनव्हाईल तू सुन त्सु नं लिहिलेलं आर्ट ऑफ वॉर वाचून काढ. मस्ट फॉर बडिंग आंत्रप्रिन्योर."

" तू मला हवं तसं करू देत नाहीस ऋ..."

तो मोठ्यांदा हसला. " ओके. उद्याच राजीनामा देऊन टाक. तीन महिन्याचा नोटीस पिरियड आहे ना..? देऊन टाक. पण तीन महिन्यानंतर जो पहिला दिवस असेल त्या दिवशी काय करायचं याचं प्लॅनिंग करायला आतापासून सुरुवात कर. यू आर माय स्वीट वाइफ!" असं म्हणत माझ्या गालावर ओठ टेकवले.

दुसऱ्या दिवशी मी केबिनमध्ये गेले आणि ब्लेझर खुर्चीवर ठेवला तेवढ्यात टेबलावरचा एचआर हेड सूरजचा इंटर कॉम वाजला.

"प्लीज सी मी विदीन टेन मिनिट्स. थॅन्क्स."

मी गेले. " गुड मॉर्निंग सर."

" गुड मॉर्निंग एवीता," तो म्हणाला," बस. हे बघ, तुला तुलूजला जायचयं रविवारी. आज गुरुवार. उद्या सकाळी तिकीट मिळेल तुला. एअर फ्रान्स आहे डायरेक्ट. पॅरिसला उतरलीस की सेलीनला फोन कर. तुला दोन आठवडे राहायचं आहे तिथे. गुड लक."

"थॅन्क्स सर," मी म्हणाले आणि माझ्या केबिनमध्ये आले. आज राजीनामा द्यायचा विचार करत होते आणि झालं वेगळंच. मी लगेच ऋषिन् ला फोन केला.

" वाव..! सो नाइस टू हिअर दॅट," त्याला आनंद झाला होता, " शामको पार्टी कहां पर?"

" :-):-) आल्यावर ठरवते. बाय."

आता तिथून आल्यावर प्रमोशन ठरलेलं. पगारवाढ होणार. म्हणजे परत जबाबदारी आलीच. स्ट्रेस, एंग्झायटी, पासून सुटका नाही. इज धिस दी लाइफ?

जेवण झाल्यावर मी आणि आई बाल्कनीत बसलो होतो तेंव्हा आईला मी हे सगळं सांगत होते. छान वारा सुटला होता आणि आकाशात बरेच पतंग उडत होते.

" तो पतंग बघतेस ना आकाशात उडताना? कसा वाऱ्याशी स्पर्धा करतोय ना?" आई म्हणाली, " फर्र..फर्र..फर्र..फर्र...आवाज कसा करतोय बघ..! पतंगाची दोरी सांगतेय की अरे फार वरती वरती जाऊ नकोस नाही तर फाटून जाशील.. हरवून जाशील... पण पतंगाला धाग्याचा हा सल्ला काही आवडत नाही. अजून वरती जाऊ दे मला.. अजून जरा ढील दे.. दे ना.. अजून जरा वरती.. अजून.. अजून.. असं म्हणत म्हणत तो पतंग चाललाय वरती... त्याला कळतच नाही की धाग्याला काहीतरी सीमा आहे... धागा कुठेतरी संपणार आहे.. जमिनी वरून किती वर गेलाय तो पतंग आणि किती छोटा दिसतोय तो... जणू काही जमिनीशी असलेले नाते तोडून टाकणार आहे अशा तऱ्हेने फुरफुरतोय....! अजून ढील दे... अजून... अजून असं पतंग म्हणाला तेंव्हा, " मला जितकं शक्य होतं तेवढी ढील मी तुला दिली, आता जर मी तुला मोकळं सोडायचा विचार केला तर माझंच मूळ उखडून जाईल आणि मला ते ठीक वाटत नाही.. आपण आपल्या चौकटीत राहू.. त्याच्या बाहेर नको... आपण आपल्या मर्यादेत राहू... लिमिटलेस नको..." धागा म्हणाला. पण पतंगाला ते काही पटलं नाही. त्याला अनिर्बंध

उडायचं होतं, स्वच्छंद विहार करायचा होता आकाशात. त्यानं विचार केला की सोडूनच देऊ या धाग्याला, यानंच तर मला जखडून ठेवलंय असं म्हणत पतंगाने एक हिसका देऊन स्वतःची सुटका करून घेऊया असा विचार केला, आणि हिसका देणार तेवढ्यात त्याच्यावर एक पाण्याचा थेंब पडला. पतंगाच अंग शहारलं. त्यानं मान वर करून बघितलं तर एक काळा ढग त्याच्या डोक्यावर तरंगत होता."

मी आई कडे बघितलं. तिनं पाण्याचा ग्लास उचलला आणि घोटभर पाणी प्याली.

"त्यानं मान वर करून बघितलं आणि त्याला जरा भीतीच वाटली." आईने परत सांगायला सुरुवात केली." तो काळा ढग त्याच्या डोक्यावर तरंगत होता, पण ढगाच्या डोळयात अश्रू दिसत होते आणि तो अगदीच उदास झालेला दिसत होता. त्याच्याच डोळयातल्या आसवांचां एक थेंब पतंगावर पडला होता. त्याला असा रडताना पाहून पतंगाला वाईट वाटलं. त्याला त्या ढगाबद्दल सहानुभूती वाटली. त्याने ढगाला विचारले," अरे ढगा, तू एवढा मोठा झालायस आणि रडतोस? आकाशात किती उंच पोचलायस तू.. आणि तुझ्यावर कोणाचं नियंत्रणही नाही, अंकुश नाही,

बांधिलकी नाही. स्वतंत्र आहेस की तू अगदी आणि तरीही तू का रडतो आहेस? मी तुला काही मदत करू का?

"आपल्या दुःखात कोणी वाटेकरी होऊन सहानुभूती दाखवल्यावर गळा कसा दाटून येतो ना..? तसंच झालं त्या ढगाला. तो हुंदके देत म्हणाला," जसं दिसतं तसं नसतं. मी तुला स्वच्छंद दिसतोय पण माझ्यावर हवा स्वार आहे. हवा जिथे ढकलेल तिथे मला जावं लागतं. हवा दिसत नाही म्हणून लोकांना वाटतं की मी कसाही फिरतोय. स्वच्छंद. म्हणूनच म्हणतात आवारा बादल.

" खरं म्हणजे माझीच चूक. मोठी चूक. मी त्या मोठ्या सरोवराचा भाग होतो. हे ढग आकाशात फिरताना मला पण तसच फिरावं असं वाटायला लागलं, आणि स्वतःची तुलना विहिरीतल्या बेडकाशी करून बाहेर पडण्यासाठी मी धडपडू लागलो. ती संधी आलीच. गरमी आणि हवा एकत्र आल्यावर मी ऊर्जेने भारलेल्या त्या पाण्याच्या थेंबा वर स्वार झालो आणि निघालो वर वर. माझ्या मित्रांनी जाऊ नकोस, पडशील, भटकशील असं सांगितलं पण माझी महत्त्वाकांक्षा मला जास्त महत्वाची वाटली. पण तसं काही झालं नाही. माझी उन्नती झालीच नाही. तेंव्हा पासून असाच निरुद्देश्य, अनाथ, हवेचा गुलाम बनून फिरतोय. माझं अस्तित्व असूनही नसल्यासारखं आहे. कधी कुठल्या महामेघात विलीन

होऊन माझं अस्तित्व हरवून बसेन, माहित नाही. कधी तरी तो प्रचंड काळाकभिन्न ढग बाजूने तरंगतो तेंव्हा कानठळ्या बसतील असा माझ्यावर कडाडतो, मला हटवतो आणि माझ्या आजूबाजूला दिसलास तर तुझी खैर नाही अशी धमकी देतो.

" आज मी ठरवलंय, मी ही खोटी बेगडी शान सोडून पृथ्वीवर कोसळणार. मला ठाऊक नाही की मी माझ्या सरोवरात मिसळून जाईन की नाही पण कुठलं तरी जलाशय भरलं, शेताला पाणी मिळालं तरीही मला धन्य वाटेल.

" तू भाग्यवान आहेस की तुला धागा सारखा साथी आहे, एवढ्या उंचावर तू आलायास तरी पण तो तुझ्याशी जोडला गेलाय, तुला एवढ्या लांबून सांभाळतो आहे. स्वतःचं मूळ विसरू देत नाही आहे. मी मूळ विसरलो आणि... पुढच्याच क्षणी ढग वितळला आणि पाणी पाणी होऊन कोसळला. त्याचा मृत्यू झाला. पतंगाला वाईट वाटलं पण त्याच वेळी स्वतःला जोडलेल्या धागेचा अभिमान ही वाटला.

धाग्याला मात्र त्या दोघांच्या संभाषणाची गंधवार्ता ही नव्हती, तो तर पतंगाला सावरण्यात व्यस्त होता."

आईने गोष्ट संपवली. तिने पाण्याचा ग्लास भरला आणि मला दिला.

" मला ठाऊक आहे एवी, तुझ्या धमन्यात फ्रेंच रक्त वाहतय." ती पुढे बोलू लागली, " फ्रेंचांना स्वातंत्र्याची भारी हौस. अगदी ईश्वरनिंदा करण्याचं स्वातंत्र्य पण त्यांना अभिप्रेत आहे. नास्तिक लोकांची संख्या पण तिथे प्रचंड. लीबर्ते, एगालिते, फ्रातर्नीते ही मूल्ये त्यांनीच तर जगाला सांगितली. त्यातूनच उद्यमशीलता आणि रेनेसांस याला सुरुवात झाली. सिनेमॅटिक लिबर्टी आज आपण म्हणतो तो सिनेमाच ल्युमिये बंधूंनी शोधला. मायग्रेशनच्या बाबतीत किती उदारमतवादी आहेत ते स्वातंत्र्य द्यायला.

आणि तू स्वतः ह्यूगो, व्हॉल्टेअर, गी द मोपांसा, जों पॉल सार्त्र, सिमोन द बोवा ह्यांची पुस्तकं वाचली आहेस की. व्हॉल्टेअर म्हणाला होता, ' मी तुझ्या मताशी सहमत नाही, पण तुला तुझे मत मांडू देण्याचा अधिकाराचे रक्षण करायला मी नेहमी पुढे असेन.'

" तू जे म्हणत आहेस की मला हवं तसं करू देत नाही त्याची जी कारणं आहेत ना ती फार क्षुल्लक आहेत एवी. हे वाक्य फार घातक आहे. आज क्षुल्लक कारणासाठी वापरतेस, पुढे मोठया कारणासाठी वापरशील. ऋषिन् खरोखर आदर्श मुलगा आहे. अगं मला पण दर सोमवारी आणि गुरुवारी फोन करतोच. माझ्या तब्येतीची चौकशी करतो. काय हवं नको विचारतो. तुला आठवतं पहिल्यांदा इथे आला होता तेंव्हा स्वतःची चहाची कप बशी पण

त्यानं विसळून ठेवली. माई आणि अप्पांनी खूप चांगले संस्कार केले आहेत त्याच्यावरती. अगं ऋषिन् चं जाऊ दे, मला इरा आणि इशान पण महिन्यातून दोनदा फोन करतात. माई आणि अप्पा करतातच. खरंच तू इतका छान मुलगा शोधलास ना, की कधी कधी मला वाटतं, Nothing comes from nothing, Nothing ever could, So somewhere in my youth or childhood, I must have done something good. Good Karma. मला मुलगा नाही पण ऋषिन् च्या रूपाने मुलगाच मिळालाय मला. ही इज अ जेम ऑफ अ बॉय.

तुझ्या फ्रेंच रक्तात अर्ध रक्त भारतीय आहे. दया, क्षमा, शांती, सबुरी, श्रद्धा, अनुकंपा, जाणीव, जागृती हे गुण त्यात असणारच. शंकाच नाही. स्वातंत्र्य आणि मर्यादा याची उत्तम जाणीव आहे तुला. " आईनं माझ्या डोक्यावरून हात फिरवला. " छान आहे माझी छकुली.. चल, कॉफी करते, बस तू, कॉफीच्या बिया आजच दळून आणल्या बघ," असं म्हणत ती उठली.

" आई, तू बस. मी करून आणते कॉफी." मी उठले.

कॉफीचे मग घेऊन आम्ही परत बाल्कनीत बसलो. एक पतंग भिरभिरत बाल्कनीत येऊन पडला. फाटलेला, छिन्नविच्छिन्न,

तुटलेली दोरी. आईने तो अगदी काळजीपूर्वक उचलला आणि त्याला आतमध्ये घेऊन गेली.

तेवढ्यात ऋषीन् चा फोन वाजला. " काय करतेस? "

" पतंग उडवतीय.."

" वाव... चली चली रे पतंग मेरी चली रे, चली बादलों के पार असं म्हणत उडव. लवकर वरती जाईल." तो म्हणाला.

" नाही. मी वेगळं गाणं म्हणतीय."

" कुठलं गाणं..?"

" पिया मै हूं पतंग तू डोर, मै उडती चारो ओर..."

*टीप:*

*आ त्यू मांजे आं वोयाज? त्यू देवे अव्वार फाम..as-tu mangé en voyageant? vous devez avoir faim. Did you eat while travelling? You must be hungry.*

*तुलुज= Toulouse. Airbus HQ in France.*

# रेन इन स्पेन

"मी आणि माझी छोटी बहीण अमृतवल्ली यांचं शिक्षण फार कष्टात झालं. आमच्या मोठ्या काकांनी आमची सगळी इस्टेट बळकावली आणि आम्हाला घराबाहेर काढलं. बाबा एका छोट्याश्या कंपनीत स्टोअर कीपर म्हणून काम करायचे. आम्ही लहानपणी बरेच हाल सोसले. आई इतरांच्याकडे स्वैपाक करायला जायची. अशा परिस्थितीत माझं शिक्षण झालं. इंग्रजी विषय घेऊन एम. ए. केलं आणि आणि नंतर शिमोगा इथल्या एका कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून मी नोकरीला सुरुवात केली. अमृतवल्लिने ही तेच केलं आणि त्यानंतर आमच्या घरात थोडीशी आर्थिक सुबत्ता आली."

माईंची एकसष्टी साजरी केली त्यावेळी त्या हे सांगत होत्या. इंग्रजी भाषेत. कानडी बोलत नव्हत्या. माईंनी लेक्चरर म्हणून पाच वर्ष काम केल्यावर त्यांचं लग्न झालं आणि त्यानंतर त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्यांच्या थिसिसचा विषय, "A Comparative Study of Conscious Feminism in the Selected Literature of William Shakespeare and George Bernard Shaw with Special Reference to Hamlet and Pygmalion." नंतर त्या

विद्यापीठात इंग्रजीच्या HOD झाल्या आणि यथावकाश निवृत्त झाल्या.

त्या पुढे सांगू लागल्या, "मोठे काका उडाणटप्पू होते. गावातल्या गुंड लोकांसोबत भटकणे, वडिलांचा पैसा उडवणे हीच कामे ते करत असत. आजोबा फॉरेस्ट ऑफिसर होते दांडेलीला. त्यांचा वचक होता पण मोठ्या मुलाचे फार लाड केले गेले आणि तो बिघडला. शेवटी त्यांनी कंटाळून त्याला आणि त्यांच्याबरोबर माझ्या बाबांना पण सैन्यात दाखल केले. बेळगाव येथे मराठा लाईट इन्फंट्री या रेजिमेंटमध्ये त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. बाबांनी दुसऱ्या महायुध्दात भाग घेतला तर मोठे काका सैन्याचे प्रशिक्षण अर्धवट सोडून परत घरी आले. वर्षभरात आजोबा गेले आणि त्यानंतर मोठया काकांना रान मोकळे झाले."

माई पुढे बोलू लागल्या, " घरात त्यांचाच वचक. घरात तो एकच पुरुष आणि आम्ही चार बायका. आजीला तर तो जुमानत नव्हता. माझ्या आईला तर खूप त्रास द्यायचा. तुझा नवरा काय युद्धातून परत येणार नाही. तुम्ही आता या घरातून निघा. इथे तुमचा आता काही संबंध नाही असे म्हणत तो रोज काहितरी भांडण उकरून काढायचा. आईला त्रास देण्यासाठी काडेपेटीत विंचू घालून ठेवायचा. कंदील लपवून ठेवायचा. सामान आणायला पैसे

द्यायचाच नाही. कपडे फाडून टाकायचा. युद्ध संपलं आणि बाबा आले. इथली परिस्थिती बघितली आणि सगळं

मोठ्या काकांना देऊन टाकून आम्ही बाहेर पडलो."

माई थांबल्या. " नको त्या आठवणी. संपलय ते सगळं आता. पण एक सांगते, आयुष्यात खूप

बिकट प्रसंग येतात, आणि अशा प्रसंगांची मालिकाच सुरू होते. देव वगैरे खोटं आहे हे नक्की, असं वाटू लागतं. शारीरिक आणि भावनिक त्रास नकोसा होतो. विश्वासघात, दुःख, अपेक्षाभंग, छळवणूक, विरह, अपमान अशा गोष्टींमुळे आपण नकारात्मक होऊन जातो. बाण लावून प्रत्यंचा खेचावी आणि धनुष्याची दोरी तुटून जावी, गाणं म्हणायला मंचावर उभं राहावं आणि घसा बसावा, स्टेशनवर गाडी पकडायला जावं आणि आपल्या समोरून ती निघून जावी. किती चिडीला येईल माणूस... अख्खी दुनियाच आपल्या विरुद्ध उभी ठाकली आहे असे वाटणारे दिवस. काहीजण जीवनच संपवतात. आणि ह्याच वेळी, आई म्हणायची, अगं हीच तर परीक्षा आपल्याला द्यायची आहे, तावून सुलाखून बाहेर पडायचं आहे. दोन हात वादळा सोबत. ध्येय असच गाठायचं असतं. त्यातच गंमत आहे. आणि ध्येय गाठताना एक लक्षात ठेवायचं की ज्या लोकांनी आपल्याला त्रास दिला त्यांचा सूड

उगवण्याची पात्रता त्यांच्या अंगी असणार नाही ते बघायचं. वहावत जायचं नाही. सूड उगवून स्वतःचं अस्तित्व मातीमोल करण्यापेक्षा जिथे आपल्या अस्तित्वाची जाण नाही तिथे उभं राहायचं नाही. आपलंच अस्तित्व एवढं उत्तुंग करायचं की तुम्ही जिथे जाल तिथे तुमचा सहवास इतरांना हवा हवासा वाटेल. काही लोकांचा जन्मच इतरांना तुच्छ लेखण्यासाठी, वाईट बोलण्यासाठी झालेला असतो. आपला जन्म त्यासाठी नाही. आपली जीव्हा, आपली जीभ, आपली वैखरी त्यासाठी नाही. आपला जन्म चांगले कार्य करण्यासाठी आहे. जो मनुष्य वेदना सहन करताना शांत राहतो त्याचा उत्कर्ष होतोच."

माई थांबल्या, " खूप बडबडले का मी?" त्या पुढे म्हणाल्या, " एकसष्टी. बापरे... माझ्या वाढत्या वयाची जाणीव करून दिली की तुम्ही मला..! मला आता बडबड बंद करायला शिकलं पाहिजे. हो ना?"

" नाही हो माई, " मी म्हणाले, " किती छान सांगता तुम्ही. इंग्रजी शब्द असे वापरता की शशी थरुर पण तुमच्याकडे शिकायला येईल."

" प्रोफेसर हेन्री हिगीन्स.." ऋषीन् म्हणाला, " नाही रे," अप्पा म्हणाले, " माझी एलिझा डूलिट्ल. माय फेअर लेडी." माई

हसल्या. " I sold flowers, I didn't sell myself. Now you've made a lady of me, I'm not fit to sell anything else." माईंनी माय फेअर लेडी मधला डायलॉग म्हंटला. आम्ही सगळे जोरात हसलो. माईंनी माय फेअर लेडी इतक्या वेळा पाहिलाय की त्यांचे चित्रपटातले सगळे संवाद पाठ झालेत. ऑड्रे हेपबर्न म्हणजे त्यांचा जीव की प्राण.

" और वो क्या माई," इराने विचारले, " वो रेन इन स्पेन..."

" In Hertford,Hereford and Hampshire, hurricanes hardly happen'... 'The rain in Spain stays mainly in the plain." माई नी उत्तर दिले.

" माई," ईशान म्हणाला, " आता ते गाणं होऊन जाऊ दे.."

" हो माई, " सगळ्यांनी एकच गिल्ला केला.

माईंनी घसा साफ केला आणि म्हणायला सुरुवात केली. " The rain in Spain stays mainly in the plain...... "

# कच्चे केले के कोफ्ते.

"अरे हे काय इरा, तू दुधाचं पातेलं फ्रीजमध्ये ठेवलं नाहीस की.." आम्ही स्वैपाकघरात शिरताच माई म्हणाल्या. "

" ओ माई, भूल गयी मै... सॉरी सॉरी..." असं म्हणत इरा पातेले उचलू लागली तसं, " इसमें सॉरी क्यों? भूल हो जाती है इन्सान से कभी कभी,.." असं बोलत माईंनी पातेल्यावर झाकण ठेऊन ते फ्रीजमध्ये ठेवलं. " अच्छा, " त्या पुढं बोलल्या, " तू काहीतरी खास करणार आहेस असं म्हणालीस सकाळी."

"येस माई,कच्चे केले के कोफ्ते."

" व्वा छान, आता काय आणि कसं ते सांग."माईंनी पदर खोचला.

" माई, आप वो सब हम दोनो पर छोड़ दीजिए, आप बाहर जाकर अप्पा के साथ बैठ जाइए आराम से।"

" हो माई, तुम्ही बसा बाहेर हॉलमध्ये गप्पा मारत, आज तुम्ही किचनच्या रणांगणावर येऊ नका. आम्ही ही खिंड लढवतो."

"हो हो लढवा," माई हसत हसत हॉल कडे वळत म्हणाल्या," चांगल्या रंगरूट आहात तुम्ही दोघी...! लढा."

माई बाहेर गेल्या तसं, "चल एवी,पोजीशन ले ले और हमले के लिए तैयार हो जा..." इरा हसत म्हणाली." येस मेजर साहिबा,"मी कपाळाला उजवीकडे उलटा हात लावत तिला सलाम करत बोलले,"आपके हुक्म की तामील होगी, अभी और इसी वक्त." आम्हा दोघींना खिदळायला कसलंही कारण चालतं.

" फिलहाल तू वो कच्चे केले है ना, सवेरे ईशान लेकर आया था, उसको धो ले और तीन तीन टुकडो मे काट ले, और हां उनका छिलका मत उतार।"

" सवेरे लाए हुए केले, इरा, अभी तो शाम में पक गए होंगे ना.... मी केळीचा घड हातात घेत गंभीर स्वरात बोलले," सुबह का भूला हुआ शामको वापस आ जाएं तो उसको भूला नहीं कहते या केला नही कहते, कुछ तो नही कहते, है ना...?

" ठीक है, अभी तुझे ही भेजती हूं बाहर केले लानेके लिए वो अगर पक गए है तो।" ती धमकावणीच्या सुरात म्हणाली.

"नही नही मेजर साहिबा, आपको देखकर वापस कच्चे बन गए है। डोंट वरी।" इरा हसली.

मी केळी कापायला सुरुवात केली तो पर्यंत इराने कुकर साफ करून घेतला.

" अब इनको कुकर मे उबाल लेती हूं। ये कच्चे केले गलने मे वक्त लेते हैं सो थोड़ा ज्यादा प्रेशर कुक करना पड़ेगा।" तिने केळ्याचे तुकडे कुकरमधे टाकून कुकर गॅस वर चढवला.

"अब मुझे क्या करना है मैडम?" मी विचारलं.

"तू प्लीज प्याज पीस ले, मै टमाटर और मिर्च काटती हूं।" तिने मिरच्या चिरायला सुरुवात केली.

मी कांदे कापू लागले. " माई की स्टोरी सुनकर तुझे क्या लगता है इरा?" मी तिला विचारलं.

"माई ने बहुत सहा है। मैं कहती हूं के आदमी के पास हुनर होना चाहिए तो ही वो ऊंचाइको छू सकता है, जैसे कि माई। एड़ी ऊपर लेनेसे सिर्फ कद बढ़ता है, ऊंचाई नही।" ती मिरचीचे कापलेले छोटे तुकडे बाजूला सारत बोलली.

" मैंने तो ऊंची एड़ी वाले शूज पहननाही बंद कर दिया है।" मी कांदा बारीक करताना डोळ्यात आलेले पाणी पुसत म्हणाले.

" जोक मत सुना, अब देख ना, इंसान का पतन उस समय शुरू होता है जब वह अपनों को गिराने की सलाह गैरोंसे लेता है, जैसे माई के काकाजी। भाई का इस्टेट वापस देना पड़ा ना...देख रिश्ते

को है ना, दोनों तरफसे निभाना पड़ता है, एक तरफसे सेंक कर रोटी भी नही बनती।" ती टोमॅटो पुसत बोलली.

"सही कहती है आप."

" साजिश तो वो रचते हैं जिन्हे जंग जितनी हो, जैसे के काकाजी, माई की मां तो बेचारी दिल जितनेकी कोशिश में लगी हुई थी, ताकि रिश्ता बना रहे। जिंदगी का क्या है एवी, वह थम तो नही जाती किसी के बिना, पर गुजरती भी नही अपनोंके बिना, है ना?" टोमॅटो चिरत तिने विचारले.

"पते की बात कर रही है आप इरा।" मी उत्तरले.

तेवढयात कुकरची शिट्टी वाजली. मी गॅस बंद करू लागले." वेट, चार पांच सीटियां बजने दे, फिर बंद करेंगे। उबाल लेने के बाद छिलका अपने आप उतर जाता हैं और यही पहचान होती हैं कि केला उबल गया।" ती गॅस जवळ जात म्हणाली.

" बुरा चाहनेवाला अपना है तो भी वो पराया है और भलाई चाहनेवाला, पराया भी हो तो भी वो अपना हैं, रोग अपने ही शरीर में पैदा होता है पर बाहरवाली औषधियां अपनेको ठीक बनाती हैं। तुझे पता है," पाच शिट्ट्या झाल्यावर ती गॅसचे बटन बंद करत म्हणाली, "एक अच्छी किताब कितनी भी पुरानी हो, उसके शब्द नही बदलते। अच्छे रिश्तोंकी यही तो खासियत है भई, घमंड

किसिका भी नही रहता एवी, टूटनेसे पहले गुल्लक को भी यही लगता है की सारे पैसे उसीके है।" ती कुकरचे झाकण उघडत बोलली.

" सच है इरा, बरसात आती है तो कानों में हल्के से कह जाती है, गर्मी चली गई, राईट?"

" करेक्ट, हंड्रेड परसेंट करेक्ट," ती हसली.

" अच्छा, लो ये देख, कैसे आराम से छिलके निकल गए, " कुकर मधून बाहेर काढलेल्या केळ्यांकडे पाहात ती म्हणाली, " अब ये छिलका अलग कर के केलो को मैश कर ले और इसमे बेसन मिला ले, और नमक और पीसी लालमिर्च डालकर इनके गोल कोफ्ते बना। बादमे इन को डीप फ्राई करेंगे। संभाल कर,वो टुकड़े गरम है।

" ठीक है, धीरे से निकालती हूं। आपको नही लगता की काकिकी हालत ठीक नहीं हुई? जिंदगीसे बेचारी हार गई ना?"मी केळ्यांची सालं काढत म्हणाले

"नही एवी, हारी होती तो खुदकुशी कर लेती। जिंदगीसे दो हाथ किए उसने। इस तरह हारने वालों का भी अपना एक रूतबा होता है एवी, मलाल वो करें जो दौड़ में शामिल ही ना हुए।" असं म्हणत तिनं लसणाच्या पाकळ्या सोलायला घेतल्या.

" लेकिन ग्रैनी ने ठीक किया क्या काकाकी शादी उनसे बनाकर? गलत नही किया क्या?" मी बेसनमध्ये केळ्यांचे तुकडे कालवत बोलले.

" देख एवी, ग्रैनी का कोई दोष नही। अपना बच्चा तो अपनी कोखसे पैदा होता है, उसकी भलाई के लिए एक मां आसमान के तारे भी तोड़कर लाएगी। उसे लगा होगा ना की रामन्ना सुधर जायेगा। एक औरत के बिना घर सुना सुना हो जाता है और दूसरा, ग्रेनी अगर भगवान को प्यारी हो जाती है तो रामन्ना को देखनेवाला कौन था? यही सोचकर उस बेचारी ने उनकी शादी बना दी। अब देख, भविष्य कौन जानता है? उनको क्या पता की इसका अंजाम इस तरहसे होगा?"

" हां इरा, ये बात भी सही है। पर तुझे नही लगता ग्रेनी थोड़ी नास्तिक थी, जैसे उन्होंने भगवान के बारेमे कुछ अलग कहा था?"

इरा हसली." तूने भगवान को देखा है एवी?"

" नही तो, आपने देखा है?"

इरा परत हसली." इन सबका खाना हो जाने दे, मैं तुझे कहती हूं आस्तिक, नास्तिक और राम के भक्त और रहिमके बंदोंके बारेमे।

" पक्का सुनुंगी मैं आपसे, मज़ा आयेगा।" मी म्हणाले.

" देख , नास्तिक बनना या ऐसी सोच रखना मुश्किल काम है. आस्तिक तो आदमी जन्मसे ही होता है. उसके पेरेंट्स उसको जन्मसे ही इंडॉक्ट्रिनेट करते है. उसमे तीर मारने जैसी कोई बात नहीं. नास्तिक सोच रखनेके लिए जिगर चाहिए या सायंटिफिक सोच, तार्किक दृष्टिकोण. या इंटेलेक्चुअल व्यू पॉइंट. ये पॉइंट था ग्रैंडमा के पास और वो भी उस जमानेमे...

" और बहुत पढ़ी लिखी ना होनेके बावजूद, है ना?"

" करेक्ट, यार तू वो रिचर्ड डॉकिन्स की द गॉड डेल्युजन क्यों नहीं पढ़ती?",इराने सुचविले.

" मैं तो समझती थी आप सिर्फ फिक्शन पढ़ती है।".

"कोई भी पढ़ा लिखा लॉजिकल सोच रखनेवाला आदमी रिचर्ड डॉकिन्स को पहचानता ही होगा। उसकी और एक बढ़िया किताब है,

आउटग्रोइंग गॉड. एकदम मस्त. द सेल्फिश जीन,ये भी पढ़ ले उसकी ही है।"

"आप कहती है तो मुझे पढनाही पड़ेगा इरा।"

" तुझे पता है, मुझे आर्किटेक्चर क्या होता है मालूम ही नहीं था। बारवीमे थी और सोच रही थी क्या करना है तभी अयान रैंड कि किताब 'द फाउंटेनहेड' हाथ लगी और वही मेरा टर्निंग पॉइंट बन

गया। उसमे जो ओब्जेक्टिविज़्म है वह एक नास्तिक फलसफा ही है।"

"ओ माय गॉड, इरा, मैंने वो खरगपुर में पढ़ी थी।मैं विनोद गुप्ता में एमबीए कर रही थी तब हमारी एक कॉमन फ्रेंड जो मास्टर्स इन सिटी प्लानिंग कर रही थी उसने दिया था मुझे वो पढनेके लिए I वॉव, वो होवार्ड रोअर्क का कोर्टरूम स्पीच पढ़कर मैं भी डोमिनिक कि तरह उससे प्यार करने लगी थी। हाहाहा....।"

"अरे मैं तो वो जो बोलता है न, जैसे I don’t build in order to have clients, I have clients in order to build, या फिर I came here to say that I do not recognize anyone's right to one minute of my life. Nor to any part of my energy. Nor to any achievement of mine. No matter who makes the claim, how large their number or how great their need. I wished to come here and say that I am a man who does not exist for others. और दूसरा, To sell your soul is the easiest thing in the world. That's what everybody does every hour of his life. If I asked you to keep your soul - would you understand why that's much harder?" मुझे तो ये सब पढ़ते वक़्त गुजबंप्स आते

थे। मैने ये सब बाय हार्ट किया था। तभी मैंने ठान लिया, बनना है तो सिर्फ आर्किटेक्ट!

" व्वा इरा व्वा, और वो डोमिनिक कहती है न.... My real soul...? It's real only when it's independent... या फिर

I can do nothing halfway. Those who can, have a fissure somewhere inside. Most people have many. They lie to themselves—not to know that. I've never lied to myself. मुझे भी याद है।" मी सांगितलं.

" वॉव एवी, तू भी उस्ताद निकली।"

"नही, मैं आपकी शागिर्द हूं और शागिर्द ही रहूंगी, हमेशा।" मी हसत म्हणाले.

" ये लो, तूने टिकियां भी बना डाली गपशप में। चल मैं अभी इनको फ्राई करती हूं। तू ग्रेवी बनाएगी क्या?"

"अरे आप हुक्म करे और हम ना माने?"

" देख मैं फ्राई करती हूं क्यों के ये ज्यादा लाल नहीं होगे, इसलिये ध्यान देना होगा कि गोल्डन होना ही इनका फ्राई हो जाना हैं। ठीक है?"

"येस, अब आप बताइए ग्रेवी के लिए क्या करू?"

" ग्रेवी के लिये कढ़ाईमे २-३ चम्मच वो धारा तेल डाल दे। उसमे पीसा हुआ प्याज, मिर्च और लहसून डाल कर भून लें।"

" ओके," मी तिने सांगितले तसे करायला घेतले.

" यह काकिका किरदारही सबसे अहम है एवी, माईके मां के लिए उनके हसबैंड थे, टूटाफुटा क्यों न हो लेकिन सरपर छत तो था, दो बच्चियां थी जिनको बड़ा करनेमे उनका वक्त गुजरता था। काकिके हसबैंड नही थे, और उस जमानेमे बिना शौहर के रहना कोई सोच भी सकता? चलो समझ लिया के पेट की आग तो बुझ सकती थी पर जवान अरमानों का क्या? उसकी आग का क्या? दिन ढलने के बाद रात तो एक ब्लैक होल की तरह उनको इस तरह दबोच लेती होगी के बाहर आने के लिए केवल आसुओंका सहारा। उन्होंने तो अपनी भावनाओंको, अपनी इच्छाओंको जला डाला, और बाद में बच्चोंकी भी आहुति डाल दी। आज किसीके साथ ऐसा होता तो डिप्रेशन की शिकार हो जाती झट से।" इरा बोलत होती.

"हां इरा, ये भी सोचनेवाली बात है।"

" वॉव, अच्छी खुशबू आ रही है, अब कटा हुआ टमाटर और मसाले डाल, थोड़ा पानी डाल और फिर भूनती रह ।" ती म्हणाली,

" उजाले में हर असलियत कहां नजर आती है एवी, अंधेरा ही बताता है की सितारा कौन है। चली गई बेचारी सितारोंसे आगे।"

"बेचारी गिरिजाकाकू," मी उद्गारले.

"और उस के पास था भी क्या जो कोई उसके साथ रिश्ता बनाता, अपने मतलब के अलावा कोई किसको पूछता नही, पेड़ सूख जाता है तो पंछी भी बसेरा नही करते," ती कढईत बघत म्हणाली, " " खूब, ये ठीक हुआ, इस मिक्स मे अब मलाई डाल कर थोड़ा पानी और डालेंगे।"

तिने फ्रीजमध्ये ठेवलेले लोणी एक मोठा चमचाभर घेऊन कढईत घातले आणि थोडेसे पाणी ओतले. " इस पूरे मिक्स को तबतक भुन जबतक ये घी ना छोड़े...और फिर इसमे कोफ्ते और देसी घी एकसाथ डालते है।"

" अच्छा, खुशबू तो बढ़िया आ रही है इरा, ये देखो मलाईका घी बन रहा है।"

"नाईस वर्क, चल मैं इसमें कोफ्तेको डुबोती हूं अभी", असं म्हणत तिने कढईत ते कोफ्ते सोडले.

" कुछ देर धीमी आंच पर उबलने दे इसको कोफ्ते मे ग्रेवी रहने के लिए। हरा धनिया या पोदीना हैं क्या बुरकनेके लिये?" तिने प्रश्न केला.

"हां है ना... फ्रिज में वो पीले प्लास्टिक के डिब्बेमे कैद है, वहांसे लीजिए।"

"हां ठीक है," ती म्हणाली, " मैं चावल बना देती हूं अभी कुकर में, तू डायनिंग टेबल साफ कर लेगी क्या?"

"येस, करती हूं"।

" एवि, उसको रहने दे, मैं साफ कर लेती हूं। तू प्लीज थोडे से कोफ्ते बाजू में मुद्गल आंटी को देके आ ना, " ती बोलली, " सवेरे उन्होंने मैसूर पाक लाके दिया था, उनका डिब्बा खाली कैसे लौटाएं? और आते वक्त इप्सित को लेके आ कान पकड़कर, कबसे जाके बैठा है उनके घर में, न खानेकी सुध है ना पिनेकी।" तिने एका स्टीलच्या डब्यात कोफ्ते भरले आणि माझ्याकडे तो डबा दिला.

मी परत आले तेंव्हा इरा ने विचारले," किधर है वो बदमाश? कान पकड़े की नही उसके?"

"अरे वो उधर था ही नही। वो आराम से बैठा है अपने दादा के गोद में, मैने यहांसे जाते हुए देखा उसे।"

"उफ़, दादा दादी के सामने ममी को पूछेगा ही क्यों? लाडला जो ठहरा उनका। अच्छा, वो चांदी की थालियां कहां रखी है पता है तुझे?"

"हां पता है ना, पर अभी क्यों?"

"अरे माई और अप्पा के लिए चांदी की थाली लगायेंगे ना एवी, अच्छीसी रंगोली बनाएंगे थालीके आजूबाजू। गुलाब की पंखुड़ियां भी बिखेर देंगे, थोडासा इत्र भी उंडेल देंगे हैं ना? मजा आएगा, क्यों? क्या खयाल है?"

" मस्त खयाल है, अभी लाती हूं थालियां और साथ में कटोरी और गिलास भी लाती हूं, पानी पीने दे उनको चांदी के गिलास में।"

"वॉव ये हुई ना बात!"

मी ताट, वाट्या, पेले, घेऊन आले. इराने सांगितलं तसं सगळं सजवताना ती म्हणाली, " देख एवी, हम दोनो बाद में खायेंगे। इनको पहले परोसेंगे प्यारसे। माई अगर कहती है साथ में बैठनेके लिए तो मना कर दे।"

"बिलकुल, ऐसा ही करेंगे। इप्सित भी भूखा होगा। चल, इन सबको बुलाऊं क्या?"

"हां लेकीन थोडा पावडर लगायेंगे ना मुंह पोछकर, पांच मिनिट में थोड़ा साड़ी वाड़ी ठीक करेंगे, तू भी जरा बाल ठीक करले, फिर बुला उन्हें। फ्रेश दिखेंगे जरा, है ना?"

"करेक्ट इरा, चेहरा फ्रेश हो तो माहौल और खूबसूरत बन जाता है।"

पाच सात मिनिटात आम्ही आमचा जामानिमा आट पला आणि मग बाहेर जाऊन सगळ्यांना बोलावले. हात धुऊन सर्व जण टेबलाजवळ आल्यावर माईंच्या हाताला धरून इराने त्यांना, माई आप यहां बैठिये असं म्हणत चांदीच्या ताटासमोर बसवले. मी अप्पांचा हात धरून त्यांना त्यांच्या ताटासमोर बसवले.

" माय गॉड, हा एवढा थाटमाट, चांदीची ताटे, रांगोळी, फुलं, अत्तर, एवढं सगळं? कोण विआयपी आहेत इथे?" माई म्हणाल्या.

"अवर फेअर लेडी, द फियरलेस राधाबाई" ऋषिन बोलला.

"येस, आज की शाम, राधाबाई के नाम," इशान ने पुस्ती जोडली.

"दादी की शादी," इप्सित असं बोलला आणि हास्याचा स्फोट झाला.

इरा म्हणाली होती तसं माईंनी आम्हालाही जेवायला बसायचा आग्रह केलाच पण आम्ही नंतर बसतो म्हणून सांगितलं. माईंना आम्ही आग्रहाने वाढत होतो तेंव्हा त्या जरा भावूक झाल्याचं दिसलं.

कच्चे केलेके कोफ्ते सगळ्यांना इतके आवडले की "व्वा इरा, क्या बात है, बहुत बढिया और टेस्टी बनाया है तुमने," असं तिचं

कौतुक झाल्यावर ती म्हणाली," सब काम एविने किया है, मैने सिर्फ डिरेक्शन दिया, सराहना करनी है तो एवी कि की जाय।"

"देखो इरा, आप कुछ भी कहो, सब जानते है कि असलियत क्या है," मी म्हणाले.

" हो, कुणी का बनवेना, आमच्या मुलींनी काम मात्र अगदी सुंदर केलंय," माई म्हणाल्या, " आता तुम्ही दोघी बसा, मी वाढते तुम्हाला."

"नाही माई, आज तुम्ही काहीही काम करायचं नाही", मी सांगितलं, " आम्ही वाढून घेऊ आणि आवरून पण ठेऊ. तुम्ही आराम करा, बाहेर गप्पा रंगवा."

" ओके, तुम्ही म्हणाल तसं". माई हसत बाहेर गेल्या.

आम्ही दोघींनी ताट वाट्या घेतल्या आणि मग वाढून घेतलं.

" चल अब शांती से खा लेंगे।" आम्ही जेवायला सुरुवात केली.

"हां इरा, अब आप सुना दो जो कहानी आप कहने जा रही है।"

# इरा

" हां तो सुन," तिने सांगायला सुरुवात केली,"तूने झेन एंड आर्ट ऑफ़ मोटरसाइकिल मेंटेनंस किताब पढ़ी हो तो जो ऑथर है ना, रॉबर्ट पिरसिग, ये बनारस हिन्दू यूनिवर्सिटी के स्टूडेंट भी थे, ये कहते है, When one person suffers from a delusion, it is called insanity. When many people suffer from a delusion it is called Religion. मैं महज तीन साल की थी जब हम वैली से घरबार छोड़कर जम्मू आए। उन दिनों वादियों में " बटा चालीव, मगर बटीने वराय" यह नारा गूंजता था। इसका मतलब है, सब पुरुष चले जाएं, पर औरते और लड़कियां पिछे छोड़ दे। कश्मीर में अगर रहना होगा तो अल्ला हु अकबर कहना होगा ये नारा रोज लगता था। देख, ये सब अल्लाह को माननेवाले आस्तिक लोग, थिइस्ट। और कहते थे, दिल में रख अल्लाह का खौफ, हाथ में रख कलाश्निकोव। ये एक गन है शायद एके फोर्टीसेवन बोलते है उसको। ये सब रहीम के बन्दे।बांदीपोरा से रातको हम निकले और जबाहर टनल की तरफ बस चलते रहे. ऐसे ही, घटियोंको पार करते हुए, जम्मू की तरफI मैं कभी मां की गोद में, कभी बड़े भाई विवेक के कांधोंपर तो कभी बाबूजीकी कांधोंपर। सबकुछ पीछे छोड़ दिया

था I सबकी नजर में एक खौफ था, डर था, की कहीं टेररिस्ट हमें घेर न ले, या फिर हमें बंदूकसे भून डाले I आमची मुंबई, माझे पुणे, हमारा इंदौर, नम्मा बैंगलोर, अमर बंगला, आपणो गुजरात, इसी तरह, हम भी अपनी कश्मीर से प्यार करते हैं। वह हरी घास, शांत और साफ पानी, मिट्टी के हर एक पत्ते से प्यार । आप कभी नहीं सोच सकते कि कश्मीर घाटी से निकलते समय हमें कितनी मानसिक पीड़ा हुई होगी। चाहे वह प्रेम से पत्नी के गले में पहना हुआ मंगलसूत्र हो या पीढ़ियों से घर में पहने जाने वाली जवेलरी,! कचरे के भाव से बेचनापड़ा था... क्यों? बस जान बचाने और भागने के लिए।

" उसके पहले मैं तुम्हे कहानी सुनाती हूं। गिरिजा नामकी एक औरत एक लड़कियों के स्कूल में लैब असिस्टेंट थी। एक दिन..... कश्मीर में हिंसा शुरू हो गई थी। किसी ने गिरिजा को कहा, कश्मीर घाटी छोड़ने से पहले कम से कम अपना सैलरी लेने के लिए तो स्कूल आ जाओ , वह गई, सैलरी लिया और फिर एक मुस्लिम सहकर्मी के घर कुछ काम से चली गई।उसकी हर हरकत, स्कूल जाने से लेकर उसके मुस्लिम फ्रेंड के घर तक, टेररिस्ट वॉच कर रहे थे । जैसे ही वह फ्रेंड के घर गई, टेररिस्ट घर में घुस गए और उसे

उठा ले गए। उसके मुस्लिम फ्रेंड ने कोई ऑब्जेक्शन नहीं लिया। क्योंकि वह एक हिंदू थी, काफिर। उसके शरीर का स्वामित्व इस्लाम में एक धर्म माना जाता था, रिलिजन अगेन, आस्तिकता। यह शरीर उनकी "संपत्ति" थी। फिर उसे नंगा किया। उसके साथ गैंग रेप हुआ। एक बार नहीं, दो बार नहीं, कई दिन। और फिर हवस मिटनेके बाद उसे जिंदा, एक आरी से उसके शरीर को बीचमे से काट दिया और फिर उसके शव को सड़क पर फेंक दिया। एक साधारण सब्जी काटते समय अपनी उंगली काटते हैं, तो याद रखें कि आपको कितना दर्द होता है। और फिर कल्पना करें। एक महिला जिसका पहले सामूहिक बलात्कार किया जा चुका है, और फिर एक लकड़ी से शरीर के दो टुकड़े। क्यों? क्योंकि वह एक कश्मीरी पंडित, हिंदू थी। क्या ये है मजहब?"

"सच कह रही है तू. लेकिन ये सब शुरू कैसे हुआ? "

“१९७५ में शेख अब्दुल्ला और इंदिरा गांधी के बीच जम्मू और कश्मीर के एकीकरण के लिए समझौता हुआ लेकिन प्रो-पाकिस्तान जमात-ए-इस्लामी और जेकेएलएफ उसका विरोध कर रहे थे। उसके पांच साल के बाद अब्दुल्ला ने खुद कश्मीर का इस्लामीकरण शुरू किया। उनकी सरकार ने लगभग २५०० गांवों

के मूल नाम बदलकर नए इस्लामिक नाम दिए।शेख अब्दुल्लाह ने अपनी आत्मकथा आतिश-ए-चिनार में, कश्मीरी पंडितों को "भारत सरकार के मुखबिर" कहा I

" ये तो सरासर झूट है "

“१९८७ के राज्य विधानसभा चुनावों में धांधली हुई और नई पार्टी आई वो थी एम् यु एफ जो जमात-ए-इस्लामी के कार्यकर्ता थे। इसमें पाकिस्तान की इसी सक्रिय रूप से शामिल हो गई। बाद में हिजबुल-मुजाहिदीन ये टेररिस्ट ग्रुप शामिल हो गया।

“जेकेएलएफने आयएसआय के समर्थन से सशस्त्र विद्रोह की शुरुआत की। उन्होंने कलाश्निकोव का इस्तेमाल किया और कश्मीरी मुस्लिम आबादी के बीच हिंदू विरोधी भावनाओं को फैलाया, हिंदू आबादी की घाटी को साफ करने की पर जोर दिया, चाहे वहआवश्यकता कितनी भी छोटी या महत्वहीन हो।

“सितंबर १९८९ में वकील और भाजपा नेता टीका लाल तपू की निर्मम हत्या ने पंडित अल्पसंख्यक समुदाय में भय पैदा कर दिया। बमुश्किल तीन हफ्ते बाद, सेवानिवृत्त न्यायाधीश निकलंत गंजू को दिन के उजाले में मार दिया गया। दिसंबर १९८९ को, वीपी सिंह सरकार में मुफ्ती मोहम्मद सईद की बेटी रूबैया सईद को

जेकेएलएफ ने अपहरण कर लिया और उसे छुडानेके लिए घाटी में अब्दुल्ला ने जेल में बंद १३ सदस्यों को रिहा कर दिया।

" माय गॉड! "

"इस बीच, अखबारों, पोस्टरों, और मस्जिदों ने कश्मीरी पंडितों को तीन विकल्प देते हुए घोषणाएं जारी कीं - "रालिव, सलिव यि गैलिव" मतलब धर्मपरिवर्तन करें, कश्मीर छोड़ें या मारे जाएं। एक स्थानीय उर्दू दैनिक, आफताब ने हिंदुओं को छोड़ने के लिए धमकी भरे संदेश भी दिए। इस सन्देश में लिखा था , " यदि आप नहीं मानते हैं, तो हम आपके बच्चों के साथ शुरू करेंगे। कश्मीर लिबरेशन, ज़िंदाबाद। "

"१९८० के अंत से लेकर अगले दशक तक कश्मीर में उग्रवाद अपने चरम पर था। जनवरी में नेशनल कॉन्फ्रेंस-कांग्रेस सरकार की साजिश से हार गई। राष्ट्रपति शासन लगाया गया और जगमोहन राज्यपाल के रूप में कार्यभार संभालने के लिए पहुंचे। १९ जनवरी १९९० की रात लगभग ९ बजे, घाटी चरमपंथियों के युद्ध-संकट से उबर रही थी और लाउडस्पीकर के माध्यम से रिले की गई भारी भीड़ द्वारा पाकिस्तान समर्थक नारे लगाए गए थे। युवा, बूढ़े, बच्चों और महिलाओं सहित हजारों कश्मीरीको मुसलमानोंने मौत के घाट उतार दिया और काफ़िरों को मौत के घाट उतार दिया।" नारे सुबह

तक लगे रहे, इससे पंडितों को स्पष्ट हो गया कि वे अगली लाइन में हैं।

“कानून और व्यवस्था चरमरा गई क्योंकि पुलिस ने अपने पदों को छोड़ दिया और पंडितों को अपने बचाव के लिए छोड़ दिया गया। ब्रिटिश शासन से भारत की आजादी के बाद पहली बार, कश्मीरी पंडितों ने अपने भाग्य को छोड़ दिया, अपने घरों में फंसे हुए पाया। क्या ये है मजहब?"

" और मैं कहती हूँ की बिना ईश्वर के भी एक अच्छा इन्सान बना जा सकता हैI धर्म और ईश्वर दोनों इन्सान पे लादे गए हैं, जबरदस्ती I इन्सान अपने नैचरल रूप में ही बहुत अच्छा हैI धार्मिक लोगों की सँख्या ही इस धरती पर सबसे बड़ी हैI नास्तिक तो मुश्किल से कुछ हजार ही होंगे फिर भी यहाँ इतनी असमानता क्यों? क्यों धर्म के नाम पे ही धरतीपर सबसे ज्यादा ब्लडशेड हुआ? हो सकता है एक ज़माने में धर्म सोसायटी को चलाने के लिए, एक पॉलिसी की तरह या रूल्स और रेगुलेशन की तरह लोगों ने बनाया होI मगर अब हमारी सोसायटी को चलाने के लिए एक अलग सिस्टिम है I और ऐसे में अब ये धर्म हमारी प्रोग्रेस में लंगड़ी मारने के सिवा और किसी काम के नहीं हैंI इन्हें अब इतिहास की किताबों

में ही रहने देना चाहिए I मैं कहती हूँ के ईश्वर तो इस दुनिया का सबसे झूठा शब्द है,और सबसे ज्यादा विश्वास से बोले जाने वाला झूठ भी "....

“ फिर जैसे तैसे दिल्ली आकर रैनबसेरा में बस गए. उसके बाद भोपाल गए और वहां के ही हो गए. I

“ मुझे तो रोना आ रहा है इरा, ” असं म्हणत मी तिच्या पाठीवर हात फिरवू लागले. तिला पण हुंदका आवरला नाही.

" अगर धर्म एक अच्छे इन्सान होने का सर्टिफिकेट होता तो इस दुनिया में कोई समस्या ही नहीं होती " मी म्हणाले. " एक सिधीसी बात लोगों के दिमाग में जिस दिन आ जाएगी कि ईश्वर ने मनुष्य को नहीं बनाया बल्कि मनुष्य ने ईश्वर को बनाया है, सारे अनसुलझे प्रश्न सुलझ जाऐंगे। क्यों की जनम होते ही ब्रेन पहले आता है, विचार बाद में। ईश्वर मात्र एक विचार है, उसका अस्तित्व कहीं, किसी रूप में नहीं हैI

# आय लव्ह यू

मागच्या आठवड्यात रविवारी सकाळीच मुलगा आणि सून यांच्यात धुसफूस सुरू झाली. पत्नीला विचारले तेव्हा कारण कळले कि मुलगा त्याच्या बायकोला गुणवत्ता वेळ (क्वालीटी टाईम) देत नाही म्हणून ती मुसमुसत होती. तिच्या नवीन सलवार कमीझचे त्याने कौतुक केले नव्हते म्हणून तिचा घसा दाटून आला होता. तो तिला " आय लव यू " असे म्हणून पाच वर्षे झाली अशी तिची तक्रार होती. वादविवाद करून थकल्यावर शेवटी समझोता या मुद्यावर झाला कि त्याने तिला लांब फिरायला न्यावे, बाहेरच खावे आणि त्यानंतर सिनेमा बघूनच घरी परतावे. मुलाने तिचे म्हणणे मान्य करताच तिची कळी खुलली आणि वीस मिनिटांत दोघं बाहेर पडली सुद्धा.

माझे मन भूतकाळात शिरले. मी माझ्या आजी आजोबांचे एकमेकांवर असण्याऱ्या प्रेमाच्या आठवणीत गुंगून गेलो. त्याच आजी आजोबांचा माझा मुलगाही एक भाग तर होता. जेव्हा जेव्हा माझी आजी माझ्याबरोबर असायची तेव्हा ती आजोबांबद्दल बऱ्याच गोष्टी सांगत असे, तिची आणि आजोबांची भेट कशी

झाली, तिला आजोबांची भीती कशी वाटायची, त्यांच्या खोलीत जाताना तिच्या छातीत कशी धडकी भरायची, बाहेरच्या खोलीतच तिला कशी डुलकी लागायची, आजोबांशी बोलणे व्हायचे ते कधीतरीच असायचे आणि तेही त्यांच्या चेहऱ्याकडे न बघताच, इत्यादी. परंतु ह्या गोष्टी सांगत असताना तिच्या चेहऱ्यावर हसू उमटत असे. आजोबांबद्दल बोलताना तिच्या आवाजात एक प्रकारचा आदर असायचा.

मला खरोखरच आश्चर्य वाटायचे कि आजोबात तिने काय पाहिले? माझ्या आजोबांच्या कपाळावर तर कायम आडव्या रेषा असायच्या आवाज नेहमी गुरगुरल्या सारखा यायचा आणि हसण्याशी असणारे त्यांचे वैर तर सर्वश्रुतच होते.

मला प्रश्न पडायचा कि गेली पन्नास वर्ष एकमेकांसोबत असणारी हि दोघं कशी काय एकमेकांवर इतकं उत्कट प्रेम करू शकतात?. माझी आजी अजूनही त्यांच्यावर कशी काय भाळू शकते? ते कसे काय तिच्यासाठी जगातले एकमेव पुरुषोत्तम असू शकतात? त्यांच्याही आयुष्यात वादळे येऊन गेली असतीलच. विसंवाद झाला असेलच. वादविवाद घडले नसतील कशावरून?

जगात असे कुठलेही कुटुंब नसेल कि ज्यात वाद झालाच नसेल आणि तरीही ही वृध्दा त्यांचे नाव घेतल्यावर एख्याद्या षोडश वर्षीय तरुणी सारखी लाजते. तिच्या डोळयात चमक येते. जगाचा अनुभव तिला काय कमी आहे? तिचे सारे आयुष्य सुखाचा त्याग करण्यातच तर गेले आणि तरीही माझ्या आजीनी माझ्या आजोबाबांबद्दल एकही वावगा शब्द काढला नाही. काय म्हणावे तिला?

मी अगदी शपथेवर सांगू शकतो कि आजोबा तिला कधीच " आय लव्ह यू " म्हणाले नसतील.

# २२ स्टाफ इंट्रोडक्शन

"मॅडम, हा नवीन ट्रेनी घोस्ट." तो मिस् सटवी भूतानीला म्हणाला.

" हो, मला माहिती आहे, मी त्याचं बॅकग्राऊंड चेक केलंय. होतकरू प्रेत आहे." ती बोलली, " चांगलं काम केलस तर प्रमोशन लवकर मिळेल तुला." मला तिची फक्त कवटी दिसत होती. कवटी वरचे केस मात्र जमिनीला टेकले होते.

"आता तुम्ही अकाउंट्समध्ये जाऊन बँक खातं उघडा. पगार तिथे जमा होईल. हे तुझं अपॉइंटमेंट ऑर्डर." तिने कागद माझ्यासमोर धरला. तिचा हात दिसत नव्हता. लालभडक रंगाचा तो कागद मी हातात घेतला तेंव्हा तो ओला लागला. आम्ही तिच्या केबिन बाहेर आलो.

"कुठली बँक आहे आपली?" मी विचारलं

"पी एन बी. पिशाच्च नॅशनल बँक."

"ओके. छान. बर, ही एच आर कुठे होती अगोदर?"

"अरे मोठ्या कंपनीत होती. एचआर म्हणून आपल्या कारकीर्दीत एम्प्लॉइजना भयंकर त्रास आणि वाईट परिणामांची धमकी द्यायची. उगीचच डझनभर एम्प्लॉइजना डिस्मिस केलंय

तिनी. कार्यक्षम नाही अशी चूक काढून प्रोबेशन कालावधी वाढव, मालमत्तेचे नुकसान करण्याच्या चुकीच्या कारणास्तव पीएफ आणि ग्रेच्युटी रोखून ठेव, स्पाउजच्या बदल्यांचे अर्ज, विनंत्या महिनो महिने फायलींमध्ये गुंडाळ, सीटीसी कॅल्क्युलेट करताना फसवणूक कर, ज्यांनी कंपनी सोडली त्यांना एक्स्पेरिअन्स सर्टिफिकेट देण्यास उशीर कर अशी तिची देदीप्यमान कामगिरी आहे. तिचं खरं नाव सविता आहे म्हणजे Savita पण एक मुलगी नोकरी सोडताना तिच्या केबिनमध्ये जाऊन तिला म्हणाली की मॅडम तुमच्या नावाचं स्पेलिंग जरा इकडे तिकडे केलं की ते सटवी होतं आणि तेच आहात तुम्हीं. असं म्हणून ती मुलगी तरातरा निघून गेली. त्यानंतर सगळेजण तिला सटवीच म्हणायला लागले. अशा स्वभावामुळे लवकर ब्लड प्रेशर, हायपरटेन्शन, थायरॉईड, व्हेरिकोज व्हेन्स, अर्धशिशी असे रोग लागले. नंतर दारू आणि सिगारेटची सवय लागली. मग अशीच गाडी चालवताना इलेक्ट्रिक खांबाला धडकली. आम्ही तिला लगेच अमानव संसाधन अधिकारी अशी पोस्ट देऊन टाकली. तिच्या टेबलाच्या मागच्या बोर्डवर काय लिहिलं होतं वाचलास ना?"

" लिव्ह अँड लेट डाय…छान रेज़ुमे आहे की हिचा.. बोर्ड ऑफ 'डाय'रेक्टर्स वर घेतलय की नाही?

"चर्चा चालू आहे. बरं चल मी तुझी सगळ्या स्टाफशी ओळख करून देतो. चल."

" हे मिस्टर गिऱ्हा." मी हात पुढे केला. अगदी बर्फासारखा थंड होता. " हे कोकण आणि घाट दोन्हीकडे जॉब करतात. पाणवठ्यावर राहतात आणि माणसाला पाण्यात ओढून नेऊन त्याची नाना प्रकारची गम्मत करतात आणि मग बुडवतात. 'काय गिऱ्हा लागलाय मागे?' हा वाक्प्रचार यांनीच शोधलाय."

आम्ही पुढच्या टेबलाकडे वळलो.

" मिस्टर खवीस. हबशी आहेत. माणूस कचाट्यात सापडला की सोडायचे नाही हा जॉब प्रोफाइल. चौदाव्या शतकापासून कोकणात आहेत. मोस्ट सिनियर भूत. वेरी डेडीकेटेड.

"हे श्री छेडा. वेशीवर राहतात. खूप दयाळू आहेत. वर्षातून एकदा नारळ, केळी, साखर, फ्रेश कोंबड्यांचा किंवा बोकडाचा बळी दिल्यावर त्रास देत नाहीत. कधी कधी होळीवर, डोंगरात किंवा जंगलात वावरायला जातात.

" ओ हो…झोटिंग साहेब, कैसे हो? " त्याने चौकशी केली. मग माझ्याकडे वळून म्हणाला, " यांची बाधा दूर करणे भल्याभल्याना जमत नाही. है ना झोटींगजी?" तो विकट हसला आणि म्हणाला, " सई बोला आपने, भोत बार बे-जबरन की बात

करते वो भूत छुड़ानेवाले और इत्ता ग्यान पेल देते है कि जिसको मैंने पकड़ा वो नी मरे तो भी मर जाये.. हा हा हा."

आम्ही पुढच्या टेबलावर सरकलो.

" श्री दाव : एकटेच फिरतीवर असतात. लोन वुल्फ. एकट्यालाच गाठतात आणि काम तमाम करतात.

" हे डिअर मुंजा : मुंज झाल्यानंतर सोडमुंज होण्याअगोदर जे इथे येतात ते हे मुंज्या. हे पिंपळावर किंवा विहिरीत विहार करतात.

" हे श्री समंध : यांची उत्तरक्रिया न केल्यामुळे ते इथे आलेत. यांच्या नात्यातल्यांनी यांची इच्छा पूर्ण केल्यावर शांत होतात. हो ना समंधसाहेब?"

" येस, नियमित श्राद्ध कर्म केले तर मी आप्तांना मदत ही करतो."

"अरे व्वा, भुतं मदत पण करतात?" मी म्हणालो.

" ऑफ कोर्स! बायंगी आहे ना आमच्याकडे. बायंगिला नारळात कैद करतात आणि कैद करतांना त्याला आश्वासन दिलं जातं की तुला इतक्या कालावधीनंतर मुक्त करण्यात येईल. पण त्याचसोबत त्याला त्याचं काम सांगण्यात येत जे की साहजिकच मालकाला धन आणून देणं असतं. तो मालकाची भरभराट करतो. पण त्याला घरात स्थापन करतांना विशेष काळजी घ्यावी लागते.

त्याला त्याचा मान द्यावा लागतो. त्याला स्थापन केलेली जागा स्वच्छ आणि साफ ठेवली पाहिजे. त्याची पण मागणी असते ती पुरी करावी लागते. ती नाही केली तर नाश ठरलेला. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे शेजारच्या लोकांना त्याची जराही कुणकुण लागता कामा नये. बायंगी तुम्हाला ज्या प्रकारे फायदा करून देतो त्यामुळे माणूस लोभी बनतो आणि कबुल केलेल्या वेळेत त्याला सोडण्यास माणूस तयार होत नाही. बहुतेक वेळा त्याला सोडण्याच्या कालावधी बद्दल विसर पडलेला असतो. अश्या वेळी जर त्याला सोडला नाही तर तो त्या माणसासाठी जीवघेणा ठरू शकतो." समंध बोलला

आम्ही भुतालयात नजर फिरवली. सगळयांची ओळख झाली होती.

" फिमेल स्टाफ दिसत नाही." मी विचारलं.

" अरे त्यांना फर्स्ट शिफ्ट असते. ते दोन वाजता निघून जातात. पुढच्या वेळी आपण लवकर येऊ त्यावेळी लेडी भुतांना भेटू. अजून बरीच मुंडकी आहेत भेटायची. फील्ड वर आहेत म्हणून इथे नाहीत. चल आता बँकेत तुझे खाते उघडू या. मग परत ट्रेनिंग सुरू."

आम्ही बॅंकेला जायला निघालो.

@@@@@@@@@@@@@@@@@

# पुस्तक म्हणजे मैफल

फ़ेसबुक, whatsapp, किंवा अनेक नवीन माध्यमांत वाचन होतंच. फ़ेसबुक च्या नावातच मुळी ’बुक’ आहे. मधेच एखादी लकेर, नंतर कुठे विनोद, अचानक कोणी तरी आक्रस्ताळं राजकीय भाष्य करणार आणि ते संपतं न संपतं तो एखाद्या मृत्य़ूची बातमी वा लग्नाचा वाढदिवस. या माध्यमांतूनही ज्ञान, भावना, यांचा खेळ चालतो; नाही असं नाही. पण तो क्षणिक असतो. ओझरता असतो. एखादी सुंदर लकेर मन मोहून टाकते खरेच. पण मैफलीचा गंध जसा आयुष्यभर दरवळत रहातो तसे होत नाही.

आपल्या मनाला, आपल्या बुद्धीला वरच्या दर्जावर नेण्यासाठी पुस्तके आवश्यक असतात. मग ती छापील असो वा ई. आपले मन आणि बुद्धी यांना दर्जेदार खुराक द्या. पुस्तके वाचत रहा. ई साहित्य ईपुस्तके विनामूल्य देते त्यामागे एक उद्देश आहे. एक मन, एक बुद्धी जेव्हा वरच्या पायरीवर जातं तेव्हा ती व्यक्ती समृद्ध होते. जेव्हा समाजातील असंख्य लोक समृद्ध होतात तेव्हाच समाज प्रबुद्ध होतो.

वाचत रहा. पुस्तके वाचत रहा.

www. esahity. com